# माझी पितृभूमी





लेखक : जेठालाल शाह

# माझी पितृभूमी

## महाराष्ट्र

### अहमदनगर

: लेखक :

जेठालाल शाह

सर्व हक्क स्वाधीन

प्राप्तीस्थान :
इंपेरियल पब्लिकेशन्स
३०४ डी एलमास, सोनवाला क्रॉस
रोड २, गोरेगांव पूर्व
मुंबई ४०००६३

पुस्तकाचे नाव: माझी पितृभूमी
ISBN: 978-93-91044-06-0

प्रकाशक - मुद्रक
इंपेरियल पब्लिकेशन्स
३०४ डी एलमास, सोनवाला क्रॉस
रोड २, गोरेगांव पूर्व
मुंबई ४०००६३

किंमत : २००/-

# प्रस्तावना

श्री जेठालाल शाह हे मी सचिवालयामध्ये (मंत्रालय हा शब्द नंतरच्या काळातला!) मी काम करीत होतो, तेव्हांचे माझे सहकारी. सचिवालयांत मी सहाव्या माळ्यावर तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रसिद्धीचे काम पहायचो. त्यामुळे तळमजल्यावरील प्रसिद्धी संचालनत्यांतील अधिकाऱ्यांचा दैनंदिन संबंध येत नसे. परंतु वसंत देशमुख, वसंत सबनीस आणि वसंत शिरवाडकर या तीन वसंतांबरोबर माझी मैत्री जुळली होती. साहित्य हा आमच्यातील समान दुवा. त्यामध्ये जेठालाल शाह या तरूण मित्राचा लवकरच समावेश झाला. तो त्यांच्या साहित्यलेखनामुळे नव्हे तर साहित्यप्रेमामुळे आणि अत्यंत ऋजु, सुसंस्कृत, स्नेहशील स्वभावामुळे.

कार्यालयांतील मैत्री कार्यालय संपले की संपते. माझ्याकडून अनेकांच्या बाबतीत तेच घडले. पण जेठालाल यांना मी विसरलो नव्हतो. मात्र कामांच्या विविध व्यापामध्ये जेठालाल यांनी भेट होत नव्हती. अखेरीस आपले हे छोटेसे आत्मकथन घेऊन तेच माझ्या भेटीला आले आणि पुनर्भेटीचा दुर्मिळ आनंद मी अनुभवला.

जेठालाल शाह यांच्या स्वभावांतील सद्‌गुण मला जे जाणवले त्यामागील पार्श्वभूमी हे पुस्तक वाचतांना लक्षांत येते. सुखद् कुटुंबात जन्म. अहमदनगरसारख्या मुंबईहून दूर असलेल्या परिसरांत त्यांचे बालपण गेले व 'करीयर'साठी ते मुंबईला आले. मुंबईच्या मायानगरीमध्ये त्यांना योगायोगाने उत्तम मित्रमंडळी लाभली. सर्वजण साहित्य-संगीत-नाट्य या कलाजगतांतील. त्यांच्या सहवासांत मैत्रीमुळे जेठालाल शाह यांचे व्यक्तिमत विकसित झाले. पत्रकारिकेत आले. त्यानंतर सचिवालयातील शासकीय नोकरीतील अनेकविध अनुभवांमुळे ते संपन्न झाले. आतां जेठालाल शाह हे निवृत्त होऊन, शांतपणे जीवन व्यतीत करीत आहेत. निवृत्तीमध्येही आपली जन्मजात प्रवृत्ती टिकवून आहेत. मनाची आणि शरीराची निकोपता जपून आहेत.. कारण मुळांत त्यांची दृष्टि सकारात्मक आहे. निगेटिव्ह विचार त्यांच्यापाशी फिरकले नाहीत. विद्यार्थी दशेतील, राष्ट्र  वादलांतील सुसंस्कार, देशभक्ती, मातापित्यांचे, देशाचे प्रेम यांचे जेठालाल यांना लाभलेले पाथेय आयुष्यभर पुरणारे आहे व त्यातच त्यांच्या जीवनाचे प्रेम व श्रेय समावलेले आहे. त्यांचे हे आत्मकथन त्यांच्या प्रांजळपणामुळे आवडले. मित्रवर्य श्री जेठालाल शाह यांना भावी वाटचालीसाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**- मधु मंगेश कर्णिक**

मुंबई ५३
१५/२/२०११

## मी म्हणतो -

मी तसा एक सामान्य माणूस. अहमंदनगरमध्ये लहानाचा मोठा झालो. पुढे मुंबईला आलो. लहानपण तसं सुखात गेलं. कारण वडिलांचा भरतकामाचा धंदा चांगला चालायचा, पैशाअभावी हालअपेष्या वगैरे सहन कराव्या लागल्या नाहीत. मला. दोन बहिणी. पण मुलंगा आईवडिलांचा एकुलता एक. त्यामुळे लाडात वाढलो. लाडावलेली पोरं बिघडतात हा सर्वसाधारण समजं माझ्याबाबतीत खोटा ठरला. याचे श्रेय घरातील आणि सेवादलातील संस्कारांना जाते. सेवादलामुंळे आणखीही फायदा झाला. सेवादल आणि सरकारी नोकरीमुळे महाराष्ट्राच्या अनेक भागांचे जवळून दर्शन घडू शकले. ग्रामीण व शहरी दोन्ही भागांतील जीवन अनुभवलंय, घरात गुजराती भाषा, गुजराती जीवनशैली तर घराबाहेरील सर्व व्यवहारात, जीवनात मराठी भाषा व संस्कारांचंच प्रभुत्व. ढोकळा आणि फरसाण ज्या आवडीने खातो तितक्याच चवीने मिसळ आणि कोथिंबीरवडी खातो. गरबा-गीते आणि सुलोचनाबाईंच्या लावण्या दोन्ही खूप आवडतात. मुंबई समाचार वाचतो अन लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्सही वाचतो. गुजराती मित्र आहेत, पण मराठी भाषिक मित्रांची संख्या मोठी आहे. मुंबईत आल्यानंतरही नगरीपणा गेला नाही. विल्सन कॉलेजात जोडले गेलेले ढगे, रामदास कामत, तुळजापूरकर हे मित्र “ए नगरी' अशीच हाक मारतात. पण त्यातच त्यांचे. माझ्या बद्दलचे प्रेम आहे. जिव्हाळा आहे. आमचं कुटुंब मूळ गुजरातचं. कृष्णाचा जन्म मधुरेत, पण वाढला गोकुळात. कृष्ण आणि गोकुळच्या नात्यासारखे माझे नगरशी नाते आहे. पुन: पुन: चघळत राहाव्यात अशा अनेक आठवणी आणि यां आठवणी अनेक मित्रांना अनेक वेळा जेव्हां सांगितल्या, तेव्हां त्यांच्या आग्रहास्तव हा सगळा प्रवास शब्दस्थ केला. हे प्रवास वर्णन लिहून झाल्यानंतर कुणी छापणार का? हा विचारच केला नाही. खरं तर मी लिहिलेलं हस्तलिखित् मी स्वतःच वाचण्याचा आनंद पुन: पुन: मिळवत राहिलोय.

लहानंपणी नाना फडणीसांची एक गोष्ट वाचली होती. एक माणूस पेशव्यांच्या दरबारात  ला. त्याला अनेक भाषा येत होत्या. त्याची मातृभाषा ओळखायची होती. तो झोपला असताना   फडणीसांनी त्याच्या अंगावर पाणी ओतले अन् “शू थयु शू थयु' असं ओरडत तो उठला 'तुझी भाषा गुजरांती', नाना म्हणाले. पण त्या माणसाऐवजी मी तिथं असतो तर नानांचं उत्तर  कलं असतं. मी मराठीतच ओरडलो असतो. तरीपण आमच्या कुटुंबाची मातृभूमी कोणती तर गुजरात. मग महाराष्ट्राला मी काय म्हणू? कर्मभूमी ? नाही, कारण माझं कर्म एवढं मोठं नाहीये. म्हणूंन- महाराष्ट्र माझी पितृभूमी. रशियन लोक आपल्या देशाला 'मातृभूमी' नव्हे 'पितृभूमी' म्हणतात. जीवनात पित्याचे ऋण कमी कां आहे? मी देखील माझ्या पिंतृभूमीचा अत्यंत ऋणी आहे.

**जेठालाल शाह**

# आभार

सर्व प्रथम माझ्या मातृभूमीचे शतश: आभार आणि नमन.

प्रसिद्ध किंवा अप्रसिद्ध कोणत्याच श्रेणीतील मी लेखक नाही. तरी देखील सुप्रसिद्ध साहित्यिक श्री मधु मंगेश कर्णिक यांनी या पुस्तकास प्रस्तावना दिल्याबदल हार्दिक आभार.

माझे मित्र हिंमत शाह, सुरेश डावरे, मधुकर भानुशाली ह्यांनी सदर पुस्तक लिहिण्यास प्रोत्साहन तर दिलेच पण कांही महत्वाच्या सूचना आणि फेरबद्दल सुचवले, त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद दिलेच पाहिजेत.

आणि सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे जयंत प्रिन्टरीचे मालक श्री छोटुभाई छेडा यांच्याजवळ छपाई कामाचा खूप मोठा बोजा असूनही आपुलकीच्या भावनेने या पुस्तकाच्या छपाईचे काम आणि ते सुद्धां अत्यंत वेगाने. पूर्ण करून दिले त्याबद्दल त्यांचे मानावे तेवढे आभार कमी आहेत.

माझे हे पहिलेवहिले पुस्तक वाचण्याची तस्दी जे कुणी घेतील त्या सर्वांचे in advance आभार.

**जेठालाल शाह**

प्रकरण - १

# रानटी फुलांचा सुगंध

जवळ जवळ आठ - दहा वर्षानंतर नगरला जाण्याचा योग आला. अंगातून आनंदाची एक लाट सर्रकन् पसार झाल्यासारखं वाटलं. मन मोहोरून उठलं. मुंबईचं जीवन तसं आता नवीन राहिलं नव्हतं. सवय झाली होती मुंबईच्या जीवनाची. सुरूवाती-सुरूवातीला मुंबई सोडून अक्षरश: पळून जावं असं वाटायचं. सकाळी उठल्यापासून पायाल भिंगरी लावल्यासारखं नुसतं धावायचं. जिकडे जावं तिकडे गर्दी आणि रांगा. लघवीला जाण्यापासून ते लोकल, बस, हॉटेल, थिएटर इतकंच नाही तर स्मशानातही रांग. याउलट नगरचं जीवन. कशाचीच घाई नाही. सकाळी आठ-साडेआठपर्यंत कुठलंच दुकान उघडणार नाही. दुपारीदेखील दोन ते चार सर्वत्र शुकशुकाट ! सगळी कामं आरामात उरकायची. मुंबईतील लोक सकाळी आठ-साडेआठलाच बकाबका जेवून कामासाठी बाहेर पडताना पहिल्यांदाच मी पाहिलं तेव्हा मी अवाक झालो. आता मात्र रुळून गेलो होतो इथल्या धावपळीला, धकाधकीला, गर्दीला. सुरुवाती-सुरुवातीला जीव गुदमरायचा. कोंडल्यासारखं वाटायचं. मनसोक्तपणे मोकळा श्वासही घेणं अवघड वाटायचं. अगदी गिरगांव किंवा दादर चौपाटी म्हणजे मुंबईतल्या मोकळ्या हवेच्या ठिकाणीदेखील मला घुसमटायला व्हायचं. कधी एकदा इथून पळ काढतो अन् नगरची गाडी पकडतो असं वाटायचं.

माझ्या लहानपणीदेखील वडिलांबरोबर कधीतरी दोन-चार दिवसांसाठी मुंबईला येण्याचा योग आला होता. पण त्या काळात एस.टी. वगैरे नव्हती. मुंबई-मनमाड व्हाया दौंड ही पॅसेंजर गाडी पकडली की थेट अहमदनगर. रिझर्वेशन, लाईन वगैरे भानगड नव्हती. अर्धातास आधी व्ही.टी.ला जाऊन दहा रुपयाचं तिकिट काढायचं आणि गर्दी नसलेल्या फलाटावर चक्कर मारून फलाटाला लागलेल्या रिकाम्या गाडीत खिडकी जवळची जागा पकडली की बस्स ! सकाळी दहा वाजेपासून रात्री नऊ वाजेपर्यंतचा प्रवास. पण कंटाळा म्हणून यायचा नाही. गाडीत अर्थातच ए.सी. नाही, व्हिडियो नाही. जवळ ट्रानझिस्टर किंवा कानात वॉकमन नाही. जुन्या आगगाडीच्या डब्यांना खिडक्या मोठ्या प्रशस्त असायच्या. हल्लीच्या गाड्यांना खिडक्या बनवतानाही कंजूषपणा का करतात हे अजून मला कळलेलं नाही. विशेषतः डबल डेकरच्या ज्या गाड्या निघाल्या आहेत ना, त्या गाड्यांचे डबे बघितल्यानंतर हिंटलरचे गॅस. चेंबर्स कसे असले पाहिजेत याची कल्पना येऊ शकते. या डबलडेकर गाडीच्या डब्यांना खिडक्या असूनही त्या खिडक्यांमधून बाहेर बघता येण्याची सोय नाही. माणूस एकदा का आत बसलात की बाहेरच्या जगाशी संबंध खलास. मग खिडक्या 'पाहिजेतच कशाला ? असा प्रश्न अनेक वेळा पडला. पण त्याचं उत्तर काही सापडलं नाही.

त्या काळांत, म्हणजे विद्यार्थीदशेंत शाळेला सुट्टी असेल आणि नेमके त्याच वेळी वडिलांना खरेदीसाठी मुंबईत जायचे असेल तर वडिलांबरोबर मुंबईला जाण्याचा योग यायचा. पण नगरहून मुंबईला येताना तो उत्साह असायचा तो मुंबईतील दोनचार दिवसांच्या वास्तव्यांतच ओसरून जायचा आणि मन नगरकडे धावायचं. नगरकडच्या गाडीत बसून गाडी खंडाळ्याचा घाट ओलांडून जशी जशी

पुणे नगरच्या दिशेने धावायची तसतसं आपण कोणत्या तरी खोल खाणीतून बाहेर पडतोय असं वाटायचं. ती छोटी-छोटी स्टेशनं, गाडीत चढ-उतर करणारी तुरळक, भोळी-भाबडी खेडवळ माणसं, खिडकीतून बाहेर दिसणारा हिरवागार परिसर, विशेषत: पावसाळ्यात तर घाटात दिसणारे विलोभनीय दृष्य आजही जसच्या तसं नुसत्या आठवणीनं देखील नजरे समोर दिसू लागतं. अंधार पडे पर्यंत खिडकीतून बाहेर बघत बसण्याचा कधी कंटाळा यायचा नाही.

आज नगरला जाताना मात्र आजच्या सारख्या बंद कोंदट गाडीतून मला प्रवास करायचा नव्हता याचा आनंदही होता आणि जुन्या आवडत्या पॅसेंजर गाडीचा प्रवास आपण मुकत आहोत याचं दुःखही होतं. आता काळाबरोबर सगळं काही बदललं होतं.

आता रेल्वे पेक्षा एस.टी. ने नगरला जाणं अधिक सुकर झालं असून वेळ ही खूप वाचतो. मुंबई सेंट्रल वरून रात्री बस पकडली की सकाळी अहमदनगर. खरं म्हणजे मला अजूनही तो ट्रेनचा प्रवास आवडायचा. पण एक तर गाड्यांना पूर्वीपेक्षा गर्दी खूप वाढलेली. सबंध दिवस प्रवासांत फुकट घालवणंही परवडण्यासारखं नव्हतं. शिवाय एस.टी. आराम गाडी सोडून पॅसेंजर ट्रेनने प्रवास करणं म्हणजे मागासलेलपणाचं लक्षण ! त्यामुळं आधी रिझर्वेशन करून रात्रीची आराम गाडी पकडली. हिवाळ्याचे दिवस होते. खरं म्हणजे मुंबईत राहून खरा हिवाळा कसा असतो हे कधी कळणारच नाही. मुंबईत खरे दोनच ऋतु. एक पावासाळा आणि दुसरा उन्हाळा. पण आता मी देखील तसा मुंबईकर झालो होतो.

नगर-मुंबईच्या अशाच दुसऱ्याही प्रवासाची आज आठवण झाली. प्राथमिक शाळा, हायस्कूलचे शिक्षण संपले व त्यानंतर अहमदनगर कॉलेजांत विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. नगरलाच कॉलेज सुरू झाल्यामुळे मॅट्रिकनंतर नगर सोडून पुणे-मुंबईला जावे लागणार नाही याचा केवढा आनंद झाला होता. पण कॉलेजातील दोन वर्षानंतर मात्र पुढील शिक्षणाची सोय त्यावेळी नगर कॉलेजांत नसल्यामुळे मुंबईला यावे लागले. दोन दिवस फिरायला म्हणून मुंबईला जाणे वेगळे आणि पुढील शिक्षणासाठी, आणि कदाचित त्यानंतरच्या आयुष्यांतील वाटचालीसाठी नगर सोडून जाणे यांत फरक होता. लग्न करून परगांवी सासरी जाणाऱ्या मुलीच्या मनस्थितीसारखी माझी अवस्था झाली होती. कॉलेज शिक्षणासाठी मुंबईला येताना खास कोट शिवून घेतला. पण व्ही. टी. स्टेशनांतून छोटी पत्र्याची पेटी हातात आणि अंगावर कोट चढविलेला मी बाहेर पडलो तेव्हा सगळे लोक जणू माझ्याकडेच टक लावून पहात असल्यासारखं मला वाटलं. एवढ्या तोबा गर्दीत कोट घातलेला फक्त मी एकटाच असेल कदाचित !

पण आज हिवाळ्यांत नगरला जाताना तो ठेवणीतील कोट उपयोगास येणार होता. एस.टी.त बसलो अन् सगळीकडे नजर फिरवली. नगरची बस म्हणजे या बसमध्ये बरेचसे आपले ओळखीचे लोक असतील अशी उगाचच आशा... आपण खूप वर्षांनंतर नगरला जात आहोत आणि इतक्या

वर्षांनंतर आठ-दहा वर्षापूर्वीचे आपले ओळखीचे असलेले कुणीतरी मुंबई ते नगरच्या बसमध्ये भेटतील अशी अशा करणं व्यर्थ, पण नगरबद्दलच्या आपुलकीच्या भावनेंतून आपल्या जवळच्या लोकांना भेटण्याच्या उत्कट इच्छेतून ही वेडी आशा मनांत डोकावली. बसमध्ये नसेना का नगरला गेल्यानंतर तर आपले जुने मित्र, सवंगडी खात्रीने भेटणार या आनंदाच्या तंद्रीतच प्रवास सुरू झाला. लोणावळा गेलं आणि मुंबई मागे पडलं. पुणे आल्यानंतर नगर जवळ आल्यासारखं वाटलं. अर्धी रात्र उलटून गेलेली. डोळ्यावर झोप रेंगाळत होती. बंद केलेल्या बसच्या खिडकीच्या फटींतूनही आंत येणारी बोचरी थंडी अंगाला झोंबत होती. कोट, स्वेटर्स, शाल वगैरे जवळ असेल त्या साधनांनी थंडीपासून 'स्वतःचा बचाव करीत सर्व प्रवासी पेंगत होते. बस चालण्याच्या आवाजाशिवाय दुसरा कुठलाचं आवाज कानीं येत नव्हता. पेंगता पेंगता मला झोप कधी लागली हे कळलं नाही. रस्ता व अंधार कापीत गाडी सुसाट धांवत होती. गाडीतील झोपच ती. झोप लागूनही गाडी धावत आहे व आपण गाडीत बसलो आहोत याचे भान होते. कोट आणि मफलरची उब चालत्या बंद गाडीतही कमी वाटत होती.

मोठ्या वळणावर गाडीचा वेग कमी झाला. माझ्या पुढच्या सीटवर बसलेल्या माणसाने खिडकी उघडली आणि भपकन थंडीची लाट खिडकीतून आत आली अन् माझी झोप उडाली. थंड हवेच्या लाटेबरोबर एका विशिष्ट प्रकाराच्या रानटी फुलांचा उग्र वास नाकांत शिरला. गच्च अंधारात बाहेरचे कांहीही दिसत नव्हते. पण कित्येक वर्षांनंतर नाकाने अनुभवलेल्या त्या उग्र वासामुळे मी कंडक्टरला विचारले, "नगर आलं वाटतं ?" "हे केडगांव आलं की, आता दहा मिनिटांत येईल नगर", कंडक्टर म्हणाला.

केडगांव म्हणजे नगर शहराची हद्द. केडगांव आलं हे कळल्याबरोबर डोळ्यावरची झोप, अंगातला थकवा, प्रवासाचा शीण गायब झाला. खडबडून उठलो. सावरून बसलो. पहाटेच्या अंधुक प्रकाशांत अस्पष्ट असे केडगांवच्या देवीचे मंदिर दिसले आणि खिडकीची काच बाजूला सारून भक्तिभावाने मी बसमधूनच देवीला नमस्कार केला. कित्येक दिवसांनंतर मला या मंदिराचे दर्शन घडत होतं. परीक्षेला जाण्याआधी किंवा अन्य कोणत्याही महत्त्वाच्या कामासाठी जाण्यांआधी केडगांवच्या देवीचे दर्शन नगरकर घेतात. नवरात्रांत तर देवीचा उत्सव बघण्यासारखा असतो. नवरात्राचे नऊही दिवस पहाटेपासून लोक गांवातून स्टेशन रोडने केडगांवच्या. देवीच्या दर्शनाला येतात. रस्त्याच्या दुतर्फा आणि केंडगांव परिसरांत चिंचेची, कडू लिंबाची आणि इतर अनेक झाडे होती. होती असं सांगण्याचं कारण असं की, कॉंक्रिटीकरणामुळे आता त्या झाडांची संख्याही कमी झाली आहे. तर त्या काळांत म्हणजे आमच्या लहानपणी कळत नकळत माझ्या श्वासाबरोबर नाकाद्वारे घेतलेल्या रानटी फुलाच्या वासाची अनुभूती ताजी झाली आणि इतक्या वर्षांनंतरही या थोड्याशा वासावरून मी नगरला येऊन पाहोचलो हे मी कसं ओळखलं याचं मलाच आश्चर्य वाटलं. आणि आपण आपल्या मातृभूमिच्या-पितृभूमिच्या अंगणांत येऊन पोहोचलोय याचा आनंद झाला.

प्रकरण - २

# रम्य ते बालपण

अहमदनगर स्टेशन ओलांडून बस गांवाच्या दिशेने वळली. पंचवीस तीस वर्षापूर्वीच नगरस्टेशन आणि आजचं स्टेशन दोन्हीमध्ये म्हणण्यासारखा कांहीही बदल झालेला नव्हता. तेंच ते बैठ्या घरासारखं छोटंस स्टेशन. एकच प्लॅटफॉर्म. गाडी यायच्यावेळेला स्टेशनांत जी काही वर्दळ असेल तेवढीच. एरव्ही शुकशुकाट. हिंदी सिनेमांत एखाद्या छोट्या गावाच्या स्टेशनचा देखावा दाखवतात ना अगदी तस्संच हे स्टेशन. दोन-चार बाक. एक चहा-कॉफिचा स्टॉल. पाण्यासाठी ठेवलेले दोन भले मोठे माठ. स्टेशनमास्तरच्या ऑफिसपुढेच प्लॅटफार्मवर लटकवलेली मोठी घंटा, सगळं जसंच्या तसंच. गाडी यायच्या वेळेला एका विशिष्ट लयीमध्ये द्रूतगतिनें ती घंटा वाजू लागली की, शांत पडलेलं स्टेशन एकदम खडबडून जागं व्हायचं. विशिष्ट प्रकारानेच घंटा वाजवण्याचं खास ट्रेनिंग वगैरे त्या काळांत देत असावेत. कारण हल्ली तशी घंटा कुठल्याच स्टेशनांत मी ऐकलेली नाही. तो घंटानाद ऐकण्याची एक वेगळी मजा होती. शिवाय आजच्या सारख्या रेल्वेगाड्या तास न् तास तर सोडाच कांही मिनिटांनीही उशीरा यायच्या नाहीत. लोक आपलं घड्याळ लावताना रेल्वे टाईम किंवा रेडियो-टाईम असं लावत असत. नगर स्टेशनाच्या बाहेर टांगे असायचे. त्याची जागा आता रिक्षांनी घेतली हा मोठा फरक. पण खरं सांगू, टांग्यांमध्ये जो रुबाब होता जो दिमाख होता जी ऐट होती ती रिक्षाच काय पण टॅक्सी किंवा स्वत:च्या मालकीच्या मोटारीतही नाही. कांही टांगे तर त्यांचे घोडे आणि घोड्यांना केलेली सजावट यासाठी प्रसिद्ध होते. बाहेरगांवाहून आलेल्या पाहुण्यांना अर्थातच हा टांगे इतिहास माहीत नसायचा. पण नगरचे प्रवासी फलाटांतून लगबगीने बाहेर पडून ह्या खास टांग्यांपैकी एखाद्या टांग्याकडे धांव घ्यायचे. बाकीचे टांगेवाले 'एक सवारी', 'एक सवारी' असं ओरडून गिऱ्हाईकांना आकर्षायचे. एका टांग्यांत दोन प्रवासी आणि एक लहान पोर अशी कायद्यानं परवानगी असायची. आणि लहानपणी तिसरा प्रवासी म्हणून पुढच्या बाजूला टांगेवाल्याच्या शेजारी बसून प्रवास करण्याचा आगळा-वेगळा आनंद मी लुटला आहे. त्यांतही वळण आणि गर्दी नसलेला सरळ रस्ता आला की, थोडा वेळ घोड्याचा लगाम टांगेवाला जेव्हा माझ्या हाती द्यायचा तेव्हां तर आनंद गगनांत मावायचा नाही अन् आपण आकाशांत उडतोय असंच वाटांयच.

बहुतेक टांगेवाले तिसरा प्रौढ प्रवासी घ्यायला नकार द्यायचे. कायदा पाळायचा हा एक उद्देश तर खराच. पण मुख्यत: आपल्या जीवापेक्षा जास्त प्रेम असलेल्या घोड्याला त्रास द्यायचा नाही ही तळमळीची भावना. आणि जे दोन पांच टांगेवाले पैशाच्या लोभाने एक सवारी जास्त घ्यायचे त्यांचा एक 'डाव' ठरलेला असायचा. स्टेशनांत तीन सवाऱ्या (प्रवासी) घ्यायच्या. पण पुढे पोलिस कोणत्या नाक्यावर उभा आहे हे टांगेवाल्याला माहीत असल्यामुळे त्या नाकयाच्या थोडे अलिकडे एकाला खाली उतरून थोडं अंतर चालायला सांगायचं आणि पोलिस उभा असलेल्या नाक्याच्या थोडं पुढे जावून टांगा थांबवायचा अन् त्या तिसऱ्या प्रवाशाला पुन: टांग्यांत बसवून घ्यायचे. कांही बेरके पोलीस असं चालत आलेल्या प्रवाशाला रोखून "ए टांग्यांत बसून आला की चालत ?" असं विचारायचे

अन् “चालत" हे प्रवाशाचं उत्तर ठरलेलं असायचं. एकदा मात्र गंमत झाली. चांगदेव नावाचा माझा मित्र असाच पोलिसाच्या तावडींत सांपडला आणि घाबरून आपण टांग्यातून आल्याची कबुली त्याने दिली. दूर उभ्या असलेल्या टांगेवाल्याच्या लक्षांत हा प्रकार आला आणि त्याने भन्नाट टांगा हाकलला. बिचाऱ्या चांगदेवाला पायपीट करीत घरी यावं लागलं. त्या काळांतमनमाड दौंड-पुणे-मुंबई पॅसेंजर ही एकच गाडी नगर स्टेशनांत यायची. मुंबईकडे जाणारी गाडी दुपारी चार वाजतां तर मुंबईहून येणारी गाडी रात्री नऊ वाजता स्टेशनांत यायची. बहुतेक दुकानं रात्री आठला बंद व्हायची. त्यामुळे आठ नंतर रस्त्यांवर एकदम शांतता. एरवी देखील नऊ म्हणजे रात्र सुरू झालेली. आम्ही मुलं शांतपणे अभ्यास करीत किंवा कांहीतरी वाचत बसायचो. बायाबापड्या ओट्यावर बसून गप्पा मारीत बसत. अशावेळी रस्त्यावर टांग्यांच्या वर्दळीचा आवाज यायला लागला की आम्ही ओळखायचं की, मुंबईची गाडी आली. ज्यांच्या घरचं कुणी माणूस पुण्या-मुंबईहून येण्याची शक्यता असायची त्या घरांतील मंडळी एखादा टांगा आपल्या घराकडे वळतोय कां याची वाट पहायचे.

माझे वडिल दुकानाच्या कामानिमित्त मुंबईला अधून-मधून जायचे. असेंच एकदा मुंबईला गेले आणि जवळ-जवळ महिना-दीड महिना ते परतले नाहीत कि, त्यांचं पत्रही नाही. आम्ही काळजींत होतो. शेजारचे-पाजारचे लोकही 'काकांची काय खबर ?' म्हणून चौकशी करायचे. टेलिफोन त्यावेळी नव्हताच कुणाकडे. त्यांची तब्येत बरी नव्हती आणि घरच्यांना काळजी.नको म्हणून त्यांनी कळवलं नव्हतं. पण नंतर त्यांचं पत्र आलं को, मी अमुक दिवशी सकाळी मुंबईहून निघून घरी येत आहे.

मी रहात असे त्या गल्लीचं नांव 'इमारत कंपनी', शहराच्या मध्यभागांत असलेल्या या वस्तींत वैद्य, आठवले, लेले, लचके, चंगेडे, बोगावत, नारायणन् अशी वेगवेगळ्या जाती- जमातीचे लोक अत्यंत गुण्यागोविंदानं रहात असू. जणू एक विशाल कुटुंबच.

वडिल आले त्या दिवशी आख्खी वस्ती जागी होती. समोरच रहात असलेल्या डॉ. आठवलेंनी येऊन त्यांची प्रकति तपासली औषध वगैरे दिलं. वडिल झोपले पण त्यानंतरही पांच-सात जणांचा घोळका बाहेरच्या गॅलरीत बसून होता. काही लागलं तर? ही प्रत्येकाला काळजी.

अहमदनगर हे आपलं गांव. या भावनेने नगरबद्दल जसं एक खास प्रेम, आकर्षण, आपलेपणा तशीच नितांत आपुलकीची भावना मी रहात असलेल्या इमारतकंपनी या गल्लीबद्दल. कधीतरी १९३०-३२ च्या सुमारास आम्ही तिथं रहायला आलो. नव्या बांधलेल्या इमारतींमध्ये पाहिले भाडेकरू म्हणून आलेल्यांपैकी आमचं एक कुटुंब, 'जागा भाड्याने देणे आहे'. असे फलक अनेक घरांवर लावलेले दिसायचे. नगरच्या अगदी मध्यवर्ती भागांतील ही जागा. कापड बाजार, भाजी मार्केट आणि जैन मंदिर सगळं कसं हाकेच्या अंतरावर. लाईट, पाण्याची उत्तम व्यवस्था आणि इतक्या सुंदर मोक्याच्या जागी चार प्रशस्त खोल्यांचा ब्लॉक भाड्याने घेतला. भाडे किती माहीत आहे ? दरमहा ११ रूपये ! ज्या जागेवर ही इमारत बांधली तेथे पूर्वी बस स्टॅन्ड होता. म्हणजे मोकळं मैदानच. त्या

मैदानावर जाहीर सभाही व्हायच्या. असं सांगतात की, "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे...", ही घोषणा लोकमान्य टिळकांनी याच मैदानावर भाषण करताना केली. त्याच मातींत खेळण्यात पंधरा-सोळा वर्ष गेली. त्या मातीच्या पुण्याईमुळेंच देशभक्तीचा लहानसा अंश माझ्यांत भिनला. आता मैदान नव्हतं. दोन समोरा समोरच्या इमारती आणि मध्ये मोकळी जागा होती. त्या जागेंत मुलं खेळायची. आमच्या घरांत गुजराती बोली भाषा. त्यामुळे बालवयांत गुजराती भाषा फक्त यायची. इमारत कंपनीत इतर लहान मुलं खेळायची 'त्यांच्याबरोबर मीही खेळायला लागलो. नाना दुराफे, सुधाकर टिंबे, नारायण काकिर्डे व इतर मुलांबरोबर खेळताना भाषेची अडचण जाणवल्याचें मला आठवत नाही. इतकंच काय पण त्यांच्या सोबतींत राहून मराठी भाषा कधी आणि केव्हां अवगत झाली हे देखील सांगू शकणार नाही. कांतीलाल, मिश्रीलाल, हस्तीमल, राधेश्याम या अन्य गुजराती, मारवाडी मित्रंसोबतही आमच्या सर्वांची भाषा मराठीच. मी मुद्दाम मराठी शिकायला कुणाकडे गेलो नाही कि कुणी मराठी शिकवायला माझ्याकडे आलं नाही. हुतूतू, लंगडी, भोवरा आणि गोट्या या सारखे खेळ आम्ही खेळायचो. नगरला गुजराती माध्यमाची फक्त एकच प्राथमिक शाळा होती. मी त्या शाळेत जात असे. बाकीची मुलं मराठी शाळेत जायची. आम्ही मुलं अभ्यास करायला देखील गच्चीवर एकत्र बसायचो. प्राथमिक शाळेत अभ्यास तो कसला ? पाढे लिहिणे, पाठ करणे, चालीत कविता म्हणणे, कित्ता गिरवणे हा आमचा त्या काळातला अभ्यास. ज्याप्रमाणे मराठी भाषा बोलायला आपोआप शिकलो त्याचप्रमाणे बाकीच्या मुलांचं बघून मला नकळत मराठी लिहिता-वाचताही येऊ लागलं. त्यासाठी मी मुद्दाम असा कसलाही प्रयत्न केला नाही. फक्त एक गंमतीशीर आठवण सांगताना आजही हसू येते. मराठीत ख म्हणजे र व असे जोडून लिहितात हे सुरवातीला मला कळत नसे. स्स्त्यांतून जाताना 'दवाखाना' ही पाटी मी 'द वा र वा ना' असं वाचायतो आणि ही पाटी लावलेले डॉक्टर नगर सोडून कुठं तरी रवाना होणार आहेत अशी मी समजूत करून घ्यायचो. मनांतल्या मनांत आश्चर्य वाटायचं की हे सगळे डॉक्टर गांव सोडून का जात आहेत. गप्पा मारताना मित्रांना मी माझी शंका विचारली. सर्वनण पोट धरून हसले आणि मला सर्व समजवून दिलं. अशा रीतीने मी मराठीतील ख अक्षर शिकलो. मराठी भाषा, अक्षरे, वाक्ये हसत खेळत आणि नकळत शिकता-शिकता मराठी गाणी, संस्कृत श्लोक, कविताही मित्रांच्याकडून ऐकून ऐकून त्यांच्याबरोबर गाऊन आपोआप शिकलो. नुसती शिकलो नाही त्यांच्याशी एकरूप होत गेलो. माझ्या मुलांना मात्र ही अडचण आली नाही. काळाचौकी येथील शिवाजी विद्यालयात मराठी माध्यमातून तिन्ही मुलं शिकली. नुसती शिकली नाहीत, स्कॉलरशिपही मिळवली. त्यांचा अभ्यास घेताना माझं बालपण आठवायचं. मला आठवतंय, “खबरदार जर टाच मारूनि जाल पुढे चिंधड्या उडवीन राई राई एवढ्या" ही कविता म्हणताना अंगात वेगळाच जोश संचारायचा. आम्ही मुले सुट्टीच्या दिवशी धोतराचा किंवा साडीचा पडदा करून स्टेज सेट उभा करायचो. या स्टेजवर शिवरायाच्या जीवनातीले प्रसंग, रामायण, महारभारतातील प्रसंग आमच्या कुवतीनुसार रंगवायचो. काठीचा घोडा, हातात लाकडी तलवार असा सगळा जामानिमा करून ती कविता नाट्यरूपाने सादर करायचो. आठ-दहा मित्रांपैकी दोन स्टेज वरची पात्रे अन् बाकीचे प्रेक्षक ! आळीपाळीने सगळ्यांनी वेगवेगळ्या भूमिका करायच्या. कधी कृष्ण आणि पेंद्या व इतर सवंगडी बनून खेळायचे. कपडे

बांधलेलं गाठुडं म्हणजे गोवर्धन पर्वत उचलायचा. तर कधी रामायणांतील प्रसंग रंगवायचे. रामायणांतील पात्रांपैकी हनुमान बनणं बहुतेकांना खूप आवडायचं.

त्या काळांत प्रसिद्ध रामलीला-मंडळांमार्फत ठिकठिकाणी रामलीला व्हायच्या आणिती पहायला लहानांपासून थोरांपर्यंत सगळे गर्दी करायचे. व्यासपीठ, पडदे वगैरे कांही नाही. थोडीशी मोकळ्या मैदानासारखी जागा ती मंडळी निवडायचे. संध्याकाळी त्या जागेवर सडा घालून, सारवून ती जांगा स्वच्छ करायचे, रांगोळीने एक वर्तुळ आखायचे. ते वर्तुळ म्हणजे रामलीलाचं स्टेज. आणि त्या वर्तुळाभोंवती चारही बाजूला किंवा तीन बाजूंना प्रेक्षकांनी मांड्या घालून बसायचं, रामलीला सुरू व्हायच्या तास-अर्धा तास आधी आम्ही मुल पुढची जागा धरून बसायचो. एकदा आमच्या गल्लीत रहाणाऱ्या जगू शर्माच्या वडिलांनी रामलीलातील कलाकारांना आपल्या घरी फराळाला बोलावलं. बातमी पसरायला वेळ लागला नाही. त्या कलाकारांना विशेषत: 'राम' आणि 'सीता' चं दर्शन घ्यायला लहान-थोरांची झुंबड उडाली. सीताचं पात्रही पुरूषच करायचे. त्याच्या चेहऱ्यावर कायम राहिलेल्या मेकअपमुळे हीच ती सीता असं ओळखू येइ. काही बायाबापड्या तर अक्षरश: राम-सीतेचे चरणस्पर्श करायला पुढे सरसावल्या !

रामलीलावरून आठवलं, नगरमध्ये मोहरम आणि ताबूतांच्या मिरवणुकोला खूप महत्व आहे. असं सांगतात की, कोटला मैदानावरून जेव्हा ताबूतची मिरवणूक सुरू व्हायची तेव्हा, मुसलमानांबरोबर हिंदूचा हात लागल्याशिवाय ताबूत उठत नसत. म्हणजे उचलणं अशक्य होई. या मिरवणुकीत अंगावर काळे-पिवळे पट्टे रंगवून व कमरेला शेपुट लावून नाचणारे वाघ हे प्रेक्षकांचं विशेषत: मुलाचं आकर्षण असे. या वाघामध्ये कोण गफूर, कोण उमर, कोण सदा अन् कोण तुका हे ओळखण अवखड असायच. एकदा गंमत झाली. एक वाघ नाचता नाचता हातवारे करून उड्या मारू लागला. लोकांना वाटलं की हा नृत्याचाच प्रकार आहे. नंतर कळलं की त्याला विंचू चावला होता. त्या काळात विंचू, कुठे, केव्हा निघेल याचा नेम नसे. मी धावलो, ख्रिस्त गल्लीत रामुमहाराज रहायचे. विंचू उतरवणारे महाराज म्हणून सगळ गाव त्यांना ओळखायचं. माझ्या एका मित्राचे वडिल होते ते. ते नुकतेच आडवे पडलेले. मी धावत आलेलो पाहून त्यानीच मला विचारलं, 'काय जेठू! विंचू चावला वाटतं?" मी म्हटलं काका, मला नाही वाघाला विंचू चावलाय....", काय? वाघाला ?"

ताबूतमधील एका वाघाला विंचू चावल्याचा मी खुलासा केला अन् काका ताडकन् उठून शर्ट घालून धावत सुटले माझ्या बरोबर... कसला तरी मंत्र म्हणत विंचू चावला होता त्या पायावर आपला हात त्यांनी फिरवला अन् वाघ ठणठणीत बरा झाला. या रामुमहाराजांचं आणखी एक वैशिष्ट्य होतं. रोज सकाळी पहाटे उठून नगरपासून शेंडी गांवापर्यंत धावत जायचं. तिथेच एका गवळ्याच्या तबेल्यात जाऊन म्हशीच अच्छेर म्हणजे अर्धा शेर (अर्धालीटर) धारोष्ण दूध प्यायचं अन् परत यायचं. हा त्यांचा नित्याचा कार्यक्रम असे. अशी आगळीवेगळी वैशिष्ट्ये असलेली बरीच माणस नगरमध्ये त्या काळांत होती.

प्रकरण - ३

# मनाची श्रीमंती

माझ्या अगदी बालपणी म्हणजे १९३५-४० च्या काळात बालमित्रांबरोबर खेळणं हा एकच विरंगुळा. टी.व्ही. तर नव्हताच त्या काळात पण रेडिओ देखील अगदीच मोजक्या लोकांजवळ असे. मोठ्या मुलांपैकी काही जण तालमीत जात. म्हणजे हल्ली लोक जसे जिम मध्ये जातात त्याप्रमाणे. अर्थात त्या काळांत तालमीत आजच्यासारखी आधुनिक उपकरणे नसायची. तालमीत मुख्य म्हणजे मध्यभागी लाल मातीचा हौद असायचा. त्या मातीत कुस्त्या खेळायच्या. हौदाच्या बाहेर चारही बाजूनां जोर व बैठका मारायची सोय. जोर काढण्यासाठी हाताला आधार देण्यासाठी विटा किंवा लाकडी ठोकळे असायचे. तवकल वस्तादची तालीम, अमदुभाई वस्तादची तालीम अशी वस्तादांच्या म्हणजे गुरूंच्या नांवे तालमींची लोकांना ओळख असे. अगदी गरीब पोरंदेखील तालमीत व्यायाम करायला येत. अहमदनगरमधील सुप्रसिद्ध शाळा म्हणजे सोसायटी हायस्कूल. या शाळेची तालीम बघण्यरासारखी होती. व्यायाम करताना सबंध शरीर आरशांत दिसेल अशी व्यवस्था असलेली ती एकमेव तालीम होती. प्रत्येक तालमीत काही जुने जाणकार व नावाजलेले पहिलवान असायचे. नव्याने तालमीत येणाऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्याकडून व्यायाम करून घ्यायचे. वेळप्रसंगी दोन रट्टे देखील द्यायचे. व्यायाम संपला की, घरी परतताना त्या गुरूरूपी पहिलवानांचा एक : सल्ला ठरलेला असायचा. पोरा, चहा कॉफी पिऊ नको खुराक घेत जा. दूध पीत जा. खुराक हा तालमीवाल्यांचा खास शब्द.. बदाम, पिस्ते, मलईची बरफी किंवा गुळ-शेंगदाणे म्हणजे खुराक. ज्याने त्याने आपापल्या ऐपतीप्रमाणे खुरक खायचा. अनेक मित्रांप्रमाणे मीही साखरमिश्रीत गरम दूध प्यायचो. पण नंतर पहिलवानांच्या सल्ल्यानुसार तेही बंद केलं. व्यायामवगैरे आटोपला की, गवळीच्या वाड्यावर जायचं. आपल्या देखत गवळी म्हशीची धार काढायचा आणि ते धारोष्ण दूध तांब्यातून प्यायचं. रोज सकाळी लोक आपापलं भांड घेऊन दूध घ्यायला गवळ्याकडे येत. संध्याकाळी घरी दूध विकत घेणारेही खूप लोक असायचे, गवळी आपली म्हैस आणि डोक्यावर म्हशीला द्यायच्या खाद्याची पाटी किंवा चारा घेऊन दारी यायचे आणि गिऱ्हाईकादेखतं म्हशीची धार काढून ठरलेल्या रतीबाप्रमाणे दूध देऊन पुढे जायचे

सणावाराला किंवा कांही प्रसंगानिमित्त हाती एक आणा-दोन आणे आईवडिलांकडून मिळाले तर त्यातून मलईची बर्फी किंवा जिलेबी विकत घेऊन खायची. एक पैशाला दोन मोठ्या जिलब्या मिळायच्या. शिवाय त्या जिलब्यांबरोबर मूठभर शेव फूकट. हिवाळ्याच्या दिवसांत रोज नेमाने अर्धा-पाऊण शेर (लिटर) दूध किंवा पावशेर (पाव किलो) बफीचा खुराक घेणारे बरेच तरूण होते.

जिलबीबरोबर जशी शेव फुकट मिळायची त्याचप्रमाणे गंजबाजारांत भाजी आणायला गेलो की, भाजी कितीही कमी जास्त घ्या त्याच्याबरोबर हिरवीगार कोथिंबीर आणि मिरची फुकट मिळे. जुडीतून कोथिंबीरीच्या काड्या ओढून किंवा तोडून भाजीवालीबाई जेव्हां द्यायची तेव्हा त्या कोथिंबीरीचा सुगंध हटकून नाकांत जायचा. ज्यांच्या घरी गाय किंवा म्हैस असे अशा बऱ्याच लोकांच्या घरी

शेजाऱ्यांनाच नव्हे तर येणाऱ्या अनेकांना ताक फुकट वाटले जाई. ही फुकटची चंगळ आता राहिली नाही. तरी देखील मुंबईच्या महागाईच्या मानाने नगरांतील जीवन आजही स्वस्तच आहे.

नुसती स्वस्ताई नाही तर एकंदरीतच शांत, सुरक्षित, प्रकृती स्वास्थाला अत्यंत पोषक असं नगरमधील वातावरण. कोरडी हवा, प्रदुषणयुक्त हवामान. गर्दी-गोंधळ नाही, धावपळ नाही, हिवाळा, पावसाळा, उन्हाळा सर्वच ॠतुंची खास वैशिष्ट्ये नगरमध्ये निश्चित अनुभवता येतील. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा - तिन्ही ॠतुंचा वेगवेगळा आनंद नगरमध्ये मी लुटलाय. उन्हाळ्यात मुंबई सारख्या घामाच्या धारा लागत नाहीत. पण साधारणपणे १२ ते ४ घराबाहेर पडायची सोय नाही. सर्वत्र शुकशुकाट परंतु सकाळच्या वेळी मात्र बाहेर फिरून आलात की एकदम फ्रेश! गावाच्या बाहेर अनेकांचे मळे आणि त्या मळ्यांत पाण्याने तुटुंब भरलेल्या विहिरी असायच्या. पाच-सात मित्र मिळून सायकलीवरून त्या मळ्यांत जायचं अन् तासन् तांस त्या विहिरींमध्ये पोहायचो. विहिरींत उडी मारण्याचेही सूर, सुळका, मुटका असे वेगळे वेगळे प्रकार असायचे. आता ते मळे नाहीत आणि विहिरीदेखील नाहीत. रात्रीच्या वेळी गच्चीवर झोपायचं आणि आकाशांतील असंख्य तारे-चांदण्या पहाण्यांत हरवून जायचं. नगरमध्ये प्यालेल्या ऊसाच्या रसाची चव तर मला मुंबईत कधीच मिळाली नाही.

नगरमधील पावसाळा तो कसला? सरासरी पावसाचे प्रमाण ८ ते १० इंच फक्त. पण दोन-चार वेळा पाऊस पडून गेला की वातावरणांत गारवा पसरतो. पावसाच्या पाण्याने भिजलेले त्यावेळचे मातीचे रस्ते आणि मैदाने व त्याचा अनोखा सुगंध काय वर्णावा! पावंसाळ्यापासूनच वातावरणांतील उकाडा संपू लागतो. मुंबईत मात्र बाहेर पाऊस कोसळत असतानाही अंगातून घामाच्या धारा लागतात.

शनिवारी सकाळची शाळा असल्यामुळे लवकर उठावे लागे. बिछान्यांतून अंगावरची रजई न काढताच. आईला विचारायचो की गरम पाणी आंधोळीला बाथरूममध्ये काढलं का? आणि आईकडून होकार मिळाल्यावरच पांघरूणासह बाथरूम गाठायचं. असा हा डिसेंबर-जानेवारीतील नगरचा हिवाळा. स्वेटर, कोट, मफलरसह शाळेत जाताना देखील रस्त्यातून जाताना शक्य तो उन्हांतून चालत जायचं. रात्री तर आठ वाजल्यानंतर सगळं सुमसाम. ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या आणि त्या भोवती कुडकुडणाऱ्या लोकांचा घोळका. थंडीमुळे माझ्याप्रमाणे अनेकांचे ओठ व गाल फाटायचे. मुंबईत कधीतरी दोन-चार दिवस थोडीशी थंडीची चमक दिसते तसा हिवाळा नगरमध्ये नाही. तीन-चार महिने सतत दिवसरात्र मस्त थंडी पडते.

त्यामुळे तब्बेतीच्या दृष्टीने तर नगर एक आदर्श गांव. आमच्या लहानपणी सर्दी-खोकला ताप या सारख्या मामुली तक्रारी खेरीज गंभीर आजाराचे प्रकारही फारसे कधी पाहिले नाहीत. बरं साध्या आजारपणांत एकतर घरगुती देशी उपचार किंवा वैद्यांकडून आणलेल्या पुड्या. डॉक्टरांकडे जाण्याचे प्रसंग क्वचित. वैद्य आणि देशी औषधांवरून माझ्या घरातच घडलेला एक प्रसंग आजही आठवतो.

माझी मोठी बहीण, बचीबेन म्हणजे मला आईसमान. माझी मार्गदर्शक, माझा आधार. माझी गुरू. सर्व काही! बालपण तिच्याच सानिध्यांत, तिच्याशी खेळण्याबागडण्यांत गेले. प्राथमिक शाळेत माझं नांव घातलं तेव्हां तिच्याच बरोबर शाळेत जाऊ लागलो. ती चौथींत अन् मी बिगारीत. ती चौथी पास झाली. त्या काळातील प्रथेनुसार लिहिला-वाचतां येऊ लागलं हे मुलींच्याबाबतींत खूप झालं. शिवाय गुजराती शाळेंत अधिक शिक्षणाची सोयही नव्हती. त्यामुळे तिचं शिक्षण बंद झालं. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झालं आणि बहीण शाळेत येणार नसेल तर मीही शाळेत येणार नाही असा मी हट्ट धरला. वडिल आणि माझे मामा मला अक्षरशः उचलून कांही दिवस शाळेत नेऊंन सोडायचे. माझा भोकाड पसरण्याचा कार्यक्रम चालूच असायचा. माझा हा आडमुठेपणा शेजार-पाजारच्या सर्वांना माहीत झाला. त्यांनी नंतर एक शक्कल काढली. गुजराती शाळेच्या शेजारीच मराठी प्राथमिक शाळा होती. त्या शाळेत माझ्या गल्लीतील दोन मुलें जात होती. त्या मुलांच्या आया शाळेच्या वेळेच्या अर्धातास आधीच त्या मुलांना पाटीदप्तर घेऊन माझ्या घरी पाठवायची. शिखांत शेंगदाणे, बोरं, पेपरमीटच्या गोळ्या असं काहीना काही असायचं. मग ते खात खात मी देखील त्यांच्याबरोबर शाळेत जाऊ लागलो. शाळा सुटायच्या वेळी बहीण गॅलरीत माझी वाट पहात उभी असायची.

माझ्या बहीणीचं - बेचीबेनचं लग्न झालं तेव्हा. मी चौथीत/पाचवीत असेन. लग्नं होऊन ती अकोल्याला (विदर्भातील) गेली. घरं सुन्न झालं. मला तर घर खायला उठायचं. काही महिन्यानंतरच बहीण व भाऊजी नगरला येणार असं कळलं तेव्हा त्यावेळी पला आनंद झाला होता. पण खर तर आनंद मानण्यासारखी परिस्थिती नव्हती. कारण भाऊजींना क्षयरोग (टी.बी.) झाला होता. रोग खूपच पसरला होता. त्या काळांत टी.बी. हा असाध्य रोग होता. आज जसा कन्सर समजला जातो तसाच क्षयरोग. क्षयरोग बरा करणारी कोणतीच औपधे त्या काळांत डॉक्टरांजवळ उपलब्ध नव्हती. अकोला नागपूरच्या डॉक्टरांनी हात वर केले होते. हा रोगी दोन-चार महिन्यांचा सोबती आहे असे नातेवाईकांना सांगून टाकले होते. माझ्या आईवडिलांच्या, बहिणीच्या डोक्यावर दु:खाचा पहाड कोसळला होता. पण माझे वडिल अत्यंत धीराचे. हिंमत कधीही न खचणारे.

वडिल अकोल्याला जाऊन बहिणीला आणि भाऊजींना घेऊन नगरला आले. भाऊजी म्हणजे नुसता हाडांचा सापळा झालेले. डोळे खोल गेलेले. खोकताना सगळ्या बरगड्या स्पष्ट दिसायच्या. त्याकाळी डॉ. बोरजीस हे नगरमधले नांवाजलेले डॉक्टर होते. मुंबईतील टाटा हॉस्पिटलचे प्रमुख म्हणून नंतर प्रसिद्ध झाले ते हेच डॉ. बोरजीस. त्यांना भाऊजींची प्रकृति दाखवली. डॉक्टरांनी बारकाईने तब्येत तपासली. छातीचे एक्स-रे काढले. ते पाहिले. अन् वडिलांना बाजूला घेऊन म्हणाले रोग खूप पसरला आहे. अँलोपॅथीजवळ तरी काही ईलाज नाही, सॉरी.

तरी वडिल खचले नाहीत. नगरमध्ये आयुर्वेदाचार्य गुणेशास्त्री प्रसिद्ध होते. पुढे आफालि (आयुर्वेद फार्मसी लिमिटेड) ही कंपनी त्यांनीच स्थापन केली. वडिल त्यांना जाऊन भेटले. सगळी

हकिकत सांगितली. शास्त्रीबुवांनी पेशंटला सकाळी सात वाजता घेऊन यायला सांगीतलं. मी वडिल व भाऊजीबरोबर गेलो. शास्त्रीबुवा आंधोळ-देवपूजा वगैरे आटोपून कपाळावर भला मोटा गंध लावून पांढऱ्या शुभ्र गादीवर विराजमान झाले होते. भाऊजींना जवळ बोलावल. पाठीवरून प्रेमाने हात फिरवला व नाडी हातांत घेतली. शांतपणे दहा मिनिटे नाडी तपासली. शास्त्रीबुवा म्हणाले केस नाजूक आहे. पण घाबरू नका. देवावर विश्र्वास ठेवा आणि मी देईल ती औषधे घ्या. पथ्य मात्र पाळावी लागतील.

थरथरत्या हडकुळ्या हातांनी भाऊजींनी शास्त्रीबुवांचे पाय धरले. घाबरू नकोस बाळ असे सांगून शास्त्रीबुवांनी औषधोपचाराची कल्पना वडिलांना दिली. स्वतःच्या हाताने बनविलेल्या औषधाच्या पुड्या दिल्या. पुडीतील पावडर व सोन्याचा वरख मधांत मिसळून ती घ्यायची. दिवसांतून चार वेळा औषध घ्यायचं.

पथ्यपाणी मात्र कडक होतं. गाईंच्या दुधातून बनविलेलं ताक फकत प्यायचं. त्याशिव बाकोचूं सर्वकांही खाणं आणि पिणं बंद. ताक मातर हवं तेवढं प्यायचं. अगदी हँडाभर प्याला तरी हरकत नाही. गाईचं दूध मिळवण्यांत अडचण नको म्हणून वडिलांनी एक गायच विकत घेऊन टाकली. उपचार सुरू झाले. हळू हळू प्रकृतीत सुधारणा दिसू लागली मधून मधून शास्त्रीबुवांना प्रकृति दाखवली जात होती. तीन ते चार महिने गेले. खोकणं बंद झालं, वजन वाढलं होतं. चेहऱ्यावर लाली दिसू लागली होती. शरीरांत उत्साह संचारू लागला होता. झोप, शांत लागत होती. हिंडू, फिरू शकत होते. शास्त्रीबुवांना तब्येत दाखवली. त्यांनी पुन: एकदा नाडी तपासली. प्रकृतीत झालेल्या सुधारणेने शास्त्रीबुवा समाधानी होते. ते म्हणाले ही सारी ईश्वराची कृपा. अशीच काळजी घे. तू नक्की पूर्ण बरा होशील. पण लक्षात ठेव... आणखी दीड-दोन महिने औषधे घ्यायची होती.

वडिल भाऊजींना घेऊन पुन: डॉ. बोरजीसांना भेटायला गेले. डॉक्टर पेशंटकडे बघतच राहिले. आपण कांही महिन्यांपूर्वी पाहिलेला हाच तो पेशंट यावर त्यांचा विश्वास बसेना. छातीचे एक्स-रे काढले गेले. काय आश्चर्य! अगदी थोडा रूपयाच्या नाण्याएवढा भाग सोडला तर छाती पूर्णपणे स्वच्छ झालेली! डॉ. बोरजीस वडिलांबरोबर टांग्यांत बसले. गुणेशास्त्रींना भेटले आणि क्टर बोरजीसांनी शास्त्रीबुवांचे चरणस्पर्श करून नमस्कार केला. शास्त्रीबुवांनी भाऊजीना अक्षरश: संजीवनी दिली.

शास्त्रीबुवांचं निदान आणि औषधोपचार अचूक होतं. त्या काळांत टी.बी. चा तिसऱ्या स्तरापर्यंत पसरलेला रोगी बरा करणं हा चमत्कार होता.

अर्थात रोग्याचा संपूर्ण सहकार आयुर्वेदांत आवश्यक असतो. शिवाय नशीब म्हणून काही चीज आहेच. शास्त्रीबुवांनी भाऊजीना दिवाळीला अकोल्याला जायला परवानगी दिली. पण पथ्य पाळण्याची कडक शब्दांत सकत ताकीद दिली. भाऊजीनी मात्र अकोल्याला गेल्यानंतर प्रकृतीकडे दुर्लक्ष केलं. आहार-विहाराच्या सूचना पाळल्या नाहीत. परिणामी तब्येत बिघडली. सासऱ्यांना आणि

शास्त्रीबुवांना कळलं तर काय म्हणतील आपल्याला, या भीतीने आजारपण अंगावर काढलं परिणाम व्हायचा तो झाला. त्यांची जीवनज्योत अकोल्याला मालवली.

माझी बहीण त्यानंतर आमच्याकडेच राहिली. जैन पाठशाळेत शिक्षिका म्हणून काम करायची. शेवटपर्यंत तिचा मला मोस आधार होता.

महादबा नावाचा एक शेतकरी आमच्या घरी दूध आणून देई. रोज एक शेर तर कधी  दीडे शेर दूध घ्यायचो. महिना अखेर हिशेब व्हायचा. एकदा धंद्याच्या दृष्टीने वडिलांना खूप वाईट दिवस आले. कर्जही झाले. वडिल महादबाला म्हणाले, "भाऊ, सध्या एवढं दूध नको. असं कर रोज पावशेर दूध टाकत जा!"

महादबाने काय उत्तर द्यावं?

काका! अहो काय बोलता तुम्ही. घरात शाळेत जाणारी पोरं आहेत. दूध-दुभत्या शिवाय कसं चालेल! तुम्ही पैशाची कायबी काळजी करू नका", आणि महादबा दररोज एक शेर निर्भेळ दूध जवळजवळ वर्षभर देत होता. शिवाय हुरडा आणि खरवसची फुकट सोय महादबाच करायचा. नगरमध्ये दुध, भाजीपाला स्वस्त होताच, फळांच्या बाबतीत सांगायचं तर संत्र-मोसंबी आणि आंब्यांच्या सीझनमध्ये गावठी आंबे देखील सामान्य माणसाला परवडण्यासारखे असायचे. पण आम्हा मुलांचा फलाहार म्हणजे बोरं, जांभूळ, करवंदे हा गावराण मेवा.

पॉकेटमनी हा प्रकारच आम्हाला माहित नव्हता. शाळेत आणि कॉलेजात जाताना देखील खिशांत पैसा नसायचाच. प्रवासाचा खर्च शून्य. सायकलीवर टांग मारली की झालं कपड्यांना इस्त्री असली काय, नसली काय कांही फरक पडत नसे. तुमच्याकडे, तुमच्या कपड्यांकडे कुणी बघणारही नाही.

याबाबतीत माझ्या पत्नीने केलेलं निरीक्षण खूप महत्वाचां आहे, जे मी नगरचा असून माझ्या कधी लक्षांत आलं नाही. ती गुजरातकडची. मी मुंबईत स्थिरस्थावर झाल्यानंतर मुंबईत आमचं लग्न झालं. अहमदनगर हे नांवही तिने कधी ऐकलं नव्हतं. लग्नानंतर मात्र अनेक वेळा नगरला जाणं झालं. सुटीच्या दिवसांत मुक्कामही नगरला असायचा, तर तिने मला एकदा सांगितलं की, 'नगरमध्ये कुणी बाई, मुलगी रस्त्यातून, बाजारांतून जात असेल, कितीही नटली सवरलेली असेल तरी कोणताही पुरुष तिच्याकडे मान वर करून नजरही टाकीत नाही. याच्या उलट परिस्थिती मुंबईमध्ये.' तर असं आहे आमचं नगर. माणसं साधीभोळी सरळ आणि गरीब परंतु मनाची आणि संस्कारांची मात्र श्रीमंती आहे.

*********************************

प्रकरण - ४

# ती शाळा, ते शिक्षक

गुजराती प्राथमिक शाळेतून चौथी इयत्ता पास झालो आणि पुढच्या शिक्षणासाठी हायस्कूलमध्ये प्रवेश घेण्याचा प्रश्न माझ्या पुढे उभा राहीला. कारण गुजराती माध्यमाचे एकही हायस्कूल नगरमध्ये नव्हते. माझ्या बरोबरच मराठी शाळेतून चौथी पास झालेले माझे मित्र सोसायटी हायस्कूलांत प्रवेश घेणार होते. मी देखील त्या दोनचार मित्रांबरोबर सोसायटी हायस्कूलांत गेलो. विद्यार्थ्यांचा किंवा पालकांचा इन्टरव्हू, डोनेशन, कुणाचा तरी वशिला अशी कांहीही भानगड नव्हती. आम्ही मुलें मिळूनच सोसायटी हायस्कूलच्या ऑफिसांत गेलो. पोळ मास्तरांनी आम्हाला फॉर्म दिले आणि भरून द्यायला सांगितले. शाळेच्या ऑफिसांतीलच टांक-दौत घेऊन आम्ही फॉर्म भरून दिले. माझ्या खेरीज बाकीच्या मुलांचे फॉर्म तिथल्या तिथं मंजूरही झाले. मी गुजराती शाळेतून आलो होता ना? मराठी माध्यमाच्या शाळेत कसं शिकणार हा पोळसरांचा प्रश्न. मी त्यांना सांगितलं कौ सर गुजराती हायस्कूलच इथं नाहीये. त्यांनी मला हेड-मास्तरांना भेटालया सांगितलं. मी फॉर्म घेऊन क्षीरसागर हेडमास्तरांना भेटायला गेलो. प्रशस्त केबीन. केबिन कसली हॉलच म्हणाना. पांढरा शुभ्र कोट, धोतर, डोक्यावर तपकिरी टोपी. शिडशिडीत देह पण अत्यंत प्रभावी व्यक्तिमत्व. नाकावरच चष्मा उतरवून त्यांनी मला येण्याचं कारण विचारलं. मी सरांना सर्व हकिकत सांगितली. त्यांनी माझा फॉर्म पाहिला. आणि म्हणाले, 'हे पहा बाळ, तुला प्रवेश तर देतो पण सहामाही परीक्षेत नापास झालास तर मात्र नांव काढून टाकलं जाईल. घरी वडिलांना हे सांग आणि मग उद्या फी भरून टाक. काय समजलं' ? मी सरांना नमस्कार केला आणि बाहेर आलो. दुसऱ्या दिवशी आख्खे दोन रूपये फी भरून सोसायटी हायस्कूलांत इंग्रजी 'पहिलीत म्हणजे हल्लीच्या पाचवीत प्रवेश घेतला.

सोसायटी हायस्कूल म्हणजे नगरकरांना अभिमान वाटावा अशी एक भव्य-दिव्य संस्था. विस्तीर्ण परिसर. त्या परिसराच्या मध्यभागी टॉवर असलेली शाळेची मुख्य इमारत. या शिवाय वेगवेगळ्या तीन चार इमारती. तीन मैदाने. एक व्यायाम शाळा. इंग्रजी पहिलीच्याच ए.बी.सी.डी.ई.एफ. अशा सहा तुकड्या होत्या. प्रत्येक तुकडीत ३५ ते ४० विद्यार्थी. माझ्या दोन-तीन मित्रांना पंहिली ए मध्ये तर मला पहिली डी मध्ये प्रवेश मिळाला होता. या वर्गात माझ्या ओळखीचा एकही विद्यार्थी नव्हता. छोट्याशा प्राथमिक शाळेतून एवढ्या मोठ्या शाळेत आल्यानंतर सुरवातीला बरेच दिवस गांगरलेल्या, भेदरलेल्या अवस्थेत होतो. म्युनिसिपालटीच्या प्राथमिक शाळे तिसरीत ८-१० आणि चौथींत फक्त सहा जण होतो. दोन्ही इयत्तांची मुले एकाच वर्गात म्हणजे खोलीत बसायचे आणि दोन्ही वर्गाना एकच मास्तर. एका वेळी दोन्ही इयत्तांना शिकवायचे. तिसरीच्या विद्यार्थ्यांना कविता पाठ करा म्हणून सांगितलं की चौथीच्या मुलांना गणिते घालायचे. त्यांची गणिते सोडवून होईपर्यंत तिसरीच्या एकेका विद्यार्थ्याला टेबलाजवळ बोलावून कविता म्हणवून घ्यायचे. अशा रीतीने दोन्ही इयत्ता एकाच वेळी शिकवण्याची कसरत मास्तर बरोबर करायचे. एखादा विद्यार्थ गैरहजर असल्याचं हजेरी घेताना लक्षांत आलं की, त्याचा मित्र कोण? हेही मास्तराना माहित असल्यामुळे त्या मित्राला

त्या मुलाच्या घरी पाठवायचे, तो का आला नाही? याची चौकशी करायची आणि कारण नसताना त्याने दांडी मारली असेल तर त्याला शाळेत घेऊन यायचे अशी दूहेरी जबाबदारी त्या मित्रावर असायची. आणि मास्तरांच्या हुकूमाची अंमलबजावणी करणारा मुलगा देखील पूर्वीच्या राजे महाराजांचा निरोप घेऊन जाणाऱ्या सांडणीस्वाराच्या रूबाबांत मोहिमेवर निघायचा. कारण नसतना दांडी मारण्यांत पटाईत अशी एक-दोन व्रात्य पोरं होती. त्यांना बोलवायला एकाचे ऐवजी दोन मुलांना मास्तर पाठवायचे, कारण मास्तरांचाही हुकूम मानण्यास तो आढेवेढे घेऊ लागला, कांहीतरी सबब सांगू लागला, तर दोघांनी त्याला अक्षरश: उचलून आणावं अशी मास्तरांची सकत ताकीद असायची.

पण हायस्कूलातलं सगळं तंत्र, वातावरण एकदम वेगळं. एकेका वर्गात ४० मुले. वर्ग शिक्षकांखेरीज सायन्स, हिंदी, ड्राईंग याविषयांसाठी वेगवेगळे शिक्षक होते. आम्हाला चितांबर नावाचे वर्गशिक्षक होते. अत्यंत कडक अशी त्यांची ख्याति होती. पण इंग्रजी विशेषत: इंग्रजी व्याकरण शिकवावं ते चितांबर सरांनीच. मराठी माध्यमाच्या शाळेत शिकून देखील कॉलेजांत इंग्रजीमाध्यतांमूत शिकतांना किंवा पुढील आयुष्यांतही मला इंग्रजी भाषेची अडचण कधी जाणवली नाही किंवा न्यूनगंड जाणवला नाही याचं बरंचस श्रेय चितांबरसरांच्या शिकवण्याला दिलं पाहीजे. स्वत: तर चांगलं शिकवायचेच. शिवाय त्यांनी वर्गातील ५-६ हुशार मुलं निवडून प्रत्येकाकडे उरलेल्या मुलांपैकी ५-६ मुले सोपवायचे. शनिवारी सकाळची शाळा असे. शाळा सुटल्यानंतर हे पाच, सहा गट वेगवेगळ्या ठिकाणी बसायचे. कांही गट वर्गातच तर कुणी बाहेर झाडाखाली. हुशार मुलाने त्याच्या गटांतील मुलांकडून अभ्यास करून घ्यायचा. त्यांना इंग्रजी शिकवायचं. सर स्वतः टीचर्सरूममध्ये असायचे. कांही अडचण असेल तर त्यांना जाऊन सांगायचं.

सायन्स हा तसा अवघड आणि भाषा विषयाच्या तुलनेने निरस विषय. पण हसत-खेळत रोजच्या जीवनांतील उदाहरणें देत सायन्स सारखा विषय शिकवला पटवर्धन आणि अष्टेकर सरांनी. ५वी अ च्या वर्गाचे शिक्षक होते डबीरसर. आमचे शिक्षक गैरहजर असल्यामुळे हे डबीरसर एकदा गणिताच्या तासाला आले.

अनेक कविता, श्लोक, भाषणे, संपूर्ण गीता वगैरे तोंडपाठ असलेली अनेक माणसं आपण पाहिली आहेत. पण गंणिताचं पुस्तक तोंडपाठ असलेला डबीरसरांसारखा माणूस माझ्या पाहण्यांत नाही. त्या काळांत पाचव्या इयत्तेला गणित म्हणजे फक्त अंकगणित असे. डबीरसर गणित शिकवताना मुलांनो, पान ५६ गणित नंबर-३, एका शेतांत चार मजूर काम करीते होते. प्रत्येको रोजी १ रू. ४ आणे प्रमाणे २० दिवस काम केल्यास? असं गणित सांगायचे. एखादा मुलगा एखाद्या गणिताबाबत कांही प्रश्न किंवा शंका विचारायला गेला की, अरे हे ना पान ३५ वरचं गणित नंबर ५.

पांचव्या इयत्तेची सहामाही परीक्षा येईपर्यंत तर मी हायस्कूलच्या जीवनांत रूळून गेलो. सहामाही परीक्षा संपली आणि शाळेला दिवाळीची सुट्टी लागली. घरची साफसफाई, घरासमोर

सडासमार्जन आणि रांगोळी. शांत अन् पवित्र प्रकाश देणाऱ्या पणत्यांची रोषणाई, दिवाळीच्या आधी आठ-दहा दिवसांपासून घराघरांतून फराळाचे पदार्थ बनविण्यासाठी बायकामंडळींची आनंदाने चाललेली धांवपळ आणि अर्थातच नवे कपडे आणि फटाके विकत घेणे, मित्रांबरोबर किल्ले बनवणे, खेळणे, बागडणे यांत दिवाळीची सुट्टी कधी संपली कळलंच नाही.

सुटी संपली. शाळा सुरू झाली. पहिल्याच दिवशी सहामाही परीक्षेचा निकाल समजणार होता. पहिल्याच तासाला चितांबरसर हजेरी घेत असताना, हेडमास्तरांचा शिपाई रामभाऊ वर्गात आला. 'शहाला सरांनी बोलावलंय', त्याने चितांबरसरांना हेडमास्तरांचा निरोप दिला. सरांनी माझ्याकडे पाहिलं. मी ताडूकन उभा राहीलो.

“काय, शहा ? शाळेत येताना कुठे काही मस्ती वगैरे केली वाटतं", चितांबर सर.

“नाही सर!" ;

'मग ? सरांनी बोलावलंय ते कां ? जा' खाटिकाच्या मागून कोकरू जावं तसा मी रामभाऊंच्या मागे मागे गेलो. भीत, भीत हेडमास्तरांच्या ऑफिसपर्यंत गेलो. मला कांहीही सूचत नव्हतं. कशासाठी हेडमास्तरांनी बोलावलं असेल...

'मे आय कम ईन सर'

'ये'

नाकावरचा चष्मा न काढता चष्म्याच्या वरच्या बाजूला भुवया आणि चष्मा यांच्या मधल्या फटीतून माझ्याकडे बघत सरांनी आंत बोलावलं. मी आंत जाऊन टेबलासमोर गुपचूप, थोडा थरथरत उभा राहीलो. सरांनी चष्मा काढून टेबलावर ठेवला आणि उठून माझ्याजवळ आले. मला घाम फुटला. क्षीरसागरसरांचा कडकपणा आणि कोटाच्या बाहीत लपवत असलेली वेताची छडी आम्हा मुलांना माहीत होती.

'शाब्बास!' असं म्हणून सरांनी माझ्या पाठीवर थाप मारली. जून मध्ये मला प्रवेश देताना त्यांनी मला दिलेल्या इशाऱ्याची, अटीची आठवण करून दिली. आणि कौतुकाने म्हणाले, 'शाबास पोरा ! तुला हिंदीत ५० पैकी ४९ मार्क मिळाले असून तू सर्व डिवीजन्समध्ये पहिला आला आहेस. आणि मराठीत देखील ५० पैकी ४५ मार्क मिळवलेस. Keep it up.

म्हणजे, जूनमध्ये पाचव्या इयत्तेत ज्याला प्रवेश दिला त्या माझ्यासारख्या एका अत्यंत

सामान्य आणि लहान मुलाची आठवण ठेवून सहा महिन्यांनंतर एवढ्या मोठ्या हायस्कूलचा कारभार सांभाळणाऱ्या हेडमास्तरांनी मला बोलवावं आणि माझं कौतुक करावं! क्षणभर काय करावं हे मला समजेना. क्षीरसागर सरांची स्मरणशक्ति, विद्यार्थ्यांबद्दलची आस्था, कारभार, दक्षता, अत्यंत कडक समजल्या जाणाऱ्या सरांच्या मनाची मूदुता.. कशा कशाचं आपण कौतुक करावं ! वाकून सरांना नमस्कार केला आणि आनंदाने धावत वर्ग गाठला.

क्षीरसागर सरांकडे जाण्याचा दुसरा एक प्रसंगही आज आठवतो. मी इंग्रजी दुसरीत म्हणजे सहावीत असतानाची ही गोष्ट. वार्षिक परीक्षा होती. एकेका बाकावर दोन मुले बसतील असे बाक (बेन्च) सर्व वर्गात असायचे. मुलांनी कॉपी करून नये म्हणून परीक्षेची व्यवस्था अशी असायची की एका बाकावर एकाच इयत्तेतील दोन विद्यार्थी शेजारी शेजारी नसायचे. एक पहिलीचा तर शेजारचा दुसरा तिसरीतील. मी (सहावीत) इंग्रजी दुसरीत तर मी ज्या वर्गात परीक्षेला बसणार होतो तिथे आमच्या शेजारी इंग्रजी चौथीचे म्हणजे आठवीचे विद्यार्थी होते. प्रत्येक बाकावर एक सहावीचा अन् एक आठवीचा विद्यार्थी अशी सोय केली होती. मी हुशार मुलांपैकी एक समजला जाई. दररोज एक विषय आणि परीक्षेची वेळ सकाळी साडेसात ते साडे दहा अशी होती.

त्या दिवशी गणिताचा पेपर होता. मी बिनधास्त होतो. शंभरपैकी ९०-९५ मार्क नक्की मिळवणार अशी मला आणि माझ्या मित्रांनाही खात्री होती. पण प्रश्नपत्रिका हातांत पडली. त्यावर मी ननर फिरवली आणि मला कोणता प्रश्न आधी सोडवावा हे समजेना. एकापेक्षा एक अवघड प्रश्न पाहून मी तर गर्भगळित झालो. पण तरीही जेमतेम, जेमतेम मी अर्धा, पाऊण पेपर सोडवला. वेळ संपली. पेपर दिला आणि घाम पुशीत मी बाहेर आलो. बाकीची मुलेही आली. माझ्या वर्गातील माझे तीन-चार मित्र भेटले. सगळे खुशीत असल्याचे पाहून मला आश्चर्य वाटले. कसा गेला पेपर? मी विचारलं. "झकास" ! हे उत्तर ऐकून मी सर्दच झालो. आणि मग कोणता प्रश्न, त्याचं उत्तर काय, याविषयी मित्रांशी बोलताना लक्षांत आलं की, त्यांच्या प्रश्न पत्रिकेतील प्रश्न तर खूप सोपे होते. असं कसं होईल. माझा मिन्न, केदारीने माजी प्रश्नपत्रिका पाहिली आणि कपाळावर हात मारीत म्हणाला अरे शहा हा तर सातवीचा पेपर !

म्हणजे मी सहावीत आणि वार्षिक परीक्षेत पेपर सोडवला सातवीचा! पण हे घडलं कसं हे ईश्र्वरच जाणे ! आमच्या वर्गात सहावी व आठवीचे विद्यार्थी होते. चुकून सहावीच्या ऐवजी आठवीची प्रश्नपत्रिका माझ्या हाती आली असती तर ती चूक समजण्यासारखी होती. पण मध्येंच एक सातवीचा पेपर आणि तोही माझ्या वाट्याला? शेवटी केदारी, बुगे, गाडगीळ हे मित्र आणि मी वर्ग शिक्षक केडगांवकरांना भेटलो त्यांना झाला प्रकार सांगितला. त्यांनी मला विचारलं तू पेपर पाहिला नाहीस का? मी म्हटलं सर, तीन तासांत पेपर सोडवायचा असतो. पेपर हातात पडल्याबरोबर आधी प्रश्न बधायचे. इयत्ता कोण बघतो. सर हेडमास्तरांकडे घेऊन गेले. हेडमास्तरांनाही आश्चर्य वाटलं की, सहावीच्या आणि आठवीच्या प्रश्नपत्रिकांचे गठ्ठे बांधताना हा सातवीचा पेपर मध्ये कसा आला.

त्यांनी मला तिथेच बसायला सांगितलं. एका शिपायला बोलावून माझ्यासाठी थोडं खायला मागवलं. माझ्या मित्रांना विचारलं की शहाचा घरचा पत्ता माहिती आहे का म्हणून आणि मग सरांनी माझ्या घरी एकाच्या मार्फत निरोप पाठवला की यायला उशीर होईल काळजी करू नका. गणिताच्या शिक्षकांना बोलावून नवीन प्रश्नपत्रिका केवळ माझ्यासाठी बनवायला सांगितली आणि नंतर हेडमास्तरांच्याच ऑफिसमध्ये बसवून मला ती प्रश्नपत्रिका सोडवायला दिली. मला आठवतंय की, मला सहामाही गणितांत ९२ मार्क मिळाले होते. नंतर मी हेडमास्तरांना विनंती करून विचारलं की सर मी लिहिलेल्या सातवीच्या पेपरांत किती मार्क मिळतील हे सांगाल काय ? ते म्हणाले की, तो पेपर तपासायचा प्रश्नच येत नाही. तो रद्द झाला. पण तुझ्या समाधानासाठी तपासून बघू या. हेडमास्तरांनी तो तपासून घेतला. म्हणाले की, तुला ४१ मार्क मिळाले असते.

एव्हाना रघु केदारी, दत्ता अभ्यंकर, बबन बुगे, सातभाई असे बरेच मित्र जोडले गेले. दत्ता अभ्यंकर हा शास्त्रोक्त गीते गाणारा. घरी गुरूजीकडे संगीत शिकणारा आणि दोन-तीन तास रियाझ करणारा. अत्यंत सुरेल गळ्याचा बालगायक. शाळेचे स्नेहसंमेलन वगैरे कोणत्याही कार्यक्रमांत त्याचं गायन हमखास असायचं. पण अभ्यासांत मात्र तो मार खायचा. पांचवीच्या कि सहावीच्या वर्गात असतानाची ही गोष्ट. इयत्ता नक्की कोणती हे आता आठवत नाही. वार्षिक परीक्षेत तो सायन्स आणि गणित दोन विषयांत नापास झाला. शाळेच्या नियमाप्रमाणे दोन विषयांत नापास झालेल्यांना वरच्या वर्गात चढवायचं नाही. सायन्सचे अष्टेकर सर खरे रसिक. खेळ, कलाकौशल्य आदि अभ्यासाव्यतिरिक्तच्या प्रवृत्तीत त्यांना तर रस होताच. पण मुलांनी देखील त्यांत भाग घ्यावा असं ते नेहमी सांगायचे. सरांना शाळेचा नियम माहीत होता. आणि अभ्यंकर हा काय विद्यार्थी आहे हेही त्यांना माहीत होते. तरे नापास झाला तर त्याचे नीतिधैर्य तर खचेलच पण त्याचे पालक देखील कदाचित त्याची संगीतसाधना बंद करून टाकतील असं सरांना वाटलं. त्यांनी अभ्यंकरला बोलावून घेतलं. संगीताबराबेर अभ्यासाकडेही लक्ष दे असा आपुलकीचा सल्ला दिला. रागावले देखील आणि सायन्समध्ये ग्रेस मार्क देऊन त्याला पास करून टाकलं.

चांगले, निवडक इंग्रजी चित्रपट अवश्य पहात जा असं अष्टेकर सरांनी आम्हा मुलांना सांगितलं होतं. मला नीट आठवत नाही पण मी सातवीत असतानाची ही गोष्ट. अष्टेकर सरयाही वर्गात आम्हाला सायन्स शिकवायचे. अभ्यासक्रम वेळापत्रकानुसार न होता तो थोडामागे राहीला होता. थोड्या जास्त सार्वजनिक सुट्या अल्यामुळे कदाचित हे घडले असावे. त्यामुळे रविवारी सुटीच्या दिवशी जादा तास घेणार असल्याचे सरांनी सांगितले. सकाळी १० वाजता वर्ग सुरू होणार होता. आम्ही मुलं पंधरा-वीस मिनिटे लवकरच वर्गात दाखल. झालो होतो. तेवढ्यांत केदारी आला. म्हणाला अरे १० वाजता मेरी अन्टोयनेट हा सिनमो आहे. आज जाऊ या काय? हा ऐतिहासिक चित्रपट होता. शिवाय फ्रेंच राज्यक्रांती संबंधीचे एक प्रकरण इतिहासाच्या अभ्यासक्रमांतही होते. त्यामुळे हा सिनेमा बघण्याची आमची इच्छा होती.

चित्रा टॉकिजांत दर रविवारी सकळी १० वाजता इंग्रजी सिनेमा दाखवला जाई. तिकिट ४ आणे. म्हणजे पंचवीस पैसे. आजचा सिनेमा फ्रेंच राज्य क्रांतीच्या पार्श्भूमिवर होता. सर यायची वेळ झालेली. निर्णय लवकर घ्यायचा होता. अखेर आम्ही चार मित्रांनी तास बुडवून सिनेमाला जायचं ठरवलं. अभ्यासाचं काय? पुनः शिकन घेता येईल. हा सिनेमा परत येणार नाही. आम्ही घाईने, गडबडीने वर्गाबाहेर पडलो. शाळेच्या गेटपाशी पोहोचलो अन् समोरून अष्टेकर सरांच आगमन.

“काय हजामड्यांनो ! (ही त्यांची नेहमीची पण अत्यंत प्रेमाची भाषा) कुठं चाललात वर्ग सोडून ?".सगळे गप्प. काय सांगणार सरांना !

“अरे बोलाना! कुठं निघालात ?"

मी घाबरत, चाचरत म्हणालो, “सर'! 'तो मेरी अँन्टॉयनेट पिक्चर लागलाय मॅटिनीला...'

“अरे, तो पुढच्या रविवारी आहे."

सरांना जे माहीत झालं होतं ते त्यांनी सांगितलं.

केदारीलाही थोडा धीटपणा आला. तो म्हणाला, ' नाही सर ! आजच आहे तो सिनेमा. मी येताना बघून आलोय."

“अरे हे कालच नाही का सांगायचं"

“शहा, तू वर्गात जाऊन मुलांना सांग. आजचा ज्यादा तास पुढच्या रविवारी आणि केदारी हे घे माझे पैसे. धावत जा. तुमच्या बरोबर माझंही तिकिट काढ. मी येतोच. मागाहून" सरांनी रस्त्यांतून पळत जाणं रास्त नव्हतं आम्ही मात्र धावत थिएटर गांठलं अनं तिकिटे काढली. नाही तरी मॅटिनीच्या इंग्रजी सिनेमाला गर्दी नसायची. थोडीफार गर्दी व्हायची ती लॉरैल-हार्डीच्या आणि टारझनच्या सिनेमांना.

मराठी या विषयाबाबतचीही एक मजेशीर आठवण आहे. सहाव्या किंवा सातवीच्या इयत्तेत 'उंच पाटी पालथी उशाखाली' ही आचार्य अत्रेंची कविता पाठ्यपुस्तकांत होती. परीक्षेमध्ये मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत तुम्हाला 'गरीब व्हावेसे वाटते की श्रीमंत' या विषयावर निबंध लिहायचा होता. हा निबंध अर्थातच वरील कवितेला नजरेसमोर ठेवून विचारला होता. या इयत्तेतील सर्वच विद्यार्थ्यांनी मला गरीब व्हावेसे वाटते यावर निबंध लिहिला होता. मी मात्र मला श्रीमतं व्हावेसे वाटते असा निबंध लिहिला. निबंधाचा शेवट करताना मी लिहिले की, खुद्द कवि सुद्धा आपल्य कवितेत, 'निजे राजासम

मोकळा खुशाल' असे मजूराचे वर्णन करतात आणि राजा तर सर्वांत श्रीमंत. म्हणून मला श्रीमतं व्हावेसे वाटते.

शिक्षकांनी सर्वच्या सर्व चार वर्गात हा निबंध वाचून दाखवला. मला शाबासकी दिली. हेड मास्तरांनाही तो निबंध दाखवला. हेडमास्तरांनी तर कमालच केली. त्यांनी आचार्य अत्रेंना पत्र लिहीले, आणि मी निबंधांत निजे राजासम मोकळा खुशालचा उल्लेख करून श्रीमंत व्हावेसे वाटते असा जो उल्लेख केला होता त्याबद्दल त्यांच्याकडे विचारणा केली. कांही दिवसांनी अत्रेनीही उत्तर पाठवलं. प्रथम वेगळा, स्वतंत्र विचार करून निबंध लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले आणि कवितेत राजा हा शब्द श्रीमंती सूचक नसून केवळ लौकिक अर्थाने तो सुखी सूचक आहे असं कळवलं.

मराठी विषय शिकवणारे शिक्षक. शाळेचे हेडमास्तर आणि अत्रेसारखा महान लेखक, कुणाचं कौतुक करावं!

चितांबर, क्षीरसागर, पटवर्धन, अष्टेकर सरांप्रमाणेच इतरही अनेक शिक्षकांनी आणि या सोसायटी हायस्कूलने घडवलेले संस्कार पुढील आयुष्यांत सतत उपयोगी पडत आले. आठव्या इयत्तेत श्री. कोटस्थाने आमचे वर्ग शिक्षक होते. पावसाळ्याचे दिवस होते. नगरचा पावसाळा तो काय! सबंध पावसाळ्यांत जेमतेम ८-१० इंच पाऊस. साडे दहा ते साडे पांच अशी शाळेची वेळ. दीड ते दोन जेवणाची सुटी असायची. माझ्यासारखी बरीच मुले डबा घेऊन यायची. शाळेच्या आवारांत बरीच झाडे होती. कडूलिंब, चींच वगैरे, आम्ही मधली सुटी झाली की डबा घेऊन वर्गाबाहेर धावायचो. झाडाच्या सावलीत एक दोन मित्रांसोबत डबां खाण्याची मजा कांही और होती.

तर त्या पावसाळ्याच्या दिवसांत दुपारनंतर वर्ग चालू असताना मला लघवी लागली. आभाळ भरून आलेलं. झिमझिम पाऊस पडत होता. मी करंगळी वर केली. "लवकर ये" कोटस्थाने मास्तरांनी परवानगी दिली. लांबवर मैदानाच्या कडेला असलेल्या मुतारीकडे धावलो. काही क्षणच गेले असतील. आकाशांत ढगांचा प्रचंड गडगडाट होऊन डोळे दीपवून टाकणारी वीज चमकली. तो गडगडाट आणि विजेचा कडकडाट इतका प्रचंड होता की नक्कीच जवळपास कुठेतरी वीज पडली असावी. कोटस्थानेसर वर्ग सोडून तीरासारखे धावत माझ्या दिशेने आले. त्या प्रचंड आवाजाने मीही भयभीत झालो होतो. माझा हात पकडून सर मला वर्गात घेऊन गेले.

व्यायामाने कमवलेले कसदार शरीर, पिळदार स्नायू आणि तितकीच निर्भिड मनोवृत्ति असे आमचे कोटस्थानेसर विद्यार्थ्यांनाही अभ्यासाबरोबर व्यायाम करायला प्रोत्साहित करीत. एकदां सर वर्गात विद्यार्थ्यांना आळीपाळीने प्रश्न विचारतीत होते. मुळे नांवाचा एक अत्यंत हुशार विद्यार्थी होता. प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी तो उभा राहिला. उत्तर देता देता त्याला चक्कर आली. त्याच्या तोंडावर पाणी शिंपडलं. नाकाशी चप्पल धरली. थोड्यात वेळांत तो शुद्धीवर आला. 'कोय, मुळे, व्यायाम वगैरे करतोस की नाही ? अरे, अभ्यासाबरोबर | शरीरप्रकृतीकडेही लक्ष दे. त्याच्याशिवाय जीवनांत खरी प्रगति करता

येणार नाही. कसला व्यायाम करतोस ?' सरांनी विचारलं आणि आपण व्यायाम वगैरे कांही करीत नाही असं मुळे म्हणाला.

'कोण कोण व्यायाम करता रे? उभे रहा पाहू', सर

फक्त पांच, सहा मुलं उभी राहिली. सर भलतेच चिडले. म्हणजे काय? बाकीचे व्यायाम करीत नाहीत! ते कांही नाही. उद्यापासून सगळ्यांनी सकाळी मैदानांत हजर रहायचं. मी रोज एक तास व्यायाम करून घेतो. काय समजलं? 'सरांनी हुकूम सोडला.' सकाळी जो येणार नाही, त्याची शाळेत हजेरी लागणार नाही असा दमही सरांनी दिला आणि दुसऱया दिवसापासून कोटस्थानेसरांनी मुलांकडून व्यायाम करून घेण्याचं सत्र सुरू केलं. ते संबंध वर्षभर ! सकाळी ७च्या आधी आंधोळ, देवपूजा आटोपून सर मैदानांत हजर असायचे. हाफ पॅंट, हाफ शर्ट कपाळावर भला मोठा गंध असा त्यांचा रूबाब असायचा. आठ वाजता घरी जाऊन नंतर साडे दहाला सर पुन: शाळेत हजर होत. आणि ह्या सर्व कामासाठी मुलांकडून फी रूपाने किंवा शाळेकडून एक पैशाचाही मोबदला त्यांनी मिळवला नाही.

बडवे आणि मामा देशपांडे हे तर शाळेचे व्यायाम आणि शारीरिक कसरतीसाठी नेमलेले खास शिक्षक. अगदी डिवोटेड शिक्षक. बडवे मास्तरांच्या हाताखाली सोनार नावाचा एक विद्यार्थी खास तयार झालेला. सिंगलबार आणि डबलबारवरचे त्याचे कसरती खेळ बघत रहावेत! एखाद्या शिल्पकराने बनविलेल्या पुतळ्यांसारखे कोरीव स्नायु. पण घरची गरीबी. गांवाकडून आलेला. नगरमध्ये राहायचीही सोय नव्हती. आमच्या शाळेची व्यायामशाळा म्हणजे एक मोठी स्वतंत्र कौलारू घरासारखी वास्तू. पुढे ओटा. एक व्यायाम करण्यासाठीचा मोठ हॉल. त्याला लागूनच लालमातीचा 'हौद'. हौद म्हणजे कुस्ती खेळण्याचा आखाडा. या व्यायामशाळेला लागूनच आणखी एक खोली. ही खोली म्हणजे लाठ्या, लेझमी, लाकडी घोडे वगैरे सामान ठेवायची जागा. एक प्रकारे गोडाऊन किंवा अडगळीची खोली. सोनारची घरची परिस्थिती पाहून या खोलींत राहण्याची सोय शाळेने त्याला करून दिली होती. अशा दोन-तीन गरीब मुलांची सोय शाळा तेथे करीत असे. सोय म्हणजे काय तर मोफत रहाण्याची परवानगी. खुर्ची, टेबल, पलंग, काही नाही. एक वळकटी आणि एक-दोन पिशव्या बस एवढंच सामान. व्यायाम शाळेला लागूनच पाण्याचे नळही होते. त्यामुळे आंघोळ, कपडे धुण्याची सोय तेथे होती. अर्थात शाळेची फी त्याला माफ होतीच. गरीब होतकरू विद्यार्थ्यांना मदत करण्याची सोसायटी हायस्कूलची परंपरा होती.

एकदा नगरांत प्लेगची साथ आली. खाजगी दवाखाने, इस्पितळे सगळीकडे प्लेगचे इंजेक्शन देण्याची व्यवस्था केली होती. पण तरीही ही साथ इतकी भयंकर होती की रोज काहीना या रोगाची लागण व्हायची तर कांही तडकाफडकी मृत्युच्या दाढेत सापडायचे. आमच्या शाळेच्या जवळच नगरपालिकेचे कार्यालय होते. कार्यालयाच्या बाहेर लोकांच्या माहितीसाठी मोठा बोर्ड लावलेला असे. :

आज = ३० लागण

- ४ मृत्यु

असे मोठ्या अक्षरात लिहिलेले असे. रोज हे आकडे बदलायचे. शाळेत जाताना धडधडत्या अंत:करणाने आम्ही हा बोर्ड वाचायचो.

लोकांना कांही महत्त्वाच्या सूचना द्यायच्या असल्यास गावांत दवंडी पिटायची त्या काळांत प्रथा होती. दवंडीवाला चौका-चौकातून उभा रहायचा. मग ढोल बडवायचा. लोकांच टोळकं जमलं की मग "ओ शेरवाले" (म्हणजे शहेरवाले) अशी आरोळी देऊन सूचना द्यायचा. प्लेगच्या बाबतीत घ्यावयाच्या सूचना अशाच रीतीने दिल्या जात. सूचना संपली की तो पुनः ढोलकं वाजवायचा. अशावेळी आपल्या डोक्यावरची टोपी, पागोटं कुणी उडवू नये म्हणून जमलेले लोक डोक्यावर हात दाबून ठेवत.

तो शनिवारचा दिवस होता. शनिवारी सकाळी साडे सात ते साडे दहा अशी शाळेची वेळ असायची. आम्ही दहा मिनिटे लवकरच शाळेत पोहोचायचो. कारण बाहेर मैदानांत झेंडावंदन असे. मुले रांगा लावून उभे राहत. झेंडावंदन संपलं की सगळी मुलं आपापल्या वर्गात जात. पण त्या दिवशी मैदानांत भयाण शांतात पसरलेली. धोळक्या-धोळक्यानं मुलं गुपचूप उभी होती. मला कळेना काय प्रकार आहे. मी जाऊन ओळखीच्या एका मुलाला ' विचारलं. प्लेगचा उंदीर चावल्यामुळे व्यायामशाळेत झोपलेला सोनार मृत्युमुखी पडला होता! मी धावत व्यायामशाळेजवळ पोहोचलो. हेडमास्तर, इतर शिक्षक, कांही सिनीअर विद्यार्थी तिथं जमले होते. सोनारच्या शेजारीच व्यायामशाळेत झोपत असलेला दुसरा एक विद्यार्थी गर्भगळित झाला होता. घामाघूम झाला होता. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. या विद्यार्थ्यांचे नांव रामराव आदिक. गाजलेले वकिल आणि महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री ते हेच रामराव आदिक. बडवे सरांच्या दु:खाला तर सीमा नव्हती. स्वतःचा मुलगा गेल्या इतका दु:खाचा डोंगर कोसळलेले बडवेसर त्यानंतर शरीराने आणि मनाने खचतच गेलेले आम्हाला दिसले. पद्माकर डावरेंसारखा उगवता तरूण लेखक आणि सर्वात थोरला मुलगा गेल्याचे दुःख पचवून शिकवण्याचे आपले कार्य करीत राहीलेले डावरेसर. नवाथे, डगीळ... किती म्हणून नांव सांगावीत की ज्यांनी शिक्षणाबरोबर संस्काराचीही आयुष्यभर
ई पुरेल इतकी शिदोरी दिली.

आमचं मॅट्रिकचं वर्ष संपलं. मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांसाठी निरोपसमारंभ आयोजित करण्यांत आला होता. त्या समारंभात क्षीरसागर हेडमास्तरांनी उपदेशवजा केलेलं भाषण . मी कधीही विसरू शकणार नाही. मला स्वत:ला माझ्या आयुष्यांत अनेकवेळां सरांच्या त्या शब्दांनी धीर दिला. प्रोत्साहन दिले आहे. सर म्हणाले, "बाळांनो आता तुम्ही मोठे झालांत. पक्ष्यांच्या पिलांना पंख फुटले की ते घरटं सोडून आकाशांत उंच भरारी घेतात. तुम्ही सर्वजण यानंतर असेच जीवनाच्या आकाशांत भरारी घेणार

आहांत. तुम्हा सर्वांचे पुढील आयुष्य भरभराटीचे जावे अशी मी प्रार्थना करतो. पण एक गोष्ट लक्षांत ठेवा. प्रत्येकाची कांहीना काही महत्वाकांक्षा असते. ती पूर्ण होईलच असे नाही. प्रारब्ध वेगळेच असू शकते. तुमच्या पैकी कुणी डॉक्टर होईल, कुणी वकिल होईल, कुणी साधा कारकून होईल. मग जीवनातील यश कशांत आहे ?-तर मी डॉक्टर झालो तर उत्तम डॉक्टर होण्याचा प्रयत्न करीन, वकील झालो तर उत्तम वकिल बनेन आणि कारकून झालो तर उत्तमात उत्तम 'कारकून बनण्याचा प्रयत्न करीन असा दृढ निश्चय करा. यश तुमच्या पायाशी येईल." क्षीरसागरसरांचे हे शब्द म्हणजे कृष्णाने अर्जुनांला सांगितलेल्या गीतेसारखे मला मार्गदर्शक ठरले.

**********************************

प्रकरण - ५

# अहमदनगर कॉलेज

मॅट्रीकची परीक्षा म्हणजे एक फार मोठा टप्पा. १९४५-४६पर्यंत मॅट्रीकची परीक्षा द्यायला मुलांना पुण्याला जावे लागे. कारण नगर हे मॅट्रीक परीक्षेचे केंद्र नव्हते. नगर-पुणे खाजगी बसेस धावायच्या. प्रवाशांना घेऊन जाण्यासाठी त्यांच्यात चुरस लागायची. बसच्या टपावर उभे राहून पुणे एक रूपया... पुणे एक रूपया... असं ओरडत बसवाले प्रवाशांना आपल्या बसकडे बोलवत असत. मॅट्रीकच्या परीक्षेच्या सुमारास चढाओढीमध्ये आठ आण्यात (५० पैसे) नगरहून पुण्याला प्रवास करता येत असे. हल्ली उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाणाऱ्या मुलांना निरोप देण्यासाठी पालक विमानतळावर जाताता त्याप्रमाणे मॅट्रीकच्या मुलांचे पालक, मित्रमंडळी माळीवाडा वेशीबाहेरच्या बसस्टॅन्डवर निरोप देण्यासाठी येत. मुंबई विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या मॅट्रीकचा निकाल ठरलेल्या तारखेला न चूकता जाहीर व्हायचा आणि परीक्षेत पास झालेल्या सर्वांचे नंबर वर्तमानपत्रांत छापू येत. रेल्वेने वर्तमानपत्रांची पार्सले येत. त्यामुळे सकाळी गाडी यायच्या वेळेला निकाल लवकर जाणून घेण्यासाठी वर्तमानपत्रं विकत घेण्याकरिता लोक स्टेशनकडे धांव घेत. मॅट्रीकनंतर पुढचं शिक्षण घेण्यासाठीही पुणे-मुंबईला जावे लागे, कारण नगरमध्ये एकही कॉलेज नव्हते. १९४७ पासून अहमदनगर कॉलेज हे पहिलं.कॉलेज डॉ. हिवाळेंच्या प्रयत्नांनी सुरू झालं. मी देखील याच कॉलेजात सायन्स शाखेत प्रवेश घेतला. गरीब, साधारण स्थितीतील तसेच ग्रामीण भागांतील मुलांना हे कॉलेज वरदानरुप ठरलं. जातिधर्माच्या भेदभावाशिवाय अनेक गरीब आणि होतकरू मुलांना या कॉलेजने मदत केली. कुणाला फी माफ, कुणाला वह्या पुस्तकांसाठी मदत तर कुणाला हॉस्टेलमध्ये रहाण्यासाठी सोय कर. जमेल त्या मार्गाने विद्यार्थ्यांना मदत करायला हिवाळेसर नेहमी तयार असत.

अवचट नावाच्या एका विद्यार्थ्याने सायन्सच्या पहिल्या वर्षात प्रवेश घेतला. अवचट अभ्यासात यथातथाच होता. सर्वसाधारणपणे ५०-५० टक्क्याहून जास्त मार्क मिळवणारे विद्यार्थीच सायन्स शाखेत प्रवेश घेत. अहमदनगर कॉलेजात आर्टस व सायन्स अशा दोनच शाखा सुरूवातीला सुरू केल्या होत्या. आर्टस कॉलेज सकाळी ७ ते १० असे आणि सायन्सचे वर्ग दुपारी असत. याही व्यवस्थेमुळे बरीच मुले नियमीत नोकरी करूनही सकाळच्या वर्गाद्वारे कॉलेज शिक्षण घेऊ शकले. तर अवचटला मी ओळखत असल्यामुळे सायन्स शाखेत प्रवेश घेण्याचे कारण विचारले तर आपल्या मित्रांनी सायन्स शाखेत प्रवेश घेतला म्हणून मीही घेतला म्हणे ! एकतर तो मुळांतच कच्चा विद्यार्थी. त्यांतून मराठी माध्यमाऐवजी एकदम इंग्रजी माध्यमांतून शिकणही सोप नव्हतं. बरं, या कॉलेजात मुंबईकडून आलेले जॉर्न, बार्नबस, वर्गिस, नयनन या सारख्या प्रोफेसरांना मराठी अजिबात येत नव्हतं. आणि हिंदी अगदीच मोजकं यायचं. त्यामुळे त्यांच्याशी संवाद, संभाषण करायचं तर इंग्रजीतच करावं लागे. अवचटंच्या बाबतीत अपेक्षित तेच घडलं. पहिल्या वर्षाच्या वार्षिक परीक्षेत तो मराठी विषय सोडून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीव-वनस्पतिशास्त्र आणि गणित या चारही विषयांत नापास झाला. अर्थातच वरच्या वर्गात इंटरमध्ये जाण्याचा प्रश्नच नव्हता. अवचट रडत रडत माझ्याकडे आला.

म्हणाला, माझ्याबरोबर हिवाळे प्रिन्सीपॉलकडे चल. कशासाठी तर त्याला सायन्स झेपत नाही म्हणून आता आर्टसकडे जायचं होतं आणि ते देखील इंटरच्या वर्गात. म्हणजे सायन्स पहिल्या वर्षाला नापास. तरी आर्टस् मध्ये वरच्या वर्गात प्रवेश हवा होता. आर्ट्स व सायन्स दोन्ही शाखांच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षा कॉलेजच घेत असे. आणि निकालही कॉलेजच जाही करीत असे. इंटरची परीक्षा मात्र युनिव्हर्सिटीतर्फे असे. म्हणून प्रिन्सिपॉलकडे जाण्याचा अवचटचा अट्टाहास होता. आम्ही कॉलेजच्याच आवारांत असलेल्या हिवाळेसरांच्या बंगल्यावर गेलो. अवचटने जाऊन सरळ सरांचे पाय धरले. अरे काय हे ? झालयं काय ? हिवाळेसरांनी आश्चर्याने विचारले. त्यांना मराठी अगदी उत्तम येत होतं. अवचटची मागणी ऐकताच सहसा न चिडणारे हिवाळेसर चिडले. म्हणाले की, हे शक्य नाही. पण अवचट ही तसा चिवट होता. तो म्हणाला सर, मी नापास 'होऊन पहिल्या वर्षातच राहीलो तर माझे वडिल मला कॉलेजच सोडायला लावतील. आणि माझं शिक्षण बंद होईल. मग अस करा सर, नाहीतर मला नोकरी तरी द्या आपल्या कॉलेजांत.

एक गरीब मुलाला शिक्षणास मुकावे लागते ही कल्पनाच हिवाळेसरांना सहन होईना. त्यांनी अवचटला इंटर ऑर्टस्मध्ये प्रवेश देऊन टाकला. मी सरांकडे बघतच राहिलो. मला खरं वाटेना. सर म्हणाले, "शहा, नियम मुलांच्या हितासाठी आहेत. मुले नियमासाठी नाहीत."

रामभाऊ खेडेकर हा पाथर्डी तालुक्यांतील भालगांव या लहानशा खेड्यांतील धनगराचा पोर. गांवातल्या छोट्याशा शाळेत जाऊ लागला. पण शाळा नावापुरती, मुख्य काम मेंढ्या-बकऱ्या वळवणं. घरी अठराविश्व दारिद्रय. अशाही परिस्थितीत चौथी पास होऊन रामभाऊ दूरवर तीसगांवच्या शाळेत जाऊ लागला. तिथून हा घरी आला की शेळ्यामेंढ्यांचं काम करायचा. पण पोरगा बुद्धीनं खरा तल्लख. सातवीत शेवगांव केंद्रांत पहिला नंबर आणला. सगळ्या शिक्षकांनी खूप कौतुक केलं. म्हणाले, पुढे शिक. नांव काढशील. पण पुढे शिकायचं म्हणजे जिल्ह्याच्याठिकाणी नगरला जाणं आलं. फी, रहाणे, खाणपिणे हा खर्च कोण आणि कसा करणार ? कुणाच्यातरी सांगण्यावरून नगरच्या सरोश टॉकिजचे मालक सरोश इराणी यांना त्यानं पत्रं लिहिलं. सगळी हकिकत कळवली. ओळख-पाळख कांहीही नसलेल्या इराणींनी पत्राचं उत्तर पाठवून त्याला नगरला बोलावून घेतलं. रामभाऊ घरी न सांगता अक्षरश नगरला पळून आला. इराणींनी सठ्ठा बोर्डिंगमध्ये खेडेकरची रहाण्याची, जेवणाची सोय करून दिली आणि शाळेची फी, कपड्यालत्याची व्यवस्था केली. दादा चौधरी विद्यालयांतून अतिशय चांगल्या मार्कांनी तो S.S.C. पास झाला. नंतर नगर कॉलेजचे प्राध्यापक बार्नबस यांना भेटला. सरांनी त्याचे मार्क पाहिले. त्याला कॉलेजांत प्रवेश दिला अन् शिष्यवृत्तीही देऊ केली. पण शिष्यवृत्तीच्या रकमेवर खेडेकरचे भागण्यासारखे नव्हते. त्याने सरांना ही अडचण सांगितली. सर म्हणाले काळजी करू नकोस. तू वसतिगृहांत रहा. तुझा सगळा खर्च कॉलेज करील. अशा रीतीने खेडेकरचे कॉलेज शिक्षण नगर कॉलेजच्या कृपेने सुरू झाले. जे. बार्नबस हे हिवाळे सरानंतर प्रिन्सिपॉल झालेले. त्यांनी खेडेकरांला अक्षरश: स्वत:च्या मुलासारखे वागवले. खेडेकर इंटरला असताना आयुष्यात त्याने पहिल्यांदा चप्पल

विकत घेतली. पेन पाहिजे असलं तरी तो बार्नबससरांकडे जायचा आणि सर त्याला आनंदाने पेन द्यायचे. हा खेडेकर पुढे इंजिनिअर झाला आणि मुंबई महानगर पालिकेत मोठ्या पदावर रूजू झाला.

क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल-टेनिस या सारख्या खेळांना तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांनाही हिवाळेसर, बार्नबससर उत्तेजन देत. मी बऱ्यापैकी क्रिकेट खेळत असल्यामुळे कॉलेजच्या क्रिकेट टीममध्ये माझा समावेश झाला होता. पुणे विद्यापीठातर्फे आयोजित आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत प्रथमच आमच्या कॉलेजचा संघ उतरणार होता. सामने पुण्याला होणार होते. पुण्याच्या एस्.पी., वाडिया, फर्ग्युसन आदि कॉलेजचे नांवाजलेल्या खेळाडूंचा भरणा असलेले संघ या स्पर्धेत उतरले होते. आमचा संघं म्हणजे त्यांच्या दृष्टीने खेडवळ पोरांचा संघ. आमचा 'पहिला सामना एम.ई.एस. कॉलेजबरोबर होता. त्यांच्याही संघात चांगले खेळाडू होते. पुण्यांत रहात असल्यामुळे व्यवस्थित कोचिंग घेतलेले. प्रत्येक खेळाडू क्रिकेटचं स्वत:चं किट घेऊन आलेला. आमच्या जवळ कॉलेजने दिलेल्या तीन बॅटस्, पॅड, ग्लोव्हज् वगैरेचं , एकच किट, त्यांच्या खेळाडूंच्या पायांत खास क्रिकेटचं बूट तर आम्ही आपले कॅनवासचे बूट घालून मैदानांत उतरलो अन् आमचं हंसू करून घेतलं. एम.ई.एस. कॉलेजसह पुण्याच्याइतर कॉलेजचे विद्यार्थीदेखील सामना पाहायला आले होते. आमची हुर्ये उडवायला आले होत्रे असं म्हटलं तर जास्त योग्य होईल. पण अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे आम्ही तो सामना जिंकला. सामना पाहायला आलेल्या प्रो. देवधरांसारख्या महान क्रिकेटपटूंनी आमचं कौतुक केलं. तो क्षण आम्ही विसरूच शकत नाही. आमचा दुसरा सामना दोन दिवसांनंतर एस.पी. कॉलेजशी होता.

प्रि, हिवाळेना पहिला सामना जिंकल्याची बातमी जेव्हां कळवली तेव्हां त्यांनी कॉलेजला चक्क सुट्टी जाहीर केली! आणि आम्हा खेळाडूंना पुण्यांतच दोन दिवस मजा करा असा निरोप धाडला. अकरा खेळांडूंमध्ये चार-पांच रणजी चे खेळाडू असलेल्या बलाढ्य एस.पी. कॉलेज संघाबरोबरचा सामना आम्ही अर्थातच हरलो. परंतु अहमदनगर कॉलेजमुळे वेगवेगळ्या खेळांतील खेळाडूंना अधिक विशाल क्षेत्र मोकळे झाले. खेळांचे खरे तंत्र, डावपेंच वगैरे समजायला मदत झाली. क्रिकेट पुरतं बोलायचं तर नगरमध्ये अत्यंत गुणी क्रिकेटपटूंची त्याही काळांत कमतरता नव्हती. टिमण्णा, होनरावसारखे फलंदाज आणि कोंडीरामसारखे लेगब्रेक गोलंदाज यांचा खेळ बघण्यासारखा असे. या खेळाडूंना असे विशाल क्षेत्र, एक्सपोजर मिळालं असतं तर रणजीच काय पण भारतीय संघात देखील त्यांचा समावेश होऊ शकला असता. सांस्कृतिक कार्यक्रमांना आणि या क्षेत्रांतील 'कलावंतानाही अहमदनगर कॉलेजने प्रोत्साहन दिले. मामा (मधुकर) तोरडमल सारखा कलावंत अहमदनगर कॉलेजच्या स्टेजवरूनच पुढे आला. एरव्ही सोसायटी हायस्कूलात
आमच्याच बरोबर असलेला हा लाजराबुजरा मुलगा पुढे मोटा कलावंत होईल असे सांगितले असते तर कुणाला खर वाटलं नसत. नगर कॉलेजचे हे क्रण तोरडमलांसह कुणीही विसरणं शक्य नाही. नगर कॉलेजांतून बाहेर पडल्यानंतरही या कॉलेजबद्दलची आमची आपुलको कधीच कमी झाली नाही. त्याच आपुलकीच्या भावनेतून अहमदनगर कॉलेजच्या गरीब विद्यार्थी फंडाच्या मदतीसाठी नाटक करण्याचे आम्ही ठरवले. पु. ल. देशपांडेंचं 'तुझ आहे तुजपाशी' नाटक मुंबइत धमाल उडवीत होतं. मुंबईबाहेर या

नाटकाचे प्रयोग अद्‍याप झाले ' नव्हते. तोरडमल नगरला, सुरेश डावरे पुण्याला, मी मुंबईला असे आम्ही विखुरलेलो होतो. आम्ही मुंबईत पुन: एकदां ते नाटक पाहिलं आणि तेच नाटक करायचं ठरवलं. कॉलेजने थिएटर, सजावट आदि सर्व व्यवस्था केली. तोरडमल काकाजी, सुरेश डावरे, हा श्याम, मी आचार्य अशी पात्ररचना ठरली आणि आम्ही आपापल्या ठिकाणी राहूनच आपापल्या भूमिका पक्क्या करण्यास सुरवात केली. नाटकाच्या तारखेच्या केवळ चार दिवस आधी आम्ही नगरला एकत्र जमून तालमी केल्या. प्रयोग अफलातून झाला. गरीब विद्‍यार्थी फंडाला आम्ही सुमारे दहा हजार रुपये मिळवून देऊ शकलो. आजही पन्नास वर्षांनंतरही आमचं आणि कॉलेजचं नातं अतूट आहे. कधीही नगरला गेलो कि अहमदनगर कॉलेजला अचूक भेट देतो. जुन्या आठवणींना उजाळा देतो.

*******************************

प्रकरण - ६

# संस्कार सेवादलाचे

शाळा आणि शालेय उपक्रमांव्यक्तिरिक्त बराच मोकळा वेळ असे. टी.व्ही., कॉम्प्युटर्स, इंटरनेट अशा सुखसोयी त्याकाळांत नव्हत्या. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा तो काळ होता. सेवादलाचे 'कार्य जोरांत चालू होते. गावांत अनेक ठिकाणी सेवादलाच्या शाखा चालत. माझ्या अगदी घराजवळ सेवादलाची शाखा होती. म्हणून मी लहानपणासूनच सेवादलांत जाऊ लागलो. संध्याकाळी सहा ते सात सेवादलांत हजेरी लावणे हा नित्याचा आणि आवडीचा कार्यक्रम होऊन गेला. हुतूत, खो खो, लंगडी या सारख्या खेळांमध्ये तर रमून जायचोच पण खेळ, व्यायाम, कसरतींव्यक्तिरिक्त मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने नानाविध उपक्रम सेवादलांत राबविले जात. शिस्तीचे पाठ तर सेवादलामुळे गिरवले गेलेच पण डोक्यावर गांधी टोपी आणि शाखा सुटण्याचे वेळी गाईले जाणारे 'वंदे मातरम्' राष्ट्रगीत यामुळे नकळत आपोआप देशप्रेमाची भावना बालमनांत रूजली. राष्ट्रभक्तीची गीते, 'पोवाडे वगैरे प्रसिद्ध गायकांच्या मैफलींतून ऐकायचो आणि मग आम्हीही ते गायचो. गुण- गुणायचो. सेवादलांतील सैनिकांचाच ऑरकेस्ट्रा बनवून कार्यक्रम करायचो. वडिलांच्याच प्रेरणेने मी लहानपणींच पेटी शिकलो होतो. त्यामुळे मला या कार्यक्रमांत भाग घेता येत असे. पेटी ज्यांचेकडून शिकलो त्या खराडे मास्तरांना विसरणं शक्य नाही. अत्यंत साधे, भोळे, देवभक्त. सकाळी आंधोळ, देवपूजा आटोपून कपाळावर भला मोठा गंधाचा टिळा लावून मास्तर त्यांच्या संगीत विद्यालयांत येऊन बसत. अगदी मन लावून शिकवत. फो होती महिना दोन रूपये. ही फी देखील कांही मुले सहा-सहा महिने देत नसत. तर कांही मुले फी देतच नसत. मास्तरांची कधी तक्रार नसे.

खराडे मास्तरांचं पेटी-वादन नुसतं ऐकत रहावं! गावांत कुठेही देवळांत, जैन मंदिरात भजन-कीर्तनाचा कार्यक्रम असला की पेटी वाजवायला खराडे मास्तरांना हमखास बोलावण्यांत येई.

डॉ. करंदीकर नांवाचे एक ज्येष्ट कार्यकर्ते होते. ते चांगले कवि आणि गायकही होते. नंदुरबारचा बाल-हुतात्मा 'शिरीषकुमार' यांच्यावर त्यांनी एक पोवाडा रचला होता. त्यांना तुरूंगवासाची शिक्षा झाली त्यावेळी त्यांच्याच बरोबर जेलमध्ये शिरीषकुमारचे वडिलही स्थानबद्ध होते. तुरुंगात सर्वांना. त्यांनी शिरीपकुमारचा पोवाडा ऐकवला. शिरीषकुमारांच्या वडिलांना अश्रू आवरेनात. स्थानबद्धतेतून दोघांची मुक्तता झाल्यानंतर श्री करंदीकरांनीच ही आठवण सांगितली. त्यानंतर बऱ्याच दिवसानंतर करंदीकरांना नंदुरबारहून पत्र आलं. शिरीषकुमाराची पुण्यतिथी जवळ आली होती. त्यादिवशी शिरीषकुमारांचा पोवाडा ऐकवण्यासाठी त्यांना आग्रहाचे बोलावणे होते. श्री करंदीकरांनी मला आणि एकबोटे नावांच्या आणखी एका मित्राला त्यांच्याबरोबर नंदुरबारला चलण्यास सांगितले. मी पेटीवादक म्हणून मला करंदीकर गुरुजीचं आमंत्रण तर एकबोटेचा आवाज चांगला होता. त्यामुळे दुसरे एखादे

गीत किंवा पोवाडा गाण्यासाठी आणि करंदीकरांच्या पोवाड्याला जी... जी... जी...म्हणण्याची साथ देण्यासाठी एकबोटेला बरोबर घेतले.

नंदुरबारला हुतात्मा शिरीषकुमारांच्या घरी गेलो त्यावेळी एका अति पवित्र मंदीरांत जात आहोत असे वाटले. कोवळ्या शिरीषकुमारचा भला मोटा फोटो ! त्या फोटोजवळ समई तेवंत होती. धूप, उदबत्यांच्या सुगंधाने वातावरण भरून गेले होते. हॉल लोकांनी भरून गेलेला. पण आपला श्वोसाश्वास आपल्याला ऐकू येईल इतकी शांतता ! ते वातावरण, हुतात्मा शिरीषकुमारच्या घरच्या मंडळींच्या डोळ्यांत दिसलेली वेदना आणि अभिमान, शिरीषकुमारचा तो फोटो हे सगळं कित्येक दिवस डोळ्यापुढून हलत नव्हतं.

स्वातंत्र्यलढ्याचं वातावरण तापत गेलं तसे सेवादलाचं कार्यही वाढले. व्याप्ति वाढली. माझा सहभाग वाढत गेला. माझं घर म्हणजे अनेक प्रवृत्तीचं केद्र बनून गेलं. सकाळ संध्याकाळ घर मुलांनी गजबजलेलं असायचं. कार्यकर्त्यांच्या बैठकी, प्रभात फेऱ्या, परेड, लाठी-लेझीमीचे खेळ, खेळांचे सामने, साक्षरता प्रसाराचे वर्ग, सूत कताई, बौद्धीके, निवडक ही पुस्तकांचे, मासिकांचे वाचन आणि या सर्व कार्यक्रमांबरोबरच शाळेमध्ये अभ्यासांत मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून. त्यांचा अभ्यास पक्का करून घेण्याची व्यवस्थाही करणे असे विविध उपक्रम अत्यंत उत्साहांत चालायचे. प्राथमिक शाळेपासून मॅट्रीकपर्यंतची मुले सेवादलांत येत. त्यांचे वेगवेगळे गट पाडून त्यांच्या गरजेनुसार क्षमतेनुसार सर्व  कार्यक्रमांची आखणी केली जाई:

सेवादलाच्या कामानिमित्त नगर जिल्ह्यांत तर अनेक गावांना जाण्याचा आणि खेड्यवंतील जीवन जवळून पाहण्याचा, अनुभवण्याचा योग आला. तसं पाहिलं तर खुद्द नगरमधील त्या काळातलं जीवन बरंचस ग्रामीण होतं. वस्ती कमी, कच्चे रस्ते, प्रत्यक्ष गावांत नव्हे तरी नगरला लागूनच असलेल्या भागांत शेते, विहिरी, सकाळी गावातून बाहेर चरायला नेण्यात येणारे आणि संध्याकाळी दिवे लागणीला गावाकडे परतणारे गुरांचे कळप हे सगळं काही खेड्यांसारखच होतं. पण तरी खेडी ती खेडी. संपूर्णपणे पावसावर त्यांचे जीवन अवलूंबन असे. आजही आहे. नगर जिल्हा मुळांतच दुष्काळी जिल्हा. त्यामुळे पावसाच्या बाबतीत नेहमीच कमतरता. मला आठवतंय की, खुद्द नगर शहरांतही एके वर्षी पावसाने इतका दगा दिल को, नगर शहराला पाणी पुरवठा करणारा पिंपळगांवचा तलावही कोरडा ठणठणीत पडला. गावांच्याबाहेर दोनेक मैलावर दोन कि तीन विहिरीच फक्त अशा होत्या कि ज्यांत सुदैवाने बरेच पाणी होते. पाणी आणण्यासाठी त्या विहिरीवर जाण्याखेरीज लोकांना गत्यंतरच नव्हतं. आम्ही सेवादलातर्फे गावंकऱ्यांना पाणी आणून देण्यासाठी खास व्यवस्था केली. इतकं लांबचं अंतर चालत जाऊन पाणी घेऊन परत चालत येणं म्हणजे खूपच अवघड होतं. आम्ही दोन ट्रक भाड्याने घेतले. गल्ल्या 'ठरवून दिल्या. एका गल्लीतील प्रत्येक घरांतून दोन हंडे किंवा दोन हंडेच पाणी मावेल एकढा मोठा पिंप अशी रिकामी भांडी घेऊन तडक विहिरीवर जायचं आणि तिथे पाणी भरून तो ट्रक पुनः त्या गल्लीत आणायचा अन् ज्याची त्याची भांडी त्यांना द्यायची. एक गल्ली आटोपली की दुसरी.

इतरही लोक आपापल्या परीने व्यवस्था करीत होते. कुणी सायकलीवर हंडा ठेवून स्वतः पायी चालत येत. कुणी कावडीने पाणी नेत. खरं तर १९३५-३६च्या काळांत याच पिंपळगांव तलावाचे पाणी नगरपालिकेमार्फत सकाळी आणि संध्याकाळी असं दोन वेळा पुरवलं जात असे, नगरपीलकेतर्फे बैलगाडीत ठेवलेल्या मोठ्या टाकीतून गावांतील मुख्य रस्त्यांवर पाण्याचा सडाही शिंपला जाई, कारण रस्ते मातीचे होते. ओल्या मातीचा सुगंध दरवळत असलेल्या त्या रस्त्यांवरून चालताना किंवा सायकल चालवताना वेगळीच मजा यायची.

अशा या पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या जिल्ह्यांतील कांही भागात विशेषत: राहुरी तालुक्यांत एकदा अतिवृष्टी आणि पुराचे संकट ओढवले. ओढे, नाले, नद्या पुराने वाहू लागले. रस्ते उखडले गेले. कच्चे पूल तुटले. बऱ्याच गावांचा इतर भागांबरोबरचा संपर्क तुटला. या गावांना खाद्य पदार्थांचा तातडीने पुरवठा करणे आवश्यक होते. सेवादल अशा कोणत्याही कटप्रसंगी मदतीला धावून जाई. जिल्हा कलेक्टर कार्यालयाकडून संपर्क तुटलेल्या गावांची यादी मिळवली. त्यांचं निश्चित ठिकाणं कुठे याची नकाशावरून माहिती घेतली. वांबोरी आणि राहुरी या दोन रेल्वे स्टेशनांच्या मधील भागापासून जवळ असणाऱ्या गावांना खाद्य पुरवठा करायचा होता. रेल्वे अधिकाऱ्यांच्या सहकार्याने वांबोरी, राहुरी स्टेशनांच्या मध्ये गाडी थांबिण्याची व्यवस्था केली गेली. त्यामुळे खाद्य पदार्थांची पोती घेऊन जाणाऱ्या आम्हा स्वयंसेवकांना मदत कार्य करणे सोपे झाले. आम्हाला गावांतील लोकांकडून, पाऱ्यांकडून धान्य, कुरमुरे, शेंगदाणे, कपडे आदी साहित्य बऱ्याच प्रमाणांत मिळाले होते. त्यांची भरलेली पोती घेऊन आम्ही रेल्वेने गेलो. वांबोरी व राहुरी स्टेशनाच्या दरम्यान ठरलेल्या ठिकाणी गाडी उभी राहिली. आम्ही उतरलो. सामान उतरवले जवळपास दोन-तीन वाड्या अशा होत्या, जिथे खाद्य पदार्थ पोहोचवणे आवश्यक होते. त्या खोपरांपर्यंत जाणाऱ्या दोन पाऊलवाटा, चिखलाने भरल्या होत्या. पण दुसरा मार्ग नव्हता. चिखल तुडवीत कसेबसे त्या वस्तीवर 'पाहोचलो. तिथून पुढे कांही अंतरावर चार-सहा झोपड्या उभ्या होत्या. पहिल्या वस्तींत वाटपाचे काम आटपून तिथे जायचे होते. अंतर फार नव्हते. पण या दोन वस्त्यांच्या मधला भाग खोलगट होता. दोन झाडे उन्मळून पडली होती. त्या खोलगट जमिनीत पाला-पाचोळा, फांद्या होत्या. चिखल वाळल्यासारखा दिसत होता. आम्ही आलो होतो ती पाऊलवाट लांबचं वळण घेऊन पुढच्या वस्तीकडे जात होती. एक लहान पोत मी पाठीवर घेतलं आणि शॉर्टकट म्हणून त्या खोलगट जमिनीवरून पुढे जायला निघालो. एक पाऊल पुढे टाकलं अन् माझा घोटयापासून वीतभर वरपर्यंत पाय चिखलांत रूतला.

त्या समोरच्या झोपड्यातील माणसं झोपडीबाहेर येऊन उभी होती. त्यांनी मला पाहिलं अन् मोठ्याने ओरडले “पोरा, पुढं पायं नको टाकू. मागें फीर, मागे फीर..."

कोरड्या पाऊलवाटेलगत उभ्या असलेल्या माझ्या सहकाऱ्यांनी हात धरन मला बाहेर खेचले. तेवढ्यात त्या पहिल्या वस्तीतला एक म्हातारा धावला. म्हणाला, "त्या लांबच्या वाटे शिवाय इकडे तिकडे फिरू नको. ते बघ तिकडे त्या झाडापाशी..." त्या उन्मळून पडलेल्या झाडाच्या बाजूलाच एका

बैलाची दोन शिंगे फक्त जमिनीच्यावर दिसत होती. म्हणजे बैल आख्खा चिखलात रूतून खलास झाल होता ! माझी छाती किती तरी वेळ धडधडत होती. परतीची गाडी देखील आमच्यासाठी थांबविण्यांत आली. अन् धडधडत्या अंत:करणानेच काम आटोपून परत फिरलो.

सेवादलातर्फेच असाच दुसऱ्या गांवी जाण्याचा प्रसंग आठवतो. पहिला स्वातंत्र्य दिन गल्ली गल्लीतून, प्रत्येक मोहोल्यांतून अत्यंत उत्साहाने साजरा झाला. लोक उत्सफूर्तपणे रोषणाई करीत होते. घर सजवत होते. राष्ट्रध्वज फडकवत होते. एवढेच काय सणासुदीप्रमाणे घराघरांतून गोडधोड पदार्थ बनले होते.

पण त्याच सुमारास पाकिस्तानांतून निर्वासितांचे लोंढे यायला सुरवात झाली होती. नगर जिल्ह्यांत विसापूर या गांवी सरकारी छावणी होती. त्याच परिसरांत निर्वासितांसाठी मोठी छावणी उभारण्यांत आली होती आणि शेकडो निर्वासितांची तात्पुरती व्यवस्था त्या छावणीत करण्यांत आली होती. थंडीचे दिवस होते. कपडे, धोंगड्या, भांडीकुंडी या सारखे सामान घेऊन आम्ही कांही सैनिक विसापूरला गेलो. ज्याला हवे ते द्यायचे होते. पण मला आठवतंय की, पांघरण्यासाठीच्या चादरी आणि धोंगड्यांखेरीज बहुतेकांनी बाकीच्या वस्तू घेण्याचे नाकारले. का ? तर त्याची त्यांना गरज नव्हती आणि गरजेपेक्षा जास्त त्यांना नको होते. कर्तारसिंग नावाचा एक तरूण त्या छावणींत भेटला. घरदार, सामान-सुमान सगळं काही उध्वस्त होऊन जेमतेम जीव वाचवत तो आणि त्याचं कुटुंब भारतांत आलं होतं. अशाही परिस्थितीत तो अभ्यास करीत होता. तो मॅट्रिकला होता. भारतांत मॅट्रिकच्या परीक्षेला बसू देण्याची निर्वासित मुलांसाठी सरकारने खास व्यवस्था केली होती. माझ्याजवळ एक पेन होतं, ते पेन त्याला आवडलं मी लगेच म्हटलं, “ठेव तू" पेन फारसं महाग नव्हतं. बरेच आढेवेढे घेत त्याने ते पेन घेतले.

जवळ जवळ आठ-दहा महिन्यांनंतर तो पत्ता शोधत नगरला माझ्या घरी आला. कशासाठी ? तर आभार मानून ते पेन परत द्यायला! मी अर्थातूच पेन घेतलं नाही. मी म्हटलं, ‘माझी आठवण म्हणून ठेव'! त्यानंतर कर्तारसिंग कुठे गेला, कुठे स्थिर झाला आजतागायत मला कांही समजलं नाही.

नगर शहरात सेवादलाचे कार्य जोरात सुरू होते. जिल्ह्यांतील ग्रामीण भागांतही सेवादलाच्या शाखा सुरू करायंच्या होत्या. कांही भागांमध्ये थोडे फार कार्य होत होते. पण कांही भागांमध्ये सेवादलाचे नांव नव्हते. म्हणून अशा भागांमध्ये सेवादलाचे कार्य व शाखा सुरू करण्याच्या दृष्टीने एक योजना तयार करण्यांत आली. दोघा-दोघांचा एक गट असे पाच-सहा गट तयार करण्यांत आले आणि प्रत्येक गटाकडे एकेक तालुका सोपविण्यांत आला. मी आणि शेख नावाचा एक सहकारी असे आम्हा दोघांना शेवगांवला पाठविण्यांत आले. नगरचे थोर नेते श्री. रावसाहेब पटवर्धन यांचे पत्र घेऊन आम्ही शेवगांवला श्री. बाळासाहेब भारदेंकडे गेलो. बाळासाहेबांना पत्र दिले. बाळासाहेब म्हणाले मुलांनो, 'कामाचे नंतर बघू. आधी हात-पाय, तोंड धुवून जेवायला बसा बरं'. जेवण वगैरे आटोपल्यावर बाळासाहेबांनी एका

इसमाला आमच्या बरोबर पाठवलं. म्हणाले, ‘बाबूला भेटून या. नंतर पुनः तुम्ही सर्व माझ्याकडे या'. गल्लीबोळांतून वळसे घेत आम्ही एके झोपडीवजा घरावनळ गेलो. वाकून आंत जाता येईल अशा फाटक्या-तुटक्या दारांतून बाबू बाहेर आला. आमच्या येण्याचा हेतू सांगितला. पुढे काय करावं यावर चर्चा केली व बाळासाहेबांकडे गेलो. बाबू तसा खूप गरीब. लाजरा-बुजरा वाटला. पण कामांत सच्चा. बाळासाहेब भारदेंच्या मार्गदर्शनाखाली आणि बाबूच्या मदतीने शेवगावांत सेवालाचे काम सुरू झाले. हा बाबू म्हणजे माजी मंत्री श्री बाबुराव भास्कर.

स्वातंत्र्याची चळवळ फोफावत गेली. तसं सेवादलांतील कार्यकर्त्यांच्या उत्साहाला देखील उधाण आलं. सेवादलातील नेहमीची कामे तर चालू होतीच. पण यापेक्षा वेगळं कांहीतरी करून आपंण या चळवळीत सक्रियपणे सहभागी झालं पाहिजे असं आमच्यापैकी कांही जणांना वाटलं. म्हणून आम्ही अहमदनगरचे ज्येष्ठ व श्रेष्ठ नेते श्री. रावसाहेब पटवर्धन यांना आम्हाला मार्गदर्शन करण्याकरिता बोलावलं. रावसाहेबाचं ज्यावतमव, विद्‌ठत्ता, वक्तृत्व, त्यांची नगर जिल्ह्यांतील लोकप्रियता या साऱ्यांना तोड नाही. पांढराशुभ्र खादीचा, झब्या, धोतर आणि अत्यंक कडक इस्त्रीची गांधी टोपी, गोरापान वर्ण, दिलखुलास हसणं. असे हे रावसाहेब आम्हा नगरकरांचं दैवत होते. त्यांची अफलातून भाषणे मला ऐकायला मिळाली हे माझं केवढं सद्‌भाग्य. मराठी, हिंदी, इंग्रजी सर्व भाषांवर त्यांचं प्रभुत्व होतं. गांधी मैदान किंवा वाडिया पार्कवर त्यांचं जाहीर व्याख्यान असलं की, मैदान लोकांच्या गर्दीने खचाखच भरून जाई. त्यांच्यासारखा वक्ता आजपर्यंत पाहिला नाही, ऐकला नाही. रावसाहेबांचा उल्लेख आला म्हणून एक गोष्ट आठवते. जी मी विसरूच शकत नाही. माझ्यासाठी तो एक अमोल ठेवा आहे. माझा मित्र मिश्रीलाल बोगावत, त्याच्या मोठ्या भावाचे सायकलीचे दुकान होते. त्यांनी मुंबईहून की कुठून तीन नवीन सायकली आणल्या होत्या. त्या काळांत रोल्सराईस व हर्रक्युलस या दोन सायकली खूप प्रख्यात होत्या. बोगावत यांच्या दुकानांत आलेल्या या नवीन सायकली त्या सर्व सायकलींयपेक्षा वेगळ्या होत्या. मुख्य म्हणजे ह्या सायकली इतर सायकलीयांपेक्षा उंचीने थोड्या लहान होत्या. त्यामुळे पांच सव्वा पांच फूट उंची असलेल्या माणसांना देखील या सायकलींवर आरामांत आरूढ होता येत असे. माझ्या मित्राने एक सायकल स्वत:साठी ठेवून घेतली. एक मला देऊ केली. मलाही ती सायकल खूप आवडली होती. माणिकभाऊंना म्हणजे मित्राच्या भावाला म्हटलं माझ्याकडे पैसे नाहीत अन्‌ वडिल मुंबईला गेले आहेत. ते म्हणाले अरे सायकल घेऊन जा आधी. पैशाचं मी आणि तुझे वडिल बघून घेऊ.

माझ्या आवडत्या सायकलीवरून मी एकदा चाललो होतो. समोरून रावसाहेब पायी येत होते. येणाऱ्या जाणाऱ्यांचे नमस्कार स्वीकारीत येत होते. रावसाहेब जवळ येताच मी पटकन्‌ सायकलीवरून खाली उतरलो. सायकल बाजूला घेतली. अदबीने उभा राहिलो. रावसाहेबांचे माझ्याकडे, माझ्या सायकलीकडे लक्ष गेले. त्यांनी मला खुणेने जवळ बोलावलं. सायकलीकडे टक लावून पहात त्यांनी सायकलीच्या सीटवरून, हॅन्डलवरून हात फिरवीत विचारलं कुठून आणली सायकंल ? रावसाहेबांना सायकल आवडली होती. त्यांची उंची कमी असल्यामुळे त्यांच्यासाठी ही सायकल खूप सोयीस्कर होती. मी त्यांना सायकल कुठून, कशी घेतली हे सांगितलं. रावसाहेबांना तशी सायकल असल्यास हवी होती.

मी रावसाहेबांना सांगितलं को आणखी एक सायकल आहे. रावसाहेब लगेचच माझ्याबरोबर सायकल दुकानाकडे यायला तयार झाले. संगळे दुकानदार दुकानाबाहेर येऊन रावसाहेबांना नमस्कार करीत होते. सबंध कापड बाजारांतून रावसाहेबांच्या बरोबर मी चालत जाताना मला किती आनंद झाला आणि अभिमान वाटला म्हणूनं-सांगू ! माणिकशेटनी रावसाहेबांच स्वागत केले. रावसाहेब आपल्या दुकानांतून सायकल घेतात याचा त्यांनाही गर्व होता.

त्या दिवसापासून, रावसाहेब पटवर्धनांची व माझी सायकल सारखीच आहे असे अभिमानाने मी अनेकांना सांगत सुटलो.

तर, सांगायच म्हणजे रावसाहेबांनी आम्हाला आता मार्गदर्शन करावे, उफाळलेल्या क्रांतीत यापुढे कशारीतीने सहभागी व्हावं हे सांगावं, म्हणून आम्ही रावसाहेबांना आमंत्रित केलं. नवी पेठेच्या कोपऱ्यावर असलेले डॉ. केतकरांचे घर म्हणजे सेवादलाचे काम असो को समाजसेवेची कोणतीही प्रवृत्ति असो, सर्वांसाठीचे केंद्रच. तिथेचं आम्ही बैठक आयोजित केली होती. आम्ही वीसेक कार्यकर्ते जमलो होतो. ठरलेल्या वेळी रावसाहेब आले. आम्ही आतुरतेने ज्या क्षणाची वाट पहात होतो तो क्षण आला. जून किंवा जुलैचा महिना असावा. शाळा कांही दिवसापूर्वीच सुरू झालेल्या. रावसाहेबांनी प्रथम शाळेची, झालेल्या वार्षिक परीक्षेची चौकशी केली. सर्व विषयामध्ये किती जण पास झालात म्हणून विचारले, आमच्या लोकांची आपसांत चुळबुळ सुरू झाली. रावसाहेबांनी पुन: तोच प्रश्न विचारला. आमच्यापैकी फक्त दोघेच जण असे होते जे सर्व विषयांत पास होऊन वरच्या वर्गात गेलो होतो मी आणि कांतीलाल मेहेर.

रावसाहेबांनी त्यांनतर न चिडता, न रागावता सांगितलं, बाळानो, तुमचं देशप्रेम, तुमचा उत्साह वाखणण्यासारखा आहे. पण लक्षांत ठेवा को, देश आता लवकरच स्वतंत्र होणारच आहे. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाचा कारभार चालविण्यासाठी, देशाला प्रगतिपथावर नेण्यासाठी उच्चशिक्षीत तरूणांची गरज पडणार आहे. म्हणून तुम्ही अभ्यासावर लक्ष केंद्रित करा. खूप शिक्षण घ्या. सद्या चालू असलेल्या लढा आम्ही लढतो आहोत. ते पुरेसं आहे. स्वातंत्र्यानंतरची लढाई तुम्हाला लढायची आहे. अभ्यासक्रमाव्यतिरिकक्त देखील खूब वाचन करा अस सांगून त्यांनी वीस-पंचवीस पुस्तकांची यादी तिथल्या तिथं बनवून आम्हाला दिली. ही पुस्तकं जर तुम्हाला मिळण्यात अडचण वाटत असेल माझ्याकडे या. माझ्या जवळ सगळी पुस्तके आहेत.

रावसाहेबांचा स्वतःचा पुस्तक-ग्रंथांचा संग्रह इतका प्रचंड होता की, दृष्ट लागावी. राजकरण संन्यास घेऊन नगर सोडून जाताना रावसाहेबांनी आपल संपूर्ण ग्रंथ भांडार अहमदनगर कॉलेजला देऊन टाकलं.

रावसाहेबांचे धाकटे बंधू आणि भूमिगत चळवळीतील क्रांतीवीर अच्युतराव पटवर्धनानीही एकदा असाच मोलाचा सल्ला दिला. आमच्यापैकी एक जण त्यांना म्हणाला होता आम्ही देशासाठी जीव द्यायला तयार आहोत. अच्युतरावानी त्याला विचारल की, तुला -सायकल चालवता येते ? पोहता येतं का ? मोटार चालवायला येते ? दहा पंधरा मैल धावत जाऊ शकशील?

हे सर्व येत असेल तर तुझा कांही तरी उपयोग होईल. नुसता जीव देऊन काय उपयोग ? स्वातंत्र चळवळीच्या त्या ' धुमश्चक्रीत' अनेकांची भाषणं, पोवाडे, चर्चा ऐकायला मिळाल्या. पटवर्धन गुरुजी नावाचे एक राष्ट्रीय कीर्तनकार होते. महाराष्ट्रांत त्यांची कोर्तनं खूप गाजली. एकदा नगरमध्ये त्यांची कोर्तने आयोजित केली गेली. डांगे गल्लीतील दत्त मंदीरात रात्री त्यांचे कोर्तने होत असे. कीर्तन सुरू व्हायच्या कितीतरी वेळ आधी दत्तमंदीराच्या आतील सगळ आवार श्रोत्यानी भरून जाई. त्यांच किर्तन म्हणजे आगीचा निखारा!

नगर शहराला लागूनच ब्रिटीश लष्कराचा कॅम्प होता. त्या भागात ब्रिटीश सैनिक व अधिकाऱ्यांची वसाहत, त्यांचे बंगले, त्यांच्या कवायतीची मैदाने, नेमबाजी, घोडेस्वारीच्या जागा, रणगाडे इत्यादि सर्व काही होते. नगरच्या नागरिकांना विशेषत: महिलांना कॅम्पांत जाणं अशक्य होतं. त्यांना भीति वाटायची. नगरच्या सुप्रसिद्ध किल्ल्यापासून पुढे महिलांना कॅम्पची हद्द सुरू होई. गावांतील कांही लोकांचे एक शिष्टमंडळ एकदा दुपारी बुवांना भेटायला गेले. अन् त्यांनी आपली कैफियत बुवांना सांगितली. महाराज, आमच्या गावा शेजारीच ब्रिटीशांचा कॅम्प आहे. तिथे ब्रिटीश सोजिरांचीच वस्ती. पण आमच्या आया-बहिणी किल्ल्याच्या भागात देखील संध्याकाळी फिरायला जायला घाबरतात. कारण ते गोरे सोल्जर वाईट नजरेने बघतात. छेडही काढतात. बायकांचा विनयभंग केल्याचे प्रकरही घडलेत. आपणच काय तो रे दाखवा. बुवा म्हणाले, आज रात्री कीर्तनाचे वेळी तुमच्या प्रश्नाचं उत्तर देईन.

त्या रात्री मीही कौर्तनाला गेलो होतो. दुपारचा प्रकार अर्थात, आम्हाला कुणाला माहीत नव्हता. आरती वगैरे आटोपल्यावर कोर्तनाला सुरुवात करण्यापूर्वी बुवानी विचारले तुम्हा पुरूषमंडळीपैकी जे जे तरूण असतील त्यांनी उभे रहावे. लोकाना कळेना बुवा काय ‘म्हणताहेत ते. ते पुनः गरजले की आपण तरूण आहोत असं ज्यांना ज्यांना वाटतंय त्यांनी उभे रहावे म्हटलं! कांही लोक उभे राहीले. लोकांना अजूनही बुवा का असे विचारताहेत हे समजेना. उभे राहीलेल्या लोकांवरून एक नजर फिरवीत बुवा म्हणाले इतके सारे तरूण! मला तर गावांत सगळे षंढ दिसताहेत. लोक अवाक् झाले. मग बुवानी दुपारी त्यांना भेटायला गेलेल्या शिष्टमंडळाची, त्यांनी केलेल्या तक्रारींची सगळी हकिकत सांगितली अन् म्हणाले जर तुमच्या गावांत इतके तरूण असते तर अशी तक्रार घेऊन गावातले लोक माझ्यासारख्या म्हाताऱयाकडे आले नसते... आणि मग आवाज चढवीत म्हणाले तुमच्या आया-बहिणींची अब्रू त्या गोऱ्यांमुळे धोक्यात आहे अस सांगताना तुम्हाला लाज वाटली पाहीजे. आपल्या आया-बहिणींकडे वाकड्या नजरेने बघणाऱ्यांचे डोळे फोडा. हात लावणाऱयांचे हात कापून टाका. अरे मी तर म्हणतो आता पुढच्या वेळेला त्या गोऱ्या सोल्जरांनी रडत माझ्याकडे येऊन तक्रार करू दे की, आमच्या

मडमिणींचा विनयभंग तुमचे तरूण करताहेत. मग मी तुम्हाला खरे तरूण, खरे मर्द म्हणेन ! त्या कीर्तनाच्या नुसत्या आठवणीने आज अंगावर शहारे येतात.

ब्रिटीश सरकारने त्यांच्या कौर्तनांवर लगेच त्यानंतर बंदी घातली आणि नगरमधून हद्दपार केले.

मुलांना व्यायामाची आवड निर्माण व्हावी म्हणून बुवानी एक अभिनव उपक्रम सुरू केला होता. पहाटे पांच-साडे पांच वाजता मुलांना सूर्यनमस्कार. घालायला दत्तमंदिरात बोलवायचे. सूर्यनमस्कार न येणाऱ्यांना ते शिकवायचे आणि शंभरपर्यंत सूर्यनमस्कार घालणाऱयांना एकेक व त्यापेक्षा अधिक सूर्य नमस्कार घालणाऱ्या मुलाना शेंगदाण्याचे दोन- दोन लाडू स्वत:च्या हाताने वाटायचे.

रावसाहेब पटवर्धनांचं वक्तृत्व, बुवांचं कीर्तन, साने गुरूजींची भाषणे या साऱ्यांचा जसा मनावर प्रभाव पडला तसे कांही साध्या-सुध्या सामान्य समजल्या जाणाऱ्या लोकांच्या बाबतीत आलेले अनुभव, त्यांचे बोलही कायमचे लक्षांत राहून गेले. सेवादलाच्या शाखेमध्ये शाखा सुटल्याच्या पंधरा मिनिटे आधी मुलाना आजच्या प्रमुख बातम्या सांगण्यांत येत. त्या बातम्यांची पार्श्वभूमि वगैरे समजवून सांगितली जाई. आमच्या शाखेत श्री. अडकर नावांच्या सदगृहस्थांनी ही कामगिरी स्वखुशीने स्वीकारली होती. अडकरांचे स्वतःचे चष्म्याचे दुकान होते, तरी दुकान थोडावेळ नोकरांच्या हवाली करून ते रोज बातम्या सांगायला येत. वाचनाचा छंद. डोळ्यावर जाड भिंगाचा चष्मा. सदैव समाधानी चेहरा असं त्यांचं व्यक्तिमत्व. हे वास्तविक चष्म्यांचे दुकान तसे छोटेसे. किरकोळ गिऱ्हाईकी. पण नेहमी अडकर शांत. मी त्यांना एकद सहज म्हणालो अडकर तुम्ही सदैव इतके शांत व समाधानी कसे हो ? तुमच्या चेहऱ्यावर कधी दु:ख, चिंता वगैरे दिसत नाही. अडकर म्हणाले, हे बघ मी आहे चष्म्याचा व्यापारी. जीवनांत येणाऱ्या सुखाच्या क्षणांकडे अंतर्गोल भिगांतहून बघतो (म्हणजे लहान वस्तू मोठी दिसते) आणि दु:खाच्या क्षणांकडे बहिर्गोल भिंगातून बघतो. (मोठी वस्तू लहान दिसते.)

*********************************

प्रकरण - ७.

# वंदे मातरम् मिठाईवाला

आमच्या एका शिक्षकांनी सांगितलेली ही घटना. स्वातंत्र्वच्चळवळीचा तो काळ. चळवळीत प्रत्यक्ष सहभागी न झालेले लोकही देशप्रेमाच्या भावनेने भारावून गेलेले. सोसायटी, हायस्कूलच्या वाटेवर एक छोटेसे टपरीवजा मिठाईचे दुकान होते. सकाळी शाळेत जाताना एक मुलगा त्या दुकानाजवळ थांबला. नुकत्याच बनविलेल्या पेढ्यांच्या ताटाकडे तो बघत राहिला. खिशांत तर पैसा नाही अन् पेढे पाहून तोंडाला पाणी सुटलेले. बराच वेळ तो मुलगा नुसताच उभा होता. दुकानाच्या भैय्याने विचारले. काय पाहिजे. मुलाने नुसती नकारार्थी मान हलवली.

दुकानदार चिडला, "“बहोनी का टाईम है। जाओ यहांसे"
“अरे शेट एक पेढा देना मला" मुलगा
“पैसा है ?" दुकानदार
पुन: नकार. दुकानदार आणखीनच चिडला.
“जा बाबा जा"
पण पोरगा काही तिथून हलेना. तो कळवळून एक पेढा मागत होता.

दुकानदाराला काय वाटले कोण जाणे. तो म्हणाला "एक बार जोरसे वंदे मातरम् बोल"


“वंदे मातरम्" मुलगा ओरडला आणि दुकानदाराने हातावर ठेवलेला पेढा खात शाळेकडे पळाला. शाळेत जाऊन सगळ्या मित्राना सांगितले की, 'वंदे मारतम्' म्हटलं को तो मिठाईवाला पेढा देतो. शाळा सुरू व्हायला अवकाश होता.

त्या मिठाईवाल्या दुकानाजवळ पोरांची रंग लागली. तो दुकानदारही जोशांत आला.


“वंदे मातरम्" एक पेढा दिला. दुसरा, तिसरा वंदेमारतम्च्या घोषणेने वातावरण दुमदुमून गेले. दुकानातील सर्व पेढे संपले. एव्हाना गावातही बातली पसरली व त्या दुकानाजवळ बघ्यांची ही गर्दी जमली. पोलीसही आले.

दुसऱ्या दिवशी पहातात तो काय. ! ते दुकान उघ्वस्त झाले होते आणि तो दुकानदार भैय्या कुठे गेला, कांही समजले नाही.

**********************************




प्राचार्य डॉ. टी. बार्नबस



प्राचार्य डॉ. जे. बार्नबस



कॉलेजचे संस्थापक डॉ. हिवाळे





श्री नवाथे –मुख्याध्यापक



श्री क्षीरसागर – मुख्याध्यापक



## प्रकारण - ८

# सभा जयप्रकाशांची

त्या दिवशी सकाळपासून गावांत उत्साहाचे वातावरण होते. युवा आणि क्रांतिकारी जेते जयप्रकाश नारायण यांची सोसायटी हायस्कूलच्या मैदानावर जाहीर सभा होती. आजच्या पिढीला जयप्रकाशांची जी ओळख आहे ती आणीबाणीच्या काळातील महान नेते आणि नामाचे शिल्पकार अशी. आणीबाणीच्या काळांतील त्यांचे नेतृत्व व कतृत्व दैदिप्यमान हेते यांत शंकाच नाही.

पण आम्ही सेवादलातील सैनिक १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळातच श्री जयप्रकाशांच्या नेतृत्व आणि वक्तृत्वाने प्रभावित झालो होतो. त्यामुळे अशा थोर नेत्याची सभा आणि त्यांच्या भाषणाची संधी मिळते म्हणून आम्ही अति उत्साहांत होतो. सभेची व्यवस्था, जयप्रकाशजींची सुरक्षा सांभाळण्याची जबाबदारी आम्हा सेवादल सैनिकांवर होती. ही जबाबदारी महत्वाची आणि जोखिमीचीही होती. कारण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या लोकांनी ही सभा उधळून लावण्याचे ठरविले असल्याचे आमच्या कानावर आले होते. म्हणून आम्ही जरा जास्तच दक्ष आणि सावध होतो. काय वाटेल ते झाले तरी जयप्रकाशजींची सभा यशस्वीपणे पार पाडायचीच अशा निर्धाराने आम्ही कामाला लागलो.

बीस पंचवीस निवडक सैनिक निवडले. त्यांचे चार - पाच गट केले. एक गट सोसायटी हायस्कूलच्या मैदानाच्या प्रवेशदाराजवळ, एक मैदानाच्या मागे असलेल्या मोकळ्या जागेवर. एक गटजयंप्रकाशजी आले की त्यांच्या अवतीभोवती, अशी ठिकठिकाणी व्यवस्था केली. या सर्व सैनिकांनवळ अर्थातच लाठ्या होत्या. आमची हिंसात्मक कारवाई करण्याची अजिबात इच्छा नव्हती पण कुणी हिंसात्मक पावले टाकलीच तर त्याला प्रतिकार व प्रतिबंध करणे आवश्यक होते. सर्वांना तशा सूचना दिल्या होत्या. निवडलेले सर्व सैनिक मजबूत अंगाचे व मनोबळाचे होते. शिवाय मैदानाच्या बाहेर मंगळवार बाजार आणि कोर्ट गल्लीच्या बाजूला कांही सैनिक टेहळणीसाठी ठेवले होते. कांही संशयास्पद हालचाल दिसली की त्यांनी लगेच आम्हाला खबर द्यायची.

अशा गंभीर परिस्थितींतही गमतीशीर प्रसंगही घडतात. जयप्रकाशजींच्या भोवताली रहाण्याची जबांबदारी ज्यांच्यावर होती त्यांत माझे मित्र हिंमत शाह होते. तो नावाप्रमाणे हिंमतबाज पणं शरीराने धष्टपुष्ट नव्हता. मला म्हणाला, “माझं शरीर ब ताकद बघ. मी काय झालाच लाठी चालवणार?"

मी म्हटलं "तुला अजिबात लाठी चालवायची नाही. जयप्रकाशांच्या दिशेने हल्ला झालाच तर त्या लाठ्या तू अंगावर घ्यायच्या आहेत एवढंच.”

पण सुदैवाने सभा सुरळीत. पार पडली. “जयप्रकाश की सभा तोडने की व्य कर किसीने की है, न कोई कर सकेगा" टाळ्यांच्या कडकडारांत जयप्रकाशजोंनी भाषणास आरंभ केला.

**सरोश टॉक्किज - बॉम्ब केस**

नगर शहर आणि कन्टोनमेंट (लष्करी वसाहत) यांच्या सीमेवर असलेलं हे सिनेमा थिएटर १९४५ साली या थिएटरमध्ये झालेल्या बॉम्बस्फोट म्हणजे १९४२च्या क्रांतीत गाजलेलं प्रकरणं होय. ९१९४५च्या नाताळमध्ये हे थिएटर ब्रिटीश सैनिकांसाठी राखीव ठेवलं होतं. म्हणजे ब्रिटीश सैनिकांशिवाय इतरांना प्रवेश नाही. तर या थिएटरमध्ये २५ डिसेंबर १९४५ रोजी प्रचंड बॉम्ब स्फोट झाला व त्यांत आठ ब्रिटीश सैनिक ठार झाले. सरकार दरले! तातडीने तपास सुरु झाला.

या प्रकरणांतील एक प्रमुख आरोपी कॅप्टन घाटगे, जे नेताजी सुभाषचंद्रांच्या आझाद हिंद सेनेत होते माझे मित्र होते. ते बराच वेळ घरी येत, तसेच अंबर गांधी, शेख हेही येत. माझे घर हे नेहमी मित्र व सेवादल सैनिकांसाठी भेटीगाठीचे ठिकाण. कॅ. घाटगे, गांधी आणि शेख यांच्या भेटीगांठी व खलबते होत होती. सरोश वॅकिजांत बॉम्ब स्फोट घडविण्याचा कट याच बैठकीत ठरला. मला सकत ताकीद देण्यांत आली की याबाबत कुणाशीही एक शब्द ही बोलू नको. माझ्या घरच्या लोकांशीही नाही. कॅ. घाटगे त्यानंतर जे भूमीगत झाले ते भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच प्रगट झाले ! तर या प्रकरणातील तपास चालू 'पोलिसांनी मलाही बोलावून खोदून प्रश्न विचारले. तुम्ही घाटगेंना ओळखता का? तुमच्या घरी आणखी कोण -कोण येत होते ? कशासाठी यायचे ? तुम्हाला काय, काय माहीत आहे - वगैरे. दोन - तीन दिवस दररोज तसन तास मला चौकीत बसवून प्रश्नांचा भडिमार केला. धमकीही दिली. पण माझे उत्तर एकच मू घाटगेना ओळकतो. पण या बॉम्ब प्रकरणाबद्दल माला काहीही माहीत नाही. शेवटी माझे वडील पोलिस स्टेशनात आले आणि त्या फौजदाराला म्हणाले "माझ्या मुलाची चौकशी बंद करा नाहीतर मी व माझे सर्व कुटुंबीय आम्ही एथेच मुक्काम करतो."

नाईलाजाने पोलिसांनी माझी ती चौकशी बंद केली.

*********************************

# राष्ट्रपति राजेन्द्र प्रसादांचे स्वागत

आम्हाला बातमी लागली कौ, राष्ट्रपति राजेन्द्र प्रसाद हे बंगलोर - दिल्ली ह्या खास डीन दिल्लीला जाणार आहेत. खरं म्हणजे या बातमीत तसे विशेष काय होते ? विशेष म्हणजे ही गाडी अहमदनगर मार्गे दिल्लीला जाणार होती. पण... पण आम्हाला दु:ख याचेंच होते की, ही गाडी नगर स्टेशनवर थांबणार नव्हती. दिल्लीला जाऊन राष्ट्रपतिना भेटणे आम्हाला शक्य नव्हते, पण त्यांना घेऊन जाणारी ही गाडी नगर स्टेशनवर थोडा वेळ थांबली तर तिथे जाऊन राष्ट्रपतिंचे दर्शन घेता आले असते. आम्ही विचारांत पडलो.

दत्ता शेरकर म्हणाला की, आपल्यापैकी पाच-सहा जणांनी स्टेशनाजवळ रूळावर आडवे पडून सत्याग्रह करू या. मी म्हटलं, त्याचा कांही उपयोग होणार नाही. पोलिस बंदोबस्त पक्का असणार. ते आपल्यांला उठवतील, नुसते उठवणार नाहीत, अटक करून आपल्या विरुध्ध गुन्हा दाखल करतील. शेवटी अशा सत्याग्रहाचा विचार सोडून सामोपचाराने मार्ग काढण्याचे ठरवून स्टेशन गाठलं. स्टेशन मास्तरांना भेटलो आणि राष्ट्रपतिना घेऊन जाणाऱ्या गाडीला कांहीही करून नगर स्टेशनवर दोनच मिनिटे थांबवा अशी विनंती केली. आमच्या भावना त्याला समजू शकत होत्या. पण भावनेपेक्षा कर्तत्व श्रेष्ठ. स्टेशन मास्तर म्हणाले “ते शक्य नाही. माझी नोकरी जाईल" आम्ही घाईघाइने पुनः गावांत आलो आणि नगरचे खासदार श्री बोगावत यांना भेटलो. राष्ट्रपतींना भेटण्याची आमची तळमळ त्यांना सांगितली. श्री बोगावत आमच्याबरोबर आले. स्टेशनमास्तरांना भेटले आणि म्हणाले "तुम्ही काळजी करू नका. तुमच्या नोकरीवर गदा येणार नाही याची हमी मी देतो. मी स्वत: राष्ट्रपतिंशी याबाबत बोलेन. स्टेशनमास्तर तयार झाले.

त्या दिवशी हार आणि गुच्छ वगैरे घेऊन आम्ही गाडी यायच्या तासभर आधीपासून स्टेशनवर मुक्काम केला. ठरल्याप्रमाणे गाडी अहमदनगर स्टेशनांत थांबविण्यांत खासदासर श्री. बोगावत यांच्यासह आम्ही उड्या मारीत राष्ट्रपति श्री राजेन्द्रप्रसाद स्वागतासाठी पुढे सरसावलो. अत्यंत साध्या वेषांत असलेले भारताचे पहिले राष्ट्रपति राजेद्गप्रसाद दोन्ही हात जोडून सर्वांना नमस्कार करीत हसतमुखाने गाडीतून बाहेर आले. गुच्छ देऊन आम्ही त्यांचे स्वागत केले. आम्ही धन्य झालो.

*********************************

प्रकरण - १०

# अच्युतराव - गोळवलकर गुरुजी भेट

आपल्या ध्यानीमनी नसताना एखाद्या महान व्यक्तिची कशी भेट होऊ शकते याचा अनुभव मला नगरला असताना अचानकच आला. अच्युतराव पटवर्धन पगोरशीच पटवर्धन वाड्यांत रहात होते. बेचाळीसची चळवळ यशस्वी होऊन भारत स्वतंत्र झाल्यानंतरचा हा काळ. मी आणि सेवादलातील माझे सहकारी मित्र, सुरेश डावरे अच्युतरावांना भेटायला गेलो. रावसाहेब आणि अच्युतराव पटवर्धन बंधूंकडून सल्लामसलत व मार्गदर्शनासाठी अधून मधून आम्ही जातच असू. त्यांचे मार्गदर्शन अर्थातच खूप मौल्यवान असे.

अच्युतरावांनी हसतमुखाने आमचे स्वागत केले. ते म्हणाले की, स्वयंसेवक संघाचे प्रमुख श्री गोळवलगुरुजी नगरमध्ये आले आहेत. माझी चिठ्ठी त्यांना नेऊन द्या आणि माझे आग्रहाचे आमंत्रण आहे असे सांगा. मी व सुरेश थोडे बुचकळ्यांत पडलो. पटबर्धन कट्टर कॉँग्रेसबादी आणि गुरुजी संघाचे नेते. अच्युतरावांनी आमची मानसिकता ओळखली. म्हणाले "अरे राजकारण आणि वैयक्तिक संबंध याची गल्लत नका करू. गुरुजी थोर आहेत. जा तुम्ही!' गुरुजींचा मुक्काम बागडे यांच्या वाड्यांत होता. श्री बागडे संघाचे निष्ठावंत कार्यकर्ते. त्यांचा वाडाही मोठा व प्रशस्त होता. आम्ही ताबडतोब निघालो.

बागडेंच्या वाड्यावरही लोकांची गर्दी आणि स्वयंसेवकांचा कडक बंदोबस्त होता. ते स्वयंसेबकही तसे ओळखीचे होते पण म्हणाले को, अगाऊ भेटीची वेळ दिल्याशिवाय गुरुजी भेटणार नाहीत. अखेर अच्युतरावांची चिठ्ठी दाखवली तेव्हा आम्हाला आत जाऊ दिले. गोळवलकर गुरुजींना प्रत्यक्ष पहिल्यांदाच पहात होतो. अत्यंत धीरगंभीर आणि प्रभावशाली व्यक्तिमत्व, आम्ही वाकून नमस्कार केला आणि अच्युतरावांची चिठ्ठी त्यांना दिली. गुरुजी
हसले. म्हणाले की, मी येतो पण माझी एक अट आहे. सुरेश लगेच म्हणाला, "'गुरुजी, तुमची अट आम्हाला माहीत आहे. अट मान्य आहे असं अच्युतरावांनी आधीच कबूल केलय.

अच्युतराव आणि गोळवलकर गुरुजी बनारस हिंदू विश्वविद्यालयात एकाच वेळी एकत्र शिकत होते. त्यामुळे दोघांचे स्वभाव व सवयी एकमेकांना चांगल्या माहित होत्या.

मी व सुरेश डावरे गुरुजींसोबत पटवर्धन वाड्यावर पोहोचलो. अच्युतराव वाड्याच्या रा 'दाराशीच गुरुजींच्या स्वागतासाठी उभे होते. गुरुजी व अच्युतराव तास दीडतास आतल्या खोलीत गप्पा मारीत.बसले होते. गुरुजींच्या सवयी व अटीनुसार त्यांनी स्वतः चहा बनविला तर अच्युतरावांनी स्वतः शिरा बनविला. आमचं भाग्य मोठं की, दोन वेगळ्या महान ड्या हातचा बनविलेला शिरा व चहा बाहेर वऱहांड्यात आमच्या वाट्याला आला.

या घटनेनंतर पाच-सहा वर्षांच्या दीर्घ काळानंतर काही कामानिमित्त मी व सुरेश डावरे गेलो होतो. गोळवलकर गुरुजी त्यावेळी नागपुरांतच होते. आमचं काम आटोपलं. ती सुरेशला म्हटलं, आपल्याजवळ बराच वेळ आहे. गुरुजींना जाऊन भेटू या. संध्याकाळी ग्रीव सुरेश संघ कार्यालयांत गेलो. मुलाखतीस येणाऱ्यांना गुरुजी भेटत होते. कांही वेळानंतर आम्हाला संधी मिळाली. आम्ही गुरुजी बसले होते त्या खोलीत गेलो. लांबूनच नमस्कार केला.

“या, या, हे बघा कोण आलंय? दूत आलेत दूत" गुरुजी त्यांच्या जवळ असलेल्या कार्यकर्त्यांना उद्‌देशून म्हणाले.

मी व सुरेश एकमेकांकडे बघत राहिलो. आमच्या नगरला धूत कुटुंब प्रसिद्ध आहे. आम्हाला वाटलं गुरुजींचा गैरसमज झालाय. आम्हाला ते धूत कुटुंबियांपैकीच समजले आहेत. सुरेश लगेच म्हणाला, *'गुरुजी आम्ही धूत नाही. हा शहा आणि मी डावरे."

गुरुजी मोठ्याने हसले, म्हणाले “अरे मला माहीत आहे. तुम्ही धूत नाही. तुम्ही दूत आहात दूत, अच्युतरावांचा निरोप घेऊन येणारे दूत."

किती अफाट स्मरणशक्ति! शेकडो कार्यकर्ते आणि हजारो लोकांचा सतत संपर्क असलेल्या महापुरुषाने आमच्या सारख्या सामान्य माणसांना इतक्यावर्षांनंतर ओळखावे ! आम्ही गुरुजींना साक्षात दंडवत नमस्कार केला.

*********************************

प्रकरण- ११

# नगरचा किलूला आणि पंडित नेहरू

नगरचा किलला हे आम्हा नगरकरांचे खास आकर्षण. ऐतिहासिक स्थळ म्हणून या किलल्याला महत्व आहेच. परंतु १९४२ च्या स्वातंत्र्य-लढ्यात पं. नेहरूसह सर्व प्रमुख नेत्यांना याच किल्ल्यांत बंदिस्त केले होते म्हणून हा किलूला देशभर प्रसिद्धीच्या झोतांत आला. शहर आणि लष्करी छावणीच्या सरहद्दीवर असलेला हा किलूला असलेले ठिकाण अत्यंत शांत. कडूलिंब, चिंच आदि दाट हिरव्यागार झाडांनी वेढलेला परिसर. नगरवासियांचे फिरायला जाण्याचे आवडते ठिकाण. किलूल्याच्या बाजूलाच असलेल्या मोठ्या मैदानावर क्रिकेटचे सामने खेळण्याचा आणि सामने पहाण्याचा भरपूर आनंद आम्ही लुटला आहे.

ब्रिटीशांच्या काळांत या किलूल्याच्या आंत जाण्याची संधि मात्र आम्हाला कधीच मिळाली नाही. पण स्वातंत्र्यानंतर या किल्ल्याच्या आंत जाण्याची जी संधी मला मिळाली तो प्रसंग मात्र आयुष्यातील एक अविस्मरणीय आठवण म्हणून मनावर कायमचा कोरला गेला आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू नगरला आले तेव्हा ज्या किल्ल्यांत बंदिवान म्हणून त्यांना ठेवले होते त्याच किलल्याला पंतप्रधान या नात्याने ते आता भेट देणार होते. लोकांच्या आनंदाला आणि उत्साहाला सीमा नव्हती. नेहरू किलल्यांत बंदिस्त असताना त्या किलल्यांत माळीकाम करणारा रघू नावाचा एक नोकर रोज नेहरूंना सुंदर फुले नेऊन देई. हा रघु निवृत्त होऊन नगर जिल्ह्यांतील राशीन या आपल्या गांवी जाऊन स्थिर झाला होता. माझे एक खास मित्र हिंमत शहा याचे मामा राशीनचेच. नुसते राशीनकर नव्हे तर गांवातील एक बडी आसामी म्हणून प्रसिद्ध होते. त्या रघूची पं. नेहरूंशी गाठ घालून द्यायची असे ठरवून ते एक दिवस आधीच रघूला घेऊन नगरला आले. मुक्काम माझे मित्र हिंमत शाह यांचे घरी. आम्ही कलेक्टर साहेबांना भेटून नेहरू किलल्याला भेट देतील त्यावेळी रघूची व त्यांची भेट घडवुन आणायला संमति मिळवलो. त्यांच्या बरोबर मी, हिंमत शाह आणि आणखी दोनचार मित्रही जाणार होतो. अर्थात त्यावेळी सिक्युरिटी, पास, रक्षकांच्या गराड्यांत पंतप्रधान असा प्रकार नव्हता. नेहरू तर उघड्या जीपमध्ये उभे राहून प्रवास करायचे आणि वाटेत कुठेही लहान मुलांचा घोळका हात हलवीत त्यांचे अभिवादन करताना दिसला की गाडीतून उतरून त्या मुलांना भेटल्याशिवाय पुढे जात नसत.

किलल्यांत काम करणारा जुना नोकर रघू तुम्हाला भेटणार आहे हे नेहरूंना मुद्दाम सांगितले नव्हते. नेहरूंची गाडी किलल्यांत आली आणि लोकांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. आम्ही व्ही.आय.पी. रघू बरोबर नेहरूंना ज्या खोलीत ठेवले होते तिथून जवळच उभे होतो. कलेक्टर आणि इतर मान्यवरांसह नेहरू त्या खोलीजवळ आले. खोली पाहून नेहरू बाहेर आले तेव्हा कलेक्टरांनी त्यांना विचारले की, आपण इथे असताना रोज फुलं आणून देणारा रघु आठवतो का ? तर हो हो आठवतो ना. अब कहां है वह? नेहरूंनी विचारले. तो निवृत्त झाल्याचे त्यांना सांगण्यांत आले. मग

गमतीने त्यांना विचारले की सर, त्याला आपण इथूनच हांक मारून बोलवत होता असं ऐकतो. तर आपण कशी हांक मारायचे सर ?

नेहरूही जुन्या आठवणींमध्ये रममाण झाले होते. लगेच दोन पावले पुढे आले आणि 'अरे रघू' अशी हाक मारली.

रघू फुलांचा गुच्छ घेऊन नाहरुंपुढे हनर झाला. नेहरू अवाक् झाले. आणि दुसऱ्याच क्षणी भारताचे पंतप्रधान नेहरूंनी एका निवृत्त चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याला कडकडून मिठी मारली. रघूच्या डोळ्यांतील आनंदाश्रू आणि या कृष्ण-सुदाम्याची ही भेट पाहून आम्ही
सगळे भारावून गेलो.

नेहरुंनी तात्काळ रघूला त्याच्या गावांत पाच एकर जमीन देण्याचे आदेश दिले आणि त्यानुसार रघूला जमीन मिळाली देखील.

********************************

प्रकरण - १२

# जिवाची मुंबई

इंटरपर्यंत अहमदनगर कॉलेजात शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षणासाठी मुंबईला येऊन विल्सन कॉलेजात दाखल झालो. नगर कॉलेजच्या स्नेह संमेलनानिमित्त होणाऱ्या नारकांत मी भाग घेतला होता. आणि भावबंधन या नाटकात घन:श्यामची भूमिका केल्यापासून वर्मी हवेत तरंगत होतो. विल्सन कॉलेजात दाखल झालो तेव्हांही नाटकाचे भूत डोक्यावर होतेच. एकदा कॉलेजातून बाहेर पडताना नोटीस बोर्डावरची एक नोटीस वाचली.

सालाबादप्रमाणे आंतरमहाविद्यालयीन नाट्यस्पर्धा होणार असून ज्यांना मराठी नार्य स्पर्धेत भाग घ्यायचा आहे त्यांनी १६ जुलै रोजी तळमजल्यावरील हॉलमध्ये भेटावे !

- मल्हार ढगे,
मराठी वाड्मय मंडळ

त्यानंतर जुलैच्या पहिल्या आठवड्यातच त्या हॉलमध्ये कांही मंडळी रिहर्सल करीत असल्याचे दिसले. त्यांचा आवाज कानी आला. मी तातडीने तिथे गेलो. चौकशी केली. वाडूमय मंडळाचे मल्हार ढगे भेटले. मी त्यांना विचारले की, 'ही कसली तालीम आहे' ? ते म्हणाले 'कसली म्हणजे ? अहो आंतर महाविद्यालयीन स्पर्धेची'

मी म्हटलं, 'हा तर जुलैचा पहिला आठवडा. मग तुम्ही ती १६ जुलैची नोटीस कशाला लावलीत ?' ढगे म्हणाले, 'अहो असं काय करताय? विजया जयवंत (आता विजया मेहता) डॉ. करमरकर, मधू वगळ हे आपले नामवंत कलावंतच काम करताहेत'. मी आवाज चढवून म्हणालो, 'म्हणजे ? त्यांच्यापेक्षा चांगले कलावंत नाहीतच की काय?' वगैरे-वगैरे. नाटकाचे दिग्दर्शन करीत होते दाजी भाटवडेकर! मी नगरहून आलेलो. कोण विजयाबाई, कोण भाटवडेकर... मला कांहीही माहित नव्हते. शिवाय आपण फार मोठे नट आहोत अशी डोक्यात हवा भरलेली. दाजींनी ढगेना बोलवून काय प्रकार आहे याची चौकशी केली. प्रॅक्टिस थांबवून त्यांनी मला बोलावले. माझी सगळी चौकशी केली. पाठीवर थाप मारून मला बसायला सांगितले. ढगे, डॉ. करमरकरांशी कांहीतरी चर्चा केली आणि कोणत्या तरी (नांव आठवत नाही) नाटकातील एक संवाद मला बोलून दाखवायला सांगितलं.

दुसऱ्या दिवसापासून मला यायला सांगितले. आठ-दहा दिवसज्याच्या तालमी चालल्या त्या तो प्रवेश या थोर कलावंत मंडळीनी रद्द केला आणि मला सामावून घेण्यासाठी दुसऱ्या नाटकातील प्रवेश निवडला. त्यांत विजया महेता, डॉ. करमरकर, मधू वगळ, मी आणि शुभा खोटे अशी पांच पात्रे होती.

नंतर ओळखी वाढल्या. मैत्री झाली सगळ्यांशी. आणि विजया महेता, दाजी भाटवडेकर चो किती ग्रेट आहेत हे जेव्हां मला समजलं तेव्हां मी खजील झालो. प्रॅक्टिस दरम्यानच त्यांची क्षमा मागितली. त्यावर ढगे म्हणाला, 'अरे नाही. उलट आम्ही तुझं कौतुक करतो. तुझ्या जिद्दीबद्दल. नाटकाबद्दलच्या तुझ्या प्रेमाबद्दल.'

कॉलेजातील या नाट्यामुळे मल्हार ढगे, मधू वगळ, रामदास कामत, वैनतेय विल्सन शुभा खोटे सारख्यांशी मैत्री जडली जी आजही कायम आहे.

मुंबईच्या विल्सन कॉलेजातून पदवी परीक्षा घेऊन बाहेर तर पडलो. पण पुढे काय हा खरा प्रश्न आता माझ्यापुढे उभा होता, आतापर्यंत जीवन तसे कोणत्याही खास समस्येशिवाय चालले होते. वडिलांचं पाठबळ होतं. आता देखील वडिल होते पण पाठबळ नव्हतं. भरतकामाचा त्यांचा धंदा साफ बसला होता. आर्थिक उत्पन्नाचं साधन नव्हतं. मला नोकरी शोधणे अतिशय आवश्यक होते. मुंबईशिवाय नोकरी मिळणार कुठे? कॉलेजात शिकत असताना जैन वसतीगृहात रहात होतो. पण कॉलेज शिक्षण सुटलं अन् वस्तिगृहदेखील सोडावं लागलं. काही दिवस काकांच्या घरी राहीलो. पण स्वाभिमानी मनाला फुकट राहणं, जेवणं तेही नातेवाईकांकडे हे पटेना. एके दिवशी न सांगता संध्याकाळी माझी छोटीशी कपड्यांची पेटी घेऊन बाहेर पडलो. आता जायचं कुठे ? मालाड स्टेशनात पेटीची उशी करून झोपलो. खूप विचार केला. वसतिगृहातच माझ्या बरोबर राहिलेला ओमप्रकाश नावाचा मुलगा मालाडलाच राहायचा हे आठवलं. पूर्ण पत्ता माहीत नव्हता.सकाळी उठून अर्धवट शोधीत त्याची खोली गाठली. सुदैवानं तो भेटला. त्याच्या बरोबर त्याचा आणखी एक मित्र रामचंद्र रहात होता. मी त्यांना सारी हकिकत सांगितली. ओम म्हणाला अरे खुशीने रहायच इथे. खिशात पैसा नाही. आईवडिलाना ही परिस्थिती कळवून त्यांची चिंता वाढवायची नव्हती. मी मजेत असून मित्रांकडे मलाडला राहतोय. एवढे मात्र घरी कळवले होते. आम्ही कधी चहा-पाव तर कधी खोलीवरच भाकऱ्या भाजून खात होतो. ओम देखील माझ्या सारखा बेकार, नोकरी शोधत होता. रामचंद्र मात्र कामावर जायचा आणि तोच खर्च करयाचा शिवाय खर्चालाही मला थोडेफार पैसे द्यायचा. बरेच दिवस घरी पत्र लिहिले नव्हते म्हणून एके दिवशी वडील पत्ता शोधीत आले. माझी, त्या खोलीची, मित्रांची सारी अवस्था बघूण त्यांना फार वाईट वाटले. मला म्हणाले की, उचल तुझी पेटी आणि चल माझ्या बरोबर. वडिलांचे एक मित्र होते बाबुभाई. जातीने सोनार. घरची परिस्थिती साधारण पण वडीलांची व त्यांची मैत्री सख्ख्या भावापेक्षा अधिक प्रेमाची. मला त्यांच्या घरी घेऊन गेले. ते रहात होते ठाण्याला. आग्रा रोडच्याही पलीकडे. स्टेशनपासून चालत जायला तीस. चाळीस मिनिटे लागायची. सोनार काकांचं कुटुंब म्हणजे संयुक्त कुटुंब. नवरा-बायको, मोठा मुलगा, सून, नातवंड वगैरे. त्यांचंच गाडं जेमतेम ढकलीत होते. पण तरीही मला आपल्या मुलासारखे मायेने वागवले. निदान आसरा मिळाला. काका आग्रहाने आणि प्रेमाने वागवीत व त्यांच्याबरोबर जेवायला बसवीत.

पण तरी देखील मला ते पटेना. मुंबईला जाण्यासाठी स्टेशनला जाताना रस्त्यांत मी एक

पाटी वाचली. जोशी लॉज. मी तिथे गेलो. मालक जोशी स्वत:च हजर होते. मी चौकशी केली तर ते म्हणाले की, दोन वेळ जेवण साठ रूपये महिना अन् एक वेळ जेवलो तर मी विचारले. मालक म्हणाले तीस रूपये. सकाळी १० ते १ वाजेपर्यंत. लवकर हवं त्री मिळेल. मी विचार करीत होतो. तसं जोशींनी विचारलं. कधी पासून, उद्या पासून येता का ? मी म्हटलं विचार करून सांगतो. त्यावर जोशी हसले. माझ्या खांद्यावर हात टाकीत म्हणाले, पैशाची अडचण आहे ना? मी पहातच राहीलो. यांना कसं कळलं? जोशी माझ्या मनांतलं ओळखून म्हणाले अरे मी खूप पावसाळे काढलेत या धंद्यात. तू चांगल्या घरचा दिसतोस. काही काळजी करू नकोस. उद्या पासून खुशाल जेवायला ये आणि मग दुसऱ्या दिवसापासून सकाळी जोशी लॉजवर जेवून पुढे मुंबईला नोकरी शोधण्यासाठी धावपळ सुरु झाली. एकदा जेवण आटोपून तिथलाच पेपर वाचीत असताना "एक जाहिरात वाचली. संपादकीय खात्यात उमेदवार पाहीजेत. लगेचच अर्ज खरडला आणि मुंबईला गेलो. चित्रा नावाच्या मराठी दैनिकाची ती कचेरी होती. संपादकाना भेटलो. ते मला प्रेसचे मालक चिमणलालशेटकडे घेऊन गेले. मला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देताना मी गुजराती असून मराठी कसे आणि किती जाणतो याचा खुलासा करावा लागला. मला वृत्तपत्र क्षेत्रातील काहीही अनुभव नाही हे स्पष्ट सांगितले. खरं म्हणजे अनुभवाशिवाय नोकरी नाही आणि नोकरीशिवाय अनुभव नाही असं हे न सुटणार कोडं आहे. मी म्हणालो, सर अनुभव नाही म्हणून नोकरी नाही हे बरोबर. पण कुठं तरी अनुभवाशिवाय सुरूवात करावी लागतेच. तशी संधी मला देऊन बघा. पगार जो द्याल तो मला कबूल आहे. त्यांनी संपादकांना सांगितल की याची टेस्ट घ्या. संपादक होते वसंत प्रधान. अत्यंत सुस्वभावी, विनग्न आणि हसतमुख माणूस. मला म्हणाले घाबरू नका. आधी चहा घ्या. मग त्यांनी माझी परीक्षा घेतली. पी:टी.आय.च्या एका बातमीचे मराठी भाषंतर करून त्याला शिर्षक देणं, एक कोर्टाच्या निकालपत्रावरून थोडक्यात बातमी तयार करणे. या सारख्या टेस्टस् घेतल्या. लगेचच त्यांनी ते सर्व कांही तपासले आणि म्हणाले नला; शेटकडे; मी नोकरीसाठी निवडला गेलो. दुसऱ्याच दिवसापासून कामावर हजर व्हायचे होते. पंगार महिना ७५ रूपये.

*********************************

प्रकरण - १३

# 'चित्रा'तील कुटुंब

'चित्रा' वर्तमान पत्रांत सर्वश्री वसंत प्रधान, मधु फडके, अण्णा फणसे, प्रफुल्ल मोकाशी, देशपांडे या सर्वांनी भावासारखे वागवले. आमचं एक कुटुंबच तयार झाल होतं म्हणाना. पगार असूनही अगदी हसत खेळत, हास्य विनोदात आमचं काम चाले. विशेषत: अण्णा उणे म्हणजे एक मस्त माणूस होता. तब्येतीनं जसा उंचापुरा, तगडा आणि मस्त, तसाच त्याचा सवभाव होता. हास्यविनोदाचा धबधबा. टेन्शन हा शब्दच त्याच्या शब्दकोषात नव्हता. पण कामाला वाघ होता. पत्रकारितेतील अनेक धडे अण्णांकडूनच मी शिकलो.

अण्णा फणसेबरोबर रात्रपाळीत दम निघेपर्यंत काम करीत असतानाही कामाचा ताण कधीच जाणवला नाही. चित्रा वर्तमानपत्रांत काम करीत असतानाच महाराष्ट्र सरकारच्या (त्यावेळचे मुंबई राज्य) प्रसिद्धी खात्याची एक जाहिरात वर्तमानपत्रात आली. प्रादेशिक आपा सहाय्यक पदासाठी अर्ज मागवले होते. मला हे माहीत नव्हतं. माझे सहकारी वसंत देशपांडे यांनी ही बातमी मला दिली. त्यानेच आग्रह करून अर्ज लिहून घेतला. मी खरेतर वर्तमानपत्राच्या नोकरीत रूळलो होतो. दुसरीकडे जाण्याची इच्छा नव्हती. पण तरीही म्हटलं करु या अर्ज. देशपांडेनेच अर्ज सचिवालयात नेऊन दिला. कांही दिवसांनी उत्तर आलं. लेखी परीक्षा आणि मुलाखतीसाठी बोलावले होते. मी आणि देशपांडे दोघेही गेलो. वर्तमानपत्राचा अनुभव खूपच उपयोगी पडला. या अनुभवामुळेच शासनाची लेखी परीक्षा अत्यंत सोपी वाटली. कांही दिवसानंतर मला शासनाचे उत्तर आले. मी निवडला गेलो होतो व मला सचिवालयात कामावर हजर व्हायचे होते. चित्रामधील माझ्या सहकाऱ्यांनी माझं अभिनंदन केलं अन् म्हणाले ताबडतोब तिकडे रूजू हो. वेळ घालवू नकोस. चित्रातील नोकरीपेक्षा तो मित्रांचा गोतावळा मला सोडवत नव्हता. पण शेवटी एकदाचा सचिवालयात सरकारी नोकरीत रूजू झालो. चित्राचं ऑफिस म्हणजे एका हॉलमध्ये संपादकांसह आम्ही सगळे बसलेलो असायचो. फक्त चिमणलालशेटची केबीन होती. वातावरण मोकळं अन खेळीमेळीच होतं. सचिवालयात मात्र प्रशस्त जागा, अधिकाऱ्यांच्या केबिनच्या रांगा, अपहागूहे सगळं कसं रूबाबदार आणि ऐसपैस होतं. पण तरीही मला वातावरण खटकले. आपआपल्या रेबलाजवळ मान खाली घालून काम करणारे ते सरकारी नोकर मला टेबल खुर्ची सारखेच निर्जीव वाटले. कामाशिवाय बोलणं नाही, हसणं नाही, निर्विकार चेहरे सगळे. मी दोन दिवस गेलो. तिसऱ्या दिवशी सचिवालयांतील नोकरी नको असं ठरवून पुन: चित्राच्या ऑफिसात गेलो. मी तिथल्या नोकरीचा राजीनामा दिला नव्हता किं मी सोडून जातोय असं शेटना कळवलंसुद्धा नव्हते. माझ्या सगळ्या सहकाऱ्याना मात्र मी सचिवालयात कामावर रूजू झालोय हे माहीत होते. मला ऑफिसच्या वेळेत तिथे आलेला पाहू सगळ्यांना आश्चर्य वाटले. मी त्यांना सांगितले की, मला नको ती सरकारी नोकरी. मी परत आलोय. यावर सगळे माझ्यावर चिडले. माझे घर माझ्या पगारावरच अवलंबून असल्याचे त्यांना माहीत होते. ते म्हणाले अरे वेडा की काय तू? हा पेपर आता बंद होण्याच्याच मार्गावर आहे. कांही दिवसांचा प्रश्न आहे. शेट यायच्या आंत इथून नीघ. आणि जा सरळ सचिवालयात. अरे सगळी माणसे

सारखी नसतात. तिथंही चांगले मित्र भेटतील. शिवाय तू नवीन आहेस. 'एकदम तुझ्याशी कोण, काय बोलणार ? 'फडके म्हणाला की ओळखी वाढवणं हे आपल्या हाती आहे. आपणच हळूहळू वाढवायच्या ओळखी.

********************************

प्रकरण- १४

# गोव्याचा सत्याग्रह

१९५४-५५ मध्ये मी 'चित्रा' वर्तमानपत्रात नोकरीला असतानाची गोष्ट. भारताला १९४८ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. पण दीव, दमण, गोवा अजून परकीयांच्याच ताब्यांत होते. डॉ. राममनोहर लोहिया आणि इतर समाजवादी नेत्यांच्या प्रेरणेने गोवामुक्ती आंदोलन सुरू झाले होते. विशेष म्हणजे आर.एस.एस. सहीत सर्व पक्षांचा या आंदोलनांत सहभाग होता. वर्तमानपत्रांत असल्यामुळे या आंदोलनच्या ताज्या बातम्या समजत.

विद्यार्थी दशेत सेवादलात केलेल्या चळवळीची आठवण ताजी झाली. आणि आपणही गोवामुक्ती आंदोलनांत सहभागी झाले पाहिजे अशी इच्छा प्रबळ झाली. आमचे पत्रकारमित्र नारायण आठवलेही या चळवळीत होते. मी आणि माझे नगरकर मित्र चांगदेव लचके या बाबत काय करावे याचा विचार करीत होतो. त्याचवेळी कॉंग्रेसचे नेते भानुशंकर याज्ञिक यांची भेट झाली. मी माझी इच्छा त्याना सांगितली. त्यानी माझे कौतुक केले आणि मला घरी बोलावून एक मोठा बंद लिफाफा मला दिला आणि म्हणाले की, अमुक दिवशी तुम्ही हा लिफाफा घेऊन सावंतवाडीला जा. तिथे श्री शिर्के नांवाचे गृहस्थ भेटतील.

लिफाफा फक्त त्यांच्या स्वाधीन करा. तिथून सत्याग्रहात सामील होण्याची व्यवस्था ते करतील. तो लिफाफा आणि त्यांचे पत्र घेऊन मी व चांगदेव घरी आईवडिलांना आणि ऑफिसांत चिमणलाल शेठना न सांगता सावंतवाडी गाठली. शिर्केशी सल्लामसलत करून दुसरे दिवशी पहाटे गोव्याकडे निघालेल्या सत्याग्रहींच्या मोर्चात सामील झालो. शिर्केनी दिलेला तिरंगा झेंडा फडकवत पुढे निघालो. गोव्याच्या सरहदीजवळ पोर्तुगीजांच्या पोलिसांचा गोळीबार होत होता. पण सर्वसत्याग्रही पुढे सरकत होते. काही वेळाने अचानक गोळीबार बंद झाला आणि सत्याग्रही जोरजोरात घोषणा देत पुढे सरकत गोव्याची सरहद ओलांडून आत घुसले. गोव्याच्या हदीत जयहिन्दच्या घोषणा देत तिरंगा फडकवला. आठवण म्हणून गोवा हदीतील मूठभर माती रूमालात बांधून घेतली.

मुंबईत परत आल्यावर काळजीत असलेल्या आईचा जीव भांड्यात पडला. चित्राचे मालक चिमणलाल शेठ मी न सांगता चार दिवस न आल्यामुळे खूप चिडले. मी सत्य हाकिकत त्याना सांगितली. त्यावर ते अधिकच चिडून म्हणाले, 'अरे हे आधिच का नाही सांगितले ?"

आणि खिशातून-शंभर रू.ची नोट काढून माझ्या हातात दिली.

********************************

प्रकरण - १५

# सचिवालयांत दाखल

आणि झालेही तसेच. तीन दिवस दांडी मारून चौथ्या दिवशी पुनः गेलो सचिवालयात. साहेबांनी विचारलेच की एक दिवस येऊन लगेच तीन दिवस गेलात कुठे तुम्ही ? मला ताप आला होता अशी थाप मारून मी उलट साहेबाना विचारल की, आपल्याकडे कॅज्युल लिव असतेच ना. ते भडकले. म्हणाले अहो तुम्ही नोकरीवर रजू झाल्या झाल्या रजेचे विचारता ? आता तरी नियमीत येणार का ? मी मुकाट्यान होकार दिला आणि त्यानंतर खरोखरच १९५६ ते १९८९ अशी तेहतीस वर्षे सरकारची अगदी नियमीत आणि इमाने-इतबारे नोकरी केली. या तेहतीस वर्षात अनेक ओळखी झाल्या. मित्र मिळाले. कडू-गोड अनुभव मिळाले. अर्थात कडू कमी गोड अधिक. शिवाय त्या कडू अनुभवामुळेच गोड अनुभवाची गोडी अधिक वाढली.

सुप्रसिद्ध कवी व लेखक श्री. वसंत सबनीस हे माहिती खात्यात माझे साहेब होते. साहेब, म्हणण्यापेक्षा माझे गुरू होते असे म्हणणे जास्त उचित ठरेल. लिखाण, भाषांतर वगैरे बाबतीत तर त्यांचे अमूल्य असे मार्गदर्शन मिळालेच परंतु जीवनात न खचता, न डगमगता, धीराने, आत्मविश्वासाने कसे वागावे ह्यांचे जिवंत उदाहरण सबनीसांच्या रूपाने माझ्यासमोर होते. त्यांच्या इतका उमदा व कर्तबगार अधिकारी बत्तीस वर्षांच्या माझ्या नोकरीत मी पाहीला नाही. परंतु असे असताना, त्यांच्या पेक्षा शेकडोपटीने कनिष्ट दर्जा असलेल्यांना बढत्या मिळत गेल्या अन् सबनीस मात्र सहाय्यक संचालक म्हणून निवृत्त झाले. पण सबनीसाना त्याची ना खंत ना खेद. आपण बरे, आपले काम बरे, आपले लिखाण बरे. दिवाळीच्या दोन तीन महिने आधी पासून दिवाळी अंकांसाठी लिखाणाची त्यांची भट्टी: पेटायची. पण ऑफिसच्या कामावर त्याचा कांही परिणाम नाही कि, ऑफिसच्या वेळेत कथा लेखन नाही. रात्री नऊ ते पहाटे तीन-चार वाजेपर्यंत लिहायचे. नंतर दोन तास झोप घेतली कि पुढचे दैनंदिन कार्य सुरू. सतत दोन-अडीच महिने त्यांचा हा लेखन यज्ञ चालायचा. पण सबनीस ऑफिसांत कधी थकलेले किंवा पेंगताना दिसले नाहीत.

त्यांच्या लेखणी बहादूरगिरीचा एक प्रसंग आजही आठवतो. पं. नेहरुंचे निधन झाले व तत्काळ लोकराज्य ह्या सरकारी नियतकालिकाचा विशेषांक काढण्याचे शासनाने ठरविले. सबनीस त्यावेळी लोकराज्याची जबाबदारी सांभाळायचे. मी त्यांच्या हाताखाली काम करीत होतो. मजकूर, लेख, फोटो आदिंची जमवाजमव झाली आणि पुढचे तीन दिवस व तीन यात्री आमचा मुक्काम चर्नीरोडवरील शासकीय मुद्रणालयातच होता. कारण अंक ताबडतोब बाजारांत यायला हवा होता. प्रुफे वाचणे, पानांचा ले-आऊट करणे, इन्ट्रो, फोटोच्या कॅण्न्स लिहिणे अशी भरगच्च कामे उरकत होतो. या अंकात पं. नेहरूंच्या बालपणापासून तो अस्थि विसर्जनापर्यंतच्या जीवन कारकिर्दीतील फोटोची सलग आठ पाने होती. सबनीस दुसऱ्या कामांत मग्न होते. माझे सहकारी धुम्मा व कु. प्रमिला चौधरी प्रुफे तपासत होते. सबनीसांनी त्या आठ फोटो पानांची प्रुफे मला दिली व कॅप्शन्स (फोटोच्या खालचा मजकूर)

लिहायला सांगितले. एक दोन लिहिली देखील मी. पण समाधान होईना. मी सबनीसांना सांगितल 'सबनीस साहेब, या फोटोंना न्याय देणे तेही इतक्या झटपट घाईत मला जमेल असं वाटत नाही'. सबनीसांनी ती पानं पुढे ओढून सावकाश एक नजर फिरवली. नंतर ती फोटो पाने बाजूला ठेवून आपला पानाचा डबा उघडला. चुना, काथ, सुपारी आणि अर्थातच तंबाखू लावून मस्त पैकी पान लावून विडा तोंडात टाकला आणि आपले पेन उघडून ती 'फोटोपानांची प्रुफे पुढ्यांत घेतली. पंधरा-वीस मिनिटे एक टाकी लिहित गेले. त्यांच्या लिखाणांत खाडा-खोड हा प्रकारच नसायचा. आणि अक्षर कसं मोत्यांच्या दाण्यांसारखं. सबनीसांची अशी लेखनसमाधी लागली की त्यांना कुणी अजिबात डिस्टर्ब करायचं नाही. कॅप्शन लिहून झालेली पाने मला वाचायला देऊन सबनीससाहेब थुंकण्यासाठी उठून बाहेर गेले.

ती कॅप्शन्स नव्हती तर अप्रतिम शब्दांचा काव्यमय फुलोरा होता. “वा! सबनीस साहेब' नकळत आपोआपच माझ्या तोंडातून उद्‌गार निघाले. आम्ही मी, धुम्मा प्रमिला चौधरींनी पुन: पुन: तो मजकूर वाचूनही आमचं समाधान होईना. आजही तो अंक हाती आला तर त्या फोटेखालचा सबनीसांनी लिहिलेला मजकूर वाचला की मन भरून येतं.

सबनीसांकडे नेहमी येणाऱ्या दादा कोंडकेंचीही तिथे ओळख झाली. रंगभवनांत दादांच्या 'विच्छा माझी पुरी करा'च्या पहिल्या प्रयोगाला अर्थातच मी सबनीसांबरोबर हजर होतो. प्रयोग संपल्यावर मी कांही मित्रांशी बोलत उभा होतो. दादांनी मला खुणेने बोलावले. हळूच म्हणाले शहा, पांच रूपये असतील तर द्या. टॅक्सीला कमी पडताहेत. मी कांही न बोलता दादाना पांच रुपये दिले. हेच दादा कोंडके नंतर किती अफाट लोकप्रिय झाले हे जगजाहीर आहे. पैसा व प्रसिद्धीच्या शिखरावर दादा पोहोचले. पण दादानी तो दिवस कायम लक्षांत ठेवला. त्यांच्या कुठल्याही प्रयोगाला कुठेही मला तिकिट लागत नसे.

सबनीसांचे मित्र श्री. वसंत शिरवाडकर हे देखील कामामध्ये वाघासारखे. या दोघांचा स्हथाव तसा एकदम भिंत्र. सबनीस हे रसिक, मिस्किल, खेळकर स्वभावाचे. तर शिरवाडकर हे मितभाषी, धीरगंभीर, एखाद्या क्रषीसारखे. पण त्यांची मैत्री एकदम गाढ. सबनीस- शिरवाडकर म्हणजे सरकारच्या माहिती खात्याचे दोन आधार स्तंभच. शिरवाडकर आपल्या कामांत मग्न असले की, त्यांना कामाशिवाय दुसऱ्या कशाचे भान नसायचे.

एकदा ते असेंच कामात असताना डायरेक्टरांनी त्यांना बोलावलं. मंत्रालयाच्या विस्तारित इमारतीतील पहिल्या मजल्यावरील आपल्या केबिनमधून उठून शिरवाडकर चालत मंत्रालयाच्या मुख्य इमारतीतील तळमजल्यावर साहेबांच्या केबिनपर्यंत चालत गेले. मिटींग सुमारे दीड तासानंतर संपली. शिरवाडकर आपल्या केबिनकडे जायला उठले. पण त्यांच्या पायातील एक चप्पल कुठे सापडेना. मोठ्या साहेबांच्या ज्या केबिनमध्ये मिटींग होती तिथे, आजूबाजूला शोध घेतला पण चप्पल काही सापडली नाही. शेवटी कंटाळून ते एकाच चपलेवर चालत आपल्या केबिनमध्ये आले. बघतात तर काय? दुसरी

चप्पल तिथेच पडलेली. म्हणजे कामाच्या विचारांच्या तंद्रीत शिरवाडकर पायांत एकच चप्पल घालून इतके लांब अंतर चालत गेले तरी त्याचे त्यांना भान नव्हते.

प्रसिद्ध लेखक मधु मंगेश कर्णिक यांची ओळख सरकारी नोकरीत असतानाच झाली. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे जनसंपर्क अधिकारी म्हणून ते काम पहायचे. ते बसायचे सहाव्या मजल्यावर आणि मी तळ मजल्यावर. एके दिवशी अचानक दुपारी मधु मंगेश माझ्याकडे आले. म्हणाले, "शहा, मी आठ दिवस रजा घेऊन गावी जातोय. या आठ दिवसात खास कांही कामे नाहीत. पण कदाचित काही आलंच तर जरा बघून घ्या. मी माझ्या कारकुनाला तशा सूचना दिल्याच आहेत'. सदैव हसतमुख व गोड स्वभावाच्या कर्णिकांना नकार देणं मला शक्यच नव्हतं आणि तीन चार दिवसानीच त्यांचा कारकून एक कागद घेऊन माझ्याकडे आला. इंदोर इथे भरणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाचे आमंत्रण नाईकसाहेबांनी स्वीकारले होते. त्यासाठी भाषणाचा मसूदा तयार करून द्यायचा होता. मी आपला माझ्या ऐपतीप्रमाणे मसूदा बनवला. टाईप करून घेतला आणि दिला पाठवून मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात.

आठ दिवसांनी कर्णिक आले. दुपारच्या चहाला आम्ही भेटलो. गावाकडच्या त्यांच्या गप्पा मी ऐकल्या. बाकी ऑफिसच्या कामाबद्दल बोलण्यासारखं कांही नव्हतं. त्या इंदोरच्या महाराष्ट्रमंडळाच्या कार्यक्रमाबद्दल मी विसरूनही गेलो होतो. बरं त्यांत विशेष सांगण्यासारखं कांही नव्हतं. मुख्यमंत्री दौऱ्यावर होते. कांही दिवसांनी ते दौऱ्यावरून आले. मी नेहमीप्रमाणे त्यो दिवशी ऑफिसात उशीरा गेलो होतो. कर्णिकानी मला बोलावल्याचा तीनदा निरोप आल्याच  पायाने मला सांगितलं. मी कर्णिकांकडे गेलो म्हटलं "काय हो, एवढं तातडीनं बोलावलं ?' कर्णिक म्हणाले, कांही नाही हो सहजच. चहाला कंपनी पाहिजे म्हणून तुम्हाला बोलावले बसा'. नाईक साहेब आहेत कां आणि त्यांच्याकडे व्हिजिटर आहेत का याची त्यांनी चौकशी केली आणि साहेब एकटेच आहेत असं समजलं अन् कर्णिक साहेब जायला उठले. मला म्हणाले,'चला माझ्याबरोबर' मी म्हटल अहो माझं काही काम नाही. मी कशाला येऊ मुख्यमंत्र्यांकडे? कर्णिक म्हणाले, अरे काम माझंपण नाहीये. जरा दोन मिनिटे या माझ्याबरोबर'. हा काय प्रकार आहे मला कळेना, मनांत म्हटलं चला जाऊ या.

कर्णिकांनी मला वसंतराव नाईकांपुढे उभे केले आणि म्हणाले, 'साहेब, आपण मघाशी माझं जे कौतुक केलं ते महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमाचं भाषण मी नाही. यांनी लिहिले होते' असं सांगून त्यांनी नाईकसाहेबांकडे माझा परिचय करून दिला. काय हा दिलदारपणा !

**दादा ते दादाच**

'लौकिकदृष्ट्या कमी शिक्षण असलेले परंतु व्यवहारज्ञान जबरदस्त असलेले श्री वसंतदादा पाटील यांची कारभाराची तऱ्हा तर अतुलनीय होती. एकदा मॉरिशसचे एक प्रतिनिधीमंडळ महाराष्ट्राच्या

दौऱ्यावर आले होते. मॉरिशसमध्ये भारतीयांची व विशेषतः मूळच्या महाराष्ट्रीय लोकांची वस्ती मोठी आहे. आणि मातृभूमिपासून दूर असूनही या . लोकांचे आपली भाषा, आपली संस्कृति, आपल्या परंपरा या बद्दलचे प्रेम कमी झालेले नाही, उलट त्यांचे जतन करण्यासाठी ते आपल्यापेक्षांही जास्त उत्सुक आहेत. मॉरिशसच्या या शिष्टमंडळाच्या मुंबईतील कार्यक्रम, गांठीभेरी आदीची जबाबदारी संपर्काधिकारी या नात्याने माझ्यावर होती. पहिल्याच दिवशी सकाळी मुख्यमंत्री वसंतदादांची भेट ठरली होती. दादा स्वत: शिष्टमंडळाच्या स्वागतासाठी बंगल्याच्या ओसरीवर उभे होते. दुपारी बंगल्यावरच त्यांची जेवणाची व्यवस्था झाली. तीन दिवसात बाकीचे कार्यक्रम व्यवस्थित पार पडले. पण एक अडचण आली. या शिष्टमंडळाला लेझीम, डफ, तुणतुणे आदि अस्सल मराठी सांस्कृतिक वारसाच्या वस्तु घेऊन जायच्या होत्या. या वस्तु मॉरिशसमध्ये मिळत नाहीत. आम्ही सांस्कृतिक खाते, समाज कल्याण, वित्त विभाग, सगळीकडे चौकशी केली. पण अशा खर्चासाठी नियमांत कुठेच तरतूद नाही असे ठराविक उत्तर मिळाले. शिष्टमंडळातील लोक नाराज झाले पण इलाज नव्हता. मॉरिशसला जाण्याच्या आदल्या दिवशी निरोप घेण्यासाठी संध्याकाळी पुन: दादांना भेटायला गेलो. दौरा कसा झाला. कांही अडचण नाही ना आली “अशी विचारपूस दादांनी केली. मी म्हटलं, ‘साहेब दौरा व्यवस्थित पार पडला पण एक अटतण आहे' असे सांगून दादांना झाल प्रकार सांगितला.

दादा चिडले, 'कधी मॉरिशसला जाणार' ? दादांनी विचारलं, दुसऱ्याच दिवशी जाणार असं समजल्यावर दादांनी त्यांचं प्रयाण रद्द करून त्या नंतरच्या दिवसाची त्यांची विमानाची तिकिटे काढून देण्याची व्यवस्था केली. त्यांना हवं असलेलं सर्व सामान खरेदी करण्याकरिता पैशाची तरतूद केली. आणि म्हणाले, 'उद्या तुम्हाला हव्या त्या वस्तु खरेदी करा. मला म्हणाले, 'लेझीम, डफ, ढोलकं वगैरे मुंबईत मिळतात का याची चौकशी करा आणि मिळत नसतील तर मला येऊन सांगा, सांगलीवरून मागविण्याची व्यवस्था करू'.

मुंबईत शोध घेण्यांत वेळ घालविण्यांत अर्थ नव्हता. तरी एक दोन ठिकाणी चौकशी केली पण हवे तेवढे सामान मिळेना. पुन: दादांना भेटून झाला प्रकार सांगितला. दादांनी सर्व सामान सांगलीहून मागविण्याची व्यवस्था केली. दुसरे दिवशी सकाळी टाळ, मूदुंग, लेझीम सर्व काही व्यवस्थित पॅक केलेल्या स्थितीत मुंबईला आले. सामान ते त्या शिष्टमंडळाच्या हवाली केले. सर्वजण अत्यंत आनंदाने व समाधानाने मायदेशी रवाना झाले.

महाराष्ट्र-गुजरात ही राज्ये वेगळी झाली त्या वेळी सरकारी कर्मचाऱ्यांचीही विभागणी झाली. कर्नाटकी कर्मचारी कर्नाटकांत, गुजराती गुजरातमध्ये आणि मराठी माणसं महाराष्ट्रांत असे हे विभाजन होते. मी शाह असल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाने बनविलेल्या याद्यांमध्ये गुजरातला पाठविण्यांत यायच्या कर्मचाऱ्यांच्या यादींत माझे नांव होते. आमचे त्यावेळी डायरेक्टर श्री. मणिलाल शाह यांना माझी, माझ्या कामाबाबत सगळी माहिती होती. श्री मणिलाल शाह अत्यंत कर्तबगार अधिकारी. ऑफिसांतील सर्व कर्मचाऱ्यांची एकूण कामकाजाची बारीक सारिक माहिती त्यांना असायची. त्यांनी

मला बोलावून घेतलं. मला म्हणाले, 'तुमच्या बाबतींत दोन्ही पर्याय खुले आहेत, गुजरातमध्ये या किंवा महाराष्ट्रात रहा. गुजरातमध्ये आलांत तर रहाण्याची जागा किंवा अन्य कोणतीही अडचण येऊ देणार नाही. कदाचित तिथे बढतीची अधिक संधी तुम्हाला मिळेल.'

'पण मला मुंबई, महाराष्ट्र सोडून जाण्याची कल्पनाही सहन होईना. इथल्या मातीशी, संस्कृतीशी, भाषेशी, जीवनाशी इतका एकरूप झालेलो की, ही भूमि सोडून परभूमीत जाण्याचा विचार ही मला बेचैन करू लागला. मी लगेचच साहेबांना सांगितलं की, 'सर
मला इथंच रहायचंय माझ्या 'पितृभूमीत'.

**मंत्र्याची घमेंड**

निवडंणूकींचा निकाल लागला की नवीन सरकार, नवीन मंत्रीमंडळ, नव्याने खातेवाटाप हे 'सगळं ओघाने आलेच. त्याबरोबर माहिती खात्याचीही धावपळ सुरू व्हायची. नव्या मंत्र्यांना भेटून त्यांचा अल्प परिचय (Bio-Data) मिळवून लोकराज्य या शासनाच्या मासिकांत छापायची प्रथा होती. नव्यानेच मंत्री झालेल्या एका महाशयांचा अल्प परिचय मिळाला नसल्याने लोकराज्याच्या अंकाचे काम खोळंबले होते. संपर्क अधिकारी या नात्याने मी अनेक वेळा त्यांच्याकडे जाऊनही आणि ते महाशय तसे फारसे कामांत नसूनही मला माहिती मिळू शकली नव्हती. आज कांहीही करून त्यांना भेटून त्यांची माहिती मिळवायचीच असा निश्चय करून मी त्यांच्या कार्यालयात गेलो. त्यांच्या समोर पाच-दहा लोक बसले होते. बहुतेक त्यांच्या ओळखीचे किंवा गांवाकडचेच कार्यकर्ते असावेत. मी बराच वेळ बसून राहिलो. त्यांच्या बिन कामाच्या गप्पा चालल्या होत्या आणि मंत्रीमहोदय उठून जाण्याच्या तयारींत होते हे पाहून मी माझी ओळख करून दिली आणि अत्यंत नम्रपणे माझ्या येण्याचे प्रयोजन सांगितले. कांहीही कारण नसताना त्यांचा रागाचा पारा वर चढला. आपल्या कार्यकर्त्यांवर छाप मारण्याचा कदाचित हा प्रकार असावा. तरीही मी सौम्य भाषेंत त्यांना सांगितलं की सर, लोकराज्य अंकाचं काम अडून राहिलंय मी पांच-सात वेळा आपल्याला आठवणही करून दिली... यावर तुम्ही कुणाशी बोलताय, तुमची किती वर्षे नोकरी झाली, काय समजता स्वत:ला... माझ्या बंगल्यावर या उद्या परवा... वगैरे. भाषणच ठोकलं त्यांनी. 'मला नाईलाजाने त्यांना ताडकन सांगावं लागलं की, माफ करा, मी तुमचा खाजगी नोकर नाही. मी एक जबाबदार राजपत्रित अधिकारी आहे आणि सरकारी कामासाठी आलोय. मी तुमच्या घरी येऊ शकत नाही. मंत्रीमहोदय आणि समोर बसलेले त्यांचे चमचे अवाक झाले आणि मी तिथून ताडकन बाहेर पडलो.

ऑफिसात आल्यानंतर झाल्या प्रकाराची सविस्तर हकिकत लिहून आमच्या महासंचालकांना दिली. मुख्य सचिवांपासून मुख्यमंत्रयांपर्यंत हे प्रकरण गेलं. अर्थात एका मंत्रीमहोदयांशी संबंधित ते असल्यामुळे गुप्तता राखण्यांत आली होती. पण मुख्यमंत्र्यांन झाल्या प्रकाराची गंभीर नोंद घेतली. मला त्या मंत्र्याऐवजी दुसऱ्या मंत्र्यांच्या जनसंपर्काची जबाबदारी देण्यात आली आणि त्या संबंधित

मंत्र्यांना मुख्यमंत्री श्री शरद पवारांनी चांगलीच तंबी देऊन सरकारी अधिकाऱ्यांशी नीट वागा असा सल्ला दिल्याचे खात्रीलायकरीत्या आम्हाला समजले.

********************************

# असे - असीर

माजी मंत्री प्रो. असीर हे नगरचेच. नुसते गांववाले नव्हे तर अहमदनगर कॉलेजात आम्ही एकत्र होतो. असीर उत्कृष्ट क्रिकेटपटू आणि नगर कॉलेज क्रिकेट संघाचे कर्णधार. मीही त्या संघातला खेळाडू असल्याने आमची मैत्री होती. असीर पहिल्यांदाच विधानसभेवर निवडून आले आणि लगेच मंत्री झाले. राजभवनावर मंत्रिमंडळाचा शपथविधि झाल्यानंतर लाल दिव्याच्या गाडीतून स्वारी मंत्रालयांत आली. त्यांच्याबरोबर अर्थातच पी.ए., बॉडीगार्ड आणि इतर चाहत्यांचा (कि चमच्यांचा ?) लवाजमा होता. मंत्री महाशयांच ऑफिस दुसऱ्या मजल्यावर असल्याचं त्यांना सांगण्यात आलं. नवीन मंत्र्यांना पहाण्यासाठी कांही कर्मचारी देखील बाहेर आले होते. लिफ्टमनने देखील लिफ्ट थांबवून साहेबांना नमस्कार करून पाचारण केलं. पण असीर म्हणाले, 'नहि, नहि अपने ऑफिस बादमे जाऐंगे 'पहले अपने जेठाभाईको मिलेंगे' आणि असीर तथाकथित प्रोटोकॉल वगैरे बाजूला सारून 'तळमजल्यावरच्या माझ्या केबिनमध्ये आले. आमच्या ऑफिसांतील माझ्या सहकार्यांनी त्यांचे स्वागत केले अन् माझी केबिन दाखवली. मी जागेवर नव्हतो. कामासाठीच वर कुठतरी गेलो होतो. “कोई बात नाही आने दो जेठाभाईको' असे सांगून साहेब माझ्या केबिनमध्ये तेही माझ्या खुर्चीच्या समोर टेबलापलिकडे ठेवलेल्या खुर्चीत बसून वर्तमानपत्र चाळू लागले. 'पांच-दहा मिनिटांत मी आलो. असीरांनी माझ्या केबिननमध्ये चहा घेतला अन् मग पुढे गेले.

असीर मनाने अत्यंत निर्मळ, दिलदार, मैत्रीला पक्का असा माणूस. स्वभाव अत्यंत दिलदार. शिपायाला, लिफ्टवाल्याला, खिशांत हात घालून हाती येईल ती नोट बक्षीस म्हणून देणार. खरं म्हणजे त्याचा पिंड राजकाण्याच्या नव्हताच. इंग्रजी शिकवणं, क्रिकेट, छान-छान कपडे अत्तर, सेंट हा त्यांचा शौक. एखादं कापड आवडलं तर अख्खा ताका विकत घेणार आणि स्वतः बरोबर एक-दोन मित्रांचेही कपडे त्यांतून शिवायला टाकणार.

मामा चव्हाण नावाचे माझे एक मित्र होते. एकदा शिवसेनेच्या एका नेत्याना घेऊन माझ्याकडे आले. त्या गृहस्थांचे असीरांकडे असलेल्या खात्याशीसंबंधीत काहीतरी काम होते. पण असीरांना कसे भेटायच्ते ? कारण ते वेगळ्या पक्षाचे. शिवाय मुसलमान आणि त्यांची असीरांशी. ओळख ना पाळख. मी म्हटलं, 'तुम्ही काळजी करू नका. तुमचं काय कोण आहे हे मला माहित नाही अन् जाणून घेण्याची इच्छाही नाही. असीरसर तुमचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतील याची मला खात्री आहे. काम होणार की नाही हे मी सांगू शकत नाही. मी त्यांना असीरांकडे नेलं. 'या पुढारी" असं बोलून असीरांनी त्यांचं स्वागत केलं. दोघांची भेट घालून देणे अन् ओळख करून देण्याचं माझं काम संपलं अन् मी माझ्या कामाला लागलो. त्या नेत्यांच्या कुणा एका नातेवाईकाला जो तुरूगांत होता - त्याला पॅरॉल हवा होता. त्यानंतर मामा चव्हाण आणि ते सद्गृहस्थ माझ्याकडे आले. ते मला म्हणाले, 'असीरसर खरोखर मर्द

माणूस आहे. जात-पात, धर्म, पक्ष-भेद वगैरे त्याला माहीत नाही. एका झटक्यांत माझं काम केलं त्यांनी.' त्या नेत्याचं नाव वामनराव महाडिक.

मुळांतच पिंड राजकारणाचा नसल्यामुळे त्यांतील डावपेच, राजकीय खेळी, काळवेळ बघून चाल ठरवणे हे असीरच्या स्वभावांतच नव्हते. पण म्हणूनच ते एकदा गंभीर संकटांत सापडले. मुंबईतील एका कार्यक्रमांत भाषण करताना त्यांनी मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांच्यावरच टीका केली. दुसऱ्या दिवशी टाईम्स ऑफ इंडियांत अत्यंत ठळकपणे आणि विस्ताराने ही बातमी प्रसिद्ध झाली. मुख्यमंत्री अर्थातच खूपच चिडले. कांही सहकाऱ्यांचे तांतडीने या बातमीच्या संदर्भात फोनही आले. बाबासाहेबांनी राजभवनला फोन लावला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी साडे दहा वाजता राज्यपालांबरोबर भेटीची वेळ ठरवली. मंत्री महोदय असीर यांना मंत्रिमंडळातून डिच्चू देण्यासाठी ही भेट मागितली होती.

मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी वातावरण तापले होते. "अशी बेशिस्त खपवून घेणार नाही" असे मुख्यमंत्री सांगत होते. माहिती जनसंपर्क खात्याचे त्यावेळचे महासंचालक श्री. मोहन पाटील तिथे हजर होते. राजकारणाची जाण, सर्व मंत्री, आमदार, खासदार पत्रकार यांच्याशी जवळचे संबंध ठेवणारे अत्यंत कर्तबगार अधिकारी म्हणजे मोहन पाटील साहेब. मंत्री आणि मुख्यमंत्र्यांपुढे नुसती हुजरेगिरी, हांजी-हांजी करणाऱ्या आय.ए.एस. अधिकाऱ्यांपैकी ते नव्हते. मंत्री आणि मुख्यमंत्र्यांनाही वेळप्रसंगी सल्ला देण्यासही ते घाबरत नसत. त्याही दिवशी त्यांनी मुख्यमंत्री भोसलेसाहेबांशी खाजगीत चर्चा केली. पाटील साहेबांचं म्हणणं होतं की, "वर्तमानपत्रात छापून आलेलं वृत्त पूर्ण सत्य व विश्वासार्ह असेलच असं नाही. कदाचित श्री. असीरांचा मुद्दा वेगळा असेल आणि ते स्वत: ही बातमी वाचल्यानंतर काय प्रतिक्रिया देतात पाहू या. शिवाय ते अल्पसंख्यांकाचे प्रतिनिधी आहेत. असा तडकाफडकी निर्णय घेण्यापूर्वी असीरसाहेब खुलासा करताहेत का, ते पाहावं असं मला वाटतं.

बाबासाहेबांना पाटीलसाहेबांचा सल्ला पटला. "'ठीक आहे. ठीक आहे. बघू या. पणराज्यपालांबरोबरची भेट लगेच रद्द करायची नाही" पाटील साहेब मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानावरून सरळ मंत्रालयात आले आणि मला तांतडीने बोलावून घेतले. असीर माझे मित्र आणि त्यांच्या जनसंपर्काची जबाबदारीही माझ्याकडे होती हे पारील साहेबांना माहित होते. पाटीलसाहेब म्हणाले “आजच्या आज असीरसाहेबांना खुलासा करायला सांगा. पत्रकार परिषद बोलवा. शाह, वेळ कमी आहे. लगेच कामाला लागा. आणि हो, हा खुलासा टाईम्समध्ये उद्या छापून आला पाहिजे नाही तर असीरसाहेब गेले म्हणून समजा.” अकरा-साडे अकरा वाजले होते. मी आधी असीरांना बंगल्यावर फोन लावला. फोन सतत व्यस्त येत होता. मी असीरांना न विचारता दुपारी तीन वाजतां त्यांच्या कार्यालयांत पत्रकार - परिषद मंत्रीमहोदय संबोधित करणार असल्याचे सर्व वर्तमानपत्रांना कळवले. मंत्रालयांतील पत्रकार कक्षात नोटीस-बोर्डावर तशी नोटिसही लावली. पण खरा प्रश्न पुढेच होता. कारण असीरांनी मुख्यमंत्र्यावर केलेल्या टीकेची बातमी मी वाचली होती. खरं तर खुलासा करण्यास फारसा वावच नव्हता (शिवाय असीरसाहेबाचाही पत्ता नव्हता.) पण जनसंपर्क अधिकारी या नात्याने खुलाशाचा मसुदा

करण्याची जबाबदारी माझी होती. बराच विचार करून शेवटी मसुदा तयार केला. माझ्या बोलण्याचा तसा आशय अजिबात नव्हता. मुख्यमंत्री महोदयांबद्दल नितांत आदर होता आणि आहे... वगैरे वगैरे असा गोल-मोल खुलासा करण्यावाचून गत्यंत्तर नव्हते. ऑफिसची गाडी काढून थेट असीरांच्या बंगल्यावर रामटेकला गेलो. ते महाशय नगरहून आलेल्या कांही मित्रांबरोबर आपापसात गप्पा मारीत बसले होते. मंत्रीपदाची आपली खुर्ची धोक्यात आली असल्याची पुसट कल्पनाही त्यांना नव्हती. " आओ, आओ जेठाभाई-सब अपनेही लोग है बैठो" असीर, मी म्हटलं, "असीरसाब बैठनेका टाईम नही है. उठजाने का वक्त आया है" असे सांगून मी त्यांना बाजूला घेतले आणि सगळा झाला प्रकार त्यांना सांगितला. मी तयार केलेला खुलासा त्यांना दाखवला त्यांची सही घेतली. आणि मित्रत्त्वाच्या नात्याने ताकीद दिली. “या खुलाशापेक्षा अधिक कांहीही बोलू नका. प्रश्न विचारले गेले तरी यापेक्षा मला अधिक कांही सांगायचं नाही असं सांगा. आणि हो, बरोबर तीन वाजता ऑफिसला या म्हटलं."

तीन वाजता असीरसाहेबांचे कार्यालय पत्रकारांनी भरून गेले. साहेबांचाच पत्ता नाही. त्यावेळी मोबाईल नव्हते. मी बंगल्यावर फोन लावला. पांच-दहा मिनिटांत निघतो असा असीरांचा निरोप आला. मी पत्रकारांना विनंती केली कौ, "थोडं थांबा. साहेब येतील." तोपर्यंत मी त्यांच्यासाठी चहा-पाण्याची सोय केली. मला वेळ काढायचा होता. पण टाईम्सचा पत्रकार घाईत होता. त्याला आणखी दुसरीकडे जायचं होतं. मी असीरांच्या सहीविशी केलेल्या खुलांशाची प्रत त्याला दिली आणि सांगितलं को, “मेहेरबानी कर आणि उद्याच्या अंकांत येऊ दे हा खुलासा." पत्रकारांचे आणि आमचे संबंध चांगले होते. माझ्यावर विश्वास ठेवून तो ती प्रत घेऊन निघून गेला. असीरमहाशय पावणेचार वाजता आले. उशीर झाल्याबद्दल पत्रकारांची क्षमा मागितली आणि पंधरा मिनिटांत पत्रकार परिषद आटोपली. टाईम्सच्या पत्रकाराला मी फोन करून कळवलं की, पत्रकार परिषद संपली आणि मी दिलेल्या खुलाशाच्या प्रति व्यतिरिक्त काही नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता टाईम्स ऑफ इंडियाचा अंक विकत घेतला. पहिल्या पानावर असीर साहेबांचा खुलासा छापला होता. अंक घेऊन आमचे महासंचालक पाटीलसाहेबांच्या घरी टॅक्सीने पोहोचलो. पाटील साहेबांनीही टाईम्सचा अंक व तो खुलासा पाहिला होता. तेथून आम्ही लगेचच मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर दाखल झालो. मी बाहेरच म्हणजे मुलाखतीसाठी आलेल्यांसाठी असलेल्या दालनांत थांबलो आणि पाटीलसाहेब टाईम्सचा अंक घेऊन मुख्यमंत्र्यांना भेटायला गेले. अर्ध्या पाऊण तासानंतर पाटीलसाहेब हंसत बाहेर आले. मला म्हणाले, '“चला, तुमच्या मित्रांना सांगा कि खुर्ची वाचली.” असीरसाहेबांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्यासाठी राज्यपालांबरोबर ठरलेली भेट गुख्यमंत्र्यांनी रद्द केली होती.

प्रकरण - १७

# रसिक सुशील कुमार

'जनसंपर्क अधिकारी' या नात्याने अनेक मंत्र्यांच्या संपर्कात यावे लागले. त्यांच्यापैकी कायम आठवणींत राहिलेले मंत्री म्हणजे सुशीलकुमार शिंदेसाहेब. अत्यंत मनमिळाऊ, सदैव हंसतमुख, आपल्या अखत्यारांतील खात्याचा अभ्यास व जाण असलेले अत्यंत कर्तबगार मंत्री म्हणून शिंदेसाहेबांचा उललेख करावा लागेल. शिवाय वाचनाचा दांडगा छंद असल्यामुळे त्यांच्याबरोबर काम करताना उत्साह वाढत असे. एकदा दुपारी त्यांचा शिपाई माझ्याकडे आला आणि साहेबांनी बोलावलंय असा निरोप दिला. मला बढती मिळाल्याने शिंदेसाहेब आणि त्यांच्या खात्याचे जनसंपर्क अधिकारी ही जबाबदारी श्री. जोशी नांवाच्या अधिकाऱ्याकडे होती. मी त्या शिपायाला हा बदल सांगितला. पण त्याचं म्हणणं होतं की, साहेबांनी मलाच बोलावलय.

मी लगेच त्यांच्या कार्यालयांत हजर झालो. शिंदेसाहेबांनी एका प्रकारानाचे सात-आठ अंक माझ्या हवाली केले. मला आधि कांही कळेना हा काय प्रकार आहे. शिंदेसाहेबांनी बसायला सांगितलं आणि नंतर सर्व हकिकत सांगितली. मुंबईत सी.के.पी. समाजाचे अधिवेशन दोन दिवसांनंतर भरणार होतं आणि समाजाचे जावईबापू श्री. सुशीलकुमार शिंदे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. त्यासाठी भाषणाचा मसुदा त्यांना तयार करून पाहिजे होता, आणि म्हणून सी.के.पी. समाजाच्या वार्षिक अहवालाचे ते अंक त्यांनी मला दिले होते. दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत हे काम मला पूर्ण करायचे होते. मी गंमतीने म्हणालो की, “सर, फार नाजूक काम आहे हे". “म्हणूनच तर तुमच्याकडे सोपवलं" साहेब दिल-खुलास हसत म्हणाले.

ते सगळे अंक घरी घेऊन गेलो. त्यांतील माहिती, लेख नजरेखालून घातले. दुसऱ्या दिवशी ऑफिसांत आल्याबरोबर कामाला लागलो. अशावेळी आमच्या ऑफिसात असलेल्या मराठी स्टेनोग्राफर पाटीलबाई हुकमी एक्क्यांसारख्या मदतीला येत. अत्यंत हुशार, तेज आणि बिनचूक काम करण्यांत निष्णात होत्या. त्या दुपारी दोन वाजेपर्यंत काम संपवून भाषणाचे टाईप केलेले कागद घेऊन मी स्वत: शिंदेसाहेबांकडे गेलो. साहेब एका महत्वाच्या मिटींगमध्ये व्यस्त होते. ते भाषणाचे कागद फाईलीत टाकून ती फाईल शिंदेसाहेबांच्या सूचनेनुसार त्यांच्या अन्टीचेंबरमध्ये ठेवून मी निघून आलो. संदेश, भाषणे, खुलासा वगैरे - काये आम्हालासेजचीच होती. त्या दिवशी रात्री एक-दीडच्या सुमारास माझ्या घरी फोन खणखणला. माझ्या पत्मिनि फोन उचलला. आणि मला झोपेतून उठवत म्हणाली, "अहो, उठा, सुशीलकुमार शिंदेंच्या बंगल्यावरून फोन आहे." मी ताडकन उठालो. वाटलं कांहीतरी आणिबाणीचा प्रसंग दिसतोय, मी फोन उचलला. "सर, शहा बोलतोय काय विशेष".

“काही विशेष नाही, तुम्ही पाठविलेले ते भाषण आत्ताच वाचले. शहाजी, लाजवाब! एवढं

सांगण्यासाठीच असं अपरात्री तुम्हाला उठवलं, 'सकाळपासून एकदा भेटीगांठी आणि कामे सुरू झाली कि कदाचित मी तुम्हाला फोन करायला विसरून गेलो असतो म्हणून हा फोन.
थँक्स !"

असे हे शिंदेसाहेब! त्यांच्या बरोबर काम करायला कुंणालाही कां आवडणार नाही!

*********************************

प्रकरण - १८

# खंबीर प्रतिभाताई

माजी राष्ट्रपति श्रीमती प्रतिभा पाटील त्यावेळी समाजकल्याण व आदिवासी कल्याण खात्याच्या मंत्री होत्या. त्या खात्याचा संपर्क अधिकारी या नात्याने मला मंत्रीमहोदयांच्याही संपर्कात रहावे लागे. अत्यंत शालीन, सुसंस्कृत असे व्यक्तिमत्व असणाऱ्या प्रतिभाताईंचे आमच्या सारख्या अधिकाऱ्यांशी, कर्मचाऱ्यांशी, वागणेही अतिशय आपुलकीचे. त्यांच्याशी चर्चा करताना आपण मंत्र्यांशी बोलतो आहोत असे दडपण कधीही जाणवले नाही. शिवाय समाजकल्याण आणि आदिवासी कल्याण खात्याच्या विविध योजनांचा ताईचा अभ्यासही वाखाणण्याजोगा होता. |

त्याच सुमारास आदिवासींनी पिकवलेल्या शेतमालाची एकाधिकार पद्धतीने शासनानेच खरेदी करण्याची योजना प्रतिभाताईंच्या पुढाकारामुळे शासनाने तयार करण्याचे ठरविले. या योजनेमुळे दलालपद्धत पूर्णपणे नष्ट होऊन आदिवासींच्या शोतमालाला योग्य भाव आणि तोही त्यांच्या दारात मिळणार होता. या योजनेबाबत चर्चा करण्यासाठी राज्यातील सर्व संबंधित अधिकाऱयांची एक बैठक प्रतिभाताईंनी नाशिक येथे आयोजित केली होती. मलाही या बैठकीस येण्याचे ताईंनी सांगितले. इतकेच नव्हेतर ही योजना महत्वाची असल्यामुळे पत्रकारांनाही बोलवा असेही ताईंनी सांगितले.

मी त्याप्रमाणे मुंबईतील तीन-चार पत्रकारांसह बैठकीच्या आदल्या दिवशी संध्याकाळी नाशिकला पोहोचलो, स्थानिक पत्रकारांनाही आमच्या जिल्हा माहिती अधिकाऱ्यामार्फत आमंत्रण गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी समाजकल्याण खात्याचे सचिव श्री. पळणीटकर यांचे आगमन झाले. शिरस्त्यानुसार त्या खात्याचे तिथे असलेले अधिकारी त्यांच्या स्वागतासाठी गेले, मी ही त्यांच्याबरोबर होतो.

मला पहाताच ते एकदम चिडले. 'तुमचं काय काम आहे इथे? तुम्ही कशाला आलात? मला विचारलं होतं?' 'सर, मंत्री महोदयांच्या आदेशांमुळे मी आलोय आणि पत्रकारही आहेत' मी आदबीने म्हणालो. सचिव महाशय आणखीनच भडकले. 'ही डिपार्टमेन्टल मिटींग आहे. आगाऊपणा करू नका. कोणताही पत्रकार या बैठकीस उपस्थित असता कामा नये समजलं.' असा दम देऊन ते निघून गेले. मी विचारात पडलो. काय करावं ! त्या खात्याचे अवर सचिव श्री. दखणे जवळच उभे होते. ते म्हणाले, "शाह, काळजी करू नका. प्रतिभाताई दहा. वाजता येताहेत. त्यांच्या कानावर घाला सगळं. मिटिंग अकरा-साडे अकराला आहे."

प्रतिभाताईची वाट पहात मी अस्वस्थपणे खोलीतच फेऱ्या मारीत होतो. प्रतिभाताई आल्याचे कळताच धावत गेलो. अधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या गराड्यांतून ताई पुढे सरकत होत्या. मी वेळ न दवडता पुढे गेलो. ताईंना नमस्कार केला. आणि घडलेला प्रकार त्यांना सांगितला. '"मी म्हटलं मॅडम

पत्रकारांना आमंत्रण दिलं आहे. मुंबईहूनही खास तीन पत्रकार आले आहे. आता शेवटच्या घडीला आपण त्यांना मज्जाव केला तर शासनाची अब्रू जाईल आणि पत्रकार उद्या कांहीही छापतील."

प्रतिभाताईंनी लगेच विचारलं की, “पळणीटकर कुठे आहेत?" निरोप जाताच ते ताबडतोब हजर झाले. ताईंनी सौम्य परंतु गंभीर भाषेत सचिवांना एकप्रकारे समज दिली आणि पत्रकारांसाठी बैठकीच्या ठिकाणी योग्य व्यवस्था करण्याची ताकीदही दिली.

शासकोय बातम्यांना क्वचितच मिळते इतकी प्रसिद्धी आदिवासींच्या शेतमालाची एकाधिकार पद्धतीने खरेदी करण्याच्या योजनेला त्यावेळी वर्तमानपत्रांतून मिळाली.

********************************

प्रकरण- १९

# इंदिराजी आणि डॉ. लीला उदेशी

डॉ. लौलाबेन उदेशी म्हणजे मी काळाचौकी येथे रहात असताना आमचे फॅमिली डॉक्टर. वय सुमारे सत्तर वर्षे. निष्ठावंत गांधीवादी आणि खादीधारी. डॉ. उदेशी एम.बी.बी.एस पण त्यांचे रोगनिदान इतके अचूक की भलभल्या तज्ञानाही आश्र्चर्यचकित करणारे. त्या डॉक्टर कशा झाल्या हा इतिहासदेखील आपल्याला चकित करणारा आहे. डॉ. उदेशी ह्या गुजराती भाटिया समाजाच्या. हा समाज अत्यंत कर्मठ, रुढीप्रिय आणि परंपरावादी. त्यामुळे त्या काळातील चालीरीतीनुसार वयाच्या १३-१४व्या वर्षी त्यांचे लग्न झाले. लग्न, संसार म्हणजे काय हे समजायच्या आधीच काही महिन्यात पतिच्या अचानक निधनाने त्या विधवा झाल्या. त्या काळांत अशा बालविधवांना डोक्याचे मुंडण करुन लाल साडी नेसून घरातला एखादा कोपरा सांभाळावा लागे. दिंगमूढ झालेल्या लिलाबेनने आत्महत्येचा पक्क विचार केला.

पण नियतीचा खेळ कांही वेगळाच होता. गुजराती वर्तमानपत्रांत अहमदाबाद येथील महात्मा गांधीच्या कार्यक्रमाबद्दलची बातमी गांधीजींच्या फोटोसह प्रसिद्ध झाली होती. लीलाबेनने ती बातमी वाचली आणि तिला काय वाटले कोण जाणे, "महात्मा गांधी, अहमदाबाद", या पत्यावर एक पोस्टकार्ड पाठवले. स्वत:ची परिस्थिती व आत्महत्येचा विचार गांधींना कळवला. .उलट टपाली गांधीजींनी जिची ओळख ना पाळख अशा लीलाबेनला उत्तर पाठवून खूप धीर दिला आणि अहमदाबादच्या आश्रमांत येण्याची विनंती केली. लीलाबेन नेसल्या कपड्यानिशी अहमदाबादला गेल्या आणि गांधीजींच्या आश्रमांत दाखल झाल्या. विधवा लिलाबेनचा पुनर्जन्म झाला. आश्रमांतील कडक शिस्तीनुसार पहाटे लवकर उठणे, झाडलोट, बाथरुम-संडास सफाई, स्वत:चे कपडे धुणे, नंतर प्रार्थना, सकाळ-संध्याकाळ स्वयंपाक घरांत मदत करणे वगैरे सर्व दैनंदिन कामकाज तर सुरु झालेच पण आश्रमांत राहूनच लिलाबेनच्या शिक्षणाची काळजीही गांधीजीनी घेतली. स्वतः गांधीजी, महादेवभाई देसाई, प्यारेलाल, लीलाबेनचा विविध विषयांचा अभ्यास करवून घेत. लिलाबेनही मन लावून, रात्री जागून अभ्यास करायच्या आणि त्यांच्या ह्या कष्टाच्या व जिद्दीच्या जोरावर लीलाबेन मॅट्रिक पास झाल्या. आश्रमांत निसर्गोपचारासाठी येणाऱ्यांची सेत करण्यात लीलाबेनला विशेष आनंद व संतोष वाटे. म्हणून डॉक्टर होण्याची आपली इच्छा गांधीजींना सांगितली. आश्रमात राहूनच तिने कॉलेजचा सायन्स शाखेचा अभ्यास सुरु केला. गांधीजीनी तिला सांगितले होते कौ, सायन्स हा विषय अवघड तर आहेच पण डॉक्टर
व्हायचं असेल तर इंटर सायन्सच्या परीक्षेत खूप चांगले गुण मिळवावे लागतील. अन्यथा वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश मिळणार नाही. आणि जर तुला तुझ्या गुणवत्तेच्या आधारे प्रवेश मिळाला नाही तर मी कांही मदत करू शकणार नाही. आणि समजा तुला वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश नाही मिळाला तरी निराश होऊ नकोस इतर पर्याय आहेत. तुला नर्स बनूनही लोकांची सेवा करता येईल.

पण लीलाबेनची इच्छाशक्ति व मेहनत इतकी जबरदस्त की, इंटर सायन्सल् त्या फर्स्ट्लासने पास झाल्या आणि मुंबईत मेडिकल कॉलेजमध्ये दाखल झाल्या. गांधीजींनी जिवराज महेताना सांगून

त्यांची मुंबईत रहाण्या वगैरेची व्यवस्था करुन दिली. अशा रीतीने लीलाबेन डॉ. लीलाबेन उदेशी झाल्या. डॉक्टर झाल्यावर गांधीजींचे आशिर्वाद घ्यायला गेल्या तेव्हां गांधीजींनी विचारले "आता काय करायचं ठरवलय?" लीलाबेन म्हणाल्या, बापू तुम्ही सांगाल ते करीन. त्यावर गांधीजी म्हणाले की, मुंबईत गरीब, कामगार वस्तीमध्ये राहून त्यांची सेवा कर. त्यांना गरज आहे आणि त्यानुसार डॉ. लीलाबेन उदेशींनी काळाचौकी भागात दवाखाना सुरू केला. त्या राहायच्या देखील अभ्युदयनगर, बिल्डींग नं. ३ मध्ये. त्यामुळे रात्री, अपरात्रीही मदतीला सज्ज असत. रविवारी डॉ. उदेशींचा दवाखाना बंद असे. त्यामुळे कधीतरी मी रविवारी सकाळी दहा-साडे दहा वाजता त्यांना भेटायला जाई. सुटी असली तरी त्यांचा दिनक्रम ठरल्याप्रमाणे असे. पहाटे उठून घराची झाडलोट, संडास-बाथरुम भिंतीसह साबण फिनाईलने धुऊन चकाचक करणे. कपडे धुऊन वाळत घालणे आणि नंतर थंडगार पाण्याने आंघोळ करून देवाला आणि गांधीजींच्या तसबिरीला नमस्कार करणे ह्या त्यांच्या कार्यक्रमांत कधी खंड पडत नसे. पांढरी शुभ्र खादीची साडी नेसून पांढऱ्या शुभ्र चादरीने आच्छादित शेट्टीवर लीलाबेन पेपर वाचीत बसलेल्या असायच्या. आश्रमाशी निगडीत आणि गांधीजींच्या अनेक आठवणी त्या सांगायच्या. पं. नेहर, सरदार पटेल, मौलाना आझाद आदि नेत्यांशी लीलाबेनचा निकटचा संपर्क झाला होता. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या त्या सुमारास मी लीलाबेनना सहज विचारले की, तुम्ही इंदिराजीच्याही संपर्कात आल्या असाल ना? त्यावर त्या म्हणाल्या की, इंदिराबेटीला तर मी मांडीवर घेऊन खेळवल्यं. खूप मस्ती करायची ती. त्यानंतरही अनेक वेळा त्यांच्या गाठीभेटी झालेल्या. पण झे. लोलंबेनमा राजकारणाशी कांही देणेघेणे नव्हते. आपण बरे अन् आपली डॉक्टरकी बरी.

परंतु आणिबाणीनंतर कॉंग्रेसचा दारुण पराभव झाला आणि केंद्रांत कॉंग्रेसची सत्ता गेली. त्यानंतर इंदिरा गांधी राखेतून पुन: उभ्या रहाणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे कशा उफाळून आल्या व पुनः पंतप्रधान झाल्या हा इतिहास सर्वश्रुत आहे. दुसऱ्यांदा पंतप्रधानपदी आरुढ झाल्यानंतर त्या एकदा मुंबईला आल्या होत्या. मुंबईतील कार्यक्रम आटोपून त्या विमानाने दिल्लोला जाणार होत्या. सरकारी शिरस्त्यानुसार त्यांना निरोप देण्यासाठी सामान्य प्रशासनाचे कांही अधिकारी आणि माहिती, जनसंपर्कखात्याचे संचालक श्री माथूर यांच्याबरोबर मलाही ड्युटी दिली होती. सरकारचीच ड्युटी ती! त्यामुळे ज्या विमानाने इंदिराजी जाणार होत्या त्या विमानापासून थोड्यात अंतरावर आम्ही रांगेत उभे होतो.

इंदिराजींची गाडी कांही अंतरावर थांबली आणि त्या गाडीतून उतरून अंगरक्षकासह विमानाच्या दशेने निघाल्या. मला नियम, शिस्त सर्व माहीत होते. तरीदेखील धाडस करुन पुढे जाऊन इंदिराजींसमोर उभा राहिलो. पटकन खिशांतून डॉ. उदेशींचे कार्ड (जे मी आठवणीने बरोबर नेले होते) काढून इंदिराजींना दिले. मी म्हटलं “मॅडम, लीलाबेन आजकल बिमार रहती है. आपको आशिर्वाद भेजा है!".

“आप कौन ?" इंदिराजी.

“मॅडम मै उनका पेशंट हूँ. भाई जैसा और पडोसमे ही रहता हूँ." खरंतर एवढं बोल-तानाही मला घाम फुटला होता. कारण मी एकतर शासकीय प्रोटोकोल मोडला होता आणि पंतप्रधानांसमोर उभा होतो.

“थँक्स" आभारं मानून इंदिराजी रवाना झाल्या.

आमचे संचालक श्री माथूर बघतच राहिले. “मि. शाह यह क्या बात है ?" माथूरसाहेब. माथूरसाहेब तसे एकम सजजन. सर्वांशी मिळून मिसळून वागणारे. मी त्यांना डॉ. लीलाबेन  उदेशींची थोडक्यांत माहिती दिली. त्यांचे समाधान झाले.

त्यानंतर दहा पंधरा दिवसांनी पंतप्रधानांच्या कार्यालयांतून इंदिरा गांधीचे पत्र डॉ. लीलाबेन उदेशींना आले आणि लीलाबेनना दिल्लीला येण्याचे आग्रहाचे आमंत्रण इंदिराजींनी दिले होते. सवडीनुसार बऱ्याच दिवसानंतर पंतप्रधान कार्यालयाला आगाऊ कळवून डॉ. उदेशी त्यांच्या एका नातेवाईकासह दिल्लीला गेल्या. इंदिरा गांधी स्वतः बंगल्याच्या दाराजवळ डॉ. उदेशींचे स्वागत करण्यासाठी उभ्या होत्या. दिल्लीतील दोन दिवसांच्या मर्वकामाव डॉ. लीलाबेन उदेशीना.व्ही.आय.पी. वागणूक मिळाली.

*********************************

प्रकरण - २०

# घर पहावे बांधून

सचिवालयांत नोकरीला असताना अभ्युदय नगरांतील सरकारी मालकीच्या घरांत रहायचो. म्हणजे नोकरीत असेपर्यंत रहाण्याची सोय होती. निवृत्तीनंतर कुठे तरी घर पीहजे ना? हा विचार नेहमी सतवायचा, तशात कुठूनतरी कुणकुण लागली कौ, वांद्रे येथे सरकारी नोकरांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थाना सरकार जमीन देणार आहे. आम्ही कांही मित्रांनी सचिवालयाच्या कॅन्टिनमध्येच एक मिटींग घेऊन सहकारी संस्था स्थापन करण्याचे ठरविले. दुसऱ्याच दिवशी हाताने लिहिलेला एक अर्ज घेऊन महसूलमंत्री श्री बाळासाहेब देसाईकडे गेलो. साहेबानी अर्ज वाचला म्हणाले "“बहुतेक जण तुमच्या प्रसिद्धी खात्यातील दिसतात" “होय सर" मी म्हटल "आम्हाला स्वतःची खोली सुद्धा नाही मुंबईत"

“ठीक आहे बघतो मी" मंत्री महोदय.

आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे महिना-दीड महिन्याच्या आंत वांद्रे रेक्लमेशन येथे प्लॉट मंजूर झाल्याचे पत्र आम्हाला मिळाले. पत्र मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत ठराविक रक्कम भरायची होती. किती रक्कम हे आज नक्की आठवत नाही, पण कांही लाख रूपये होते एवढ नक्की. पुनः दुसरा अर्ज घेऊन बाळासाहेब देसाईकडे गेलो. पैसे भरण्याची मुदत वाढवून घेण्यासाठी आणि बाळासाहेबांनी तीन महिने मुदत वाढवून दिली.

परत पैसे जमा करण्याचा प्रश्न होताच. आमच्या सर्व सभासदांसाठीच्या कर्जाचा अर्ज सोसायटीमार्फत अर्थ खात्याकडे पाठविला. आम्हाला सांगण्यांत आले की तुमचा क्रमांक ११२ आहे, म्हणजे अर्ज विचारांत घेऊन मंजूर व्हायला काही वर्ष लागणार.

अर्जासाठी ज्या सहकारी संस्थांनी अर्ज केले होते त्यांत अद्याप जमीन न मिळालेल्या, नियमानुसार रजिस्टर न झालेल्या अशा सर्व प्रकारच्या संस्था होत्या. कागदावर फक्त सोसायटी बनलेली आणि केला अर्ज कर्जासाठी. त्यावेळी मुंबईचे श्री. जगेश देसाई अर्थखात्याचे राज्यमंत्री होते. आम्ही त्यांची भेट घेतली. आमचं म्हणणं होतं की, ज्या सोसायट्यांनी सर्व कायदेशीर तरदुतींची पूर्तता केली आहे, ज्यांच्या ताब्यात जमीन आहे आणि कर्ज मिळताच जे बांधकाम सुरू करण्यासाठी कर्जाचा उपयोग करू शकतात त्यांना मरधान्य द्यावे. श्री जगेश देसाई स्वतः C.A. आणि अत्यंत हुशार माणूस. आमचे म्हणणे त्यांगा-पटले. त्यांनी कांही दिवसांतच संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावली. आमच्या सोजाबटी तफे मी ही या बैठकीला हजर होतो. मी आमची बाजू मांडली. कर्जाची मागणी करणाऱ्या सर्व संस्थाची माहिती सादर करण्यास जगेशभाईनी अधिकाऱ्यांना सांगितले आणि या बैठकीत सखोल चर्चा झाल्यानंतर कर्जमंजुरीसाठी नबी क्रमवार यादी बनविण्यास मंत्री महोदयानी सांगितले.

या नव्या यादीत आमच्या सोसायटीचा क्रमांक होता-२. कर्जाचा पहिला हप्ता मंजूर झाला आणि सोसायटीच्या घरबांधणीस सुरवात झाली. अर्थात् या वास्तूचा पायाभरणी-समारंभ श्री जगेश देसाई यांच्या हस्ते करण्यांत आला. नकटीच्या लग्नाला नव्हे - पण आमच्या सोसायटीच्या कामाला सतराशे विघ्न. बांधकाम जोरात सुरू होते पण त्याचवेळी सिमेंटची टंचाई निर्माण झाली होती. बाजारांत सिमेंट नाही, सरकारी कोट्यांतून सिमेंट मिळविण्यासाठी त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. अंतुलेंकडे गेलो शंभर गोणी सिमेंट मिळाले. दुसऱ्या महिन्यांत पुन: अर्ज घेऊन. श्री अंतुलेंच्या दरबारात हजर झालो. साहेब चिडले. अरे, तुम्ही काय दर महिना - पंधरा दिवसांनी येता सिमेंटसाठी ?

“काय करणार सर ! आम्ही सरकारी नोकर. आम्ही तुमच्याकडे नाही तर कुणाकडे जाणार. आणि सर, सिमेंट वाचून काम बंद पडलंय" अंतुले साहेबांनी त्यांचे सेक्रेटरी श्री. मोहन पाटील यांना बोलावलं आणि म्हणाले “एम.एस.एस.आय.डी.सी. कडे (लघुउद्योग विकास महामंडळ) जे कोरियन सिमेंट आलंय, त्यातील दोन हजार गोणी यांना द्या.”

आमच्या कंत्राटदारांनी आणि आर्किटेक्टने जेव्हा हे सिमेंट पाहिले तेव्हां ते म्हणाले, ‘शाह साहेब, अहो हे सिमेंट म्हणजे सोनं आहे सोनं!' अशा रीतीने सिमेंटचा प्रश्न सुटला आणि बांधकाम वेगाने सुरू झाले. सभासदांकडून पैशाचे हप्तेही वेळेकर येत होते. मंजूर झालेले कर्ज मिळून भागणार नव्हते. कारण प्रत्येकाला मिळालेले कर्ज त्या मानाने अपुरेच होते, शिवाय कर्ज तीन हप्त्यात मिळणार होते. त्या पैकी पहिला हप्ता मिळाला होताच, शिवाय सभासदांची स्वत:ची वर्गणी ही जमा होत होती. म्हणून कर्जाचा दुसरा हप्ता आम्ही लगेच मागितला नाही. तिसरा हप्ता मागतेवेळी दुसऱया व तिसऱ्या हप्त्याची आम्ही अर्थ खात्याकडे लेखी मागणी केली.

आश्र्चर्य म्हणजे नकारात्मक भूमिका घेण्याची सवयच असलेल्या त्या खात्याच्या संबंधित अधिकाऱ्यांनी आम्हाला सांगितले कों, तुमच्या केसची फाईल बंद झाली आहे, म्हणजे काय की, तुम्ही दुसरा हप्ता वेळेवर घेतला नाही म्हणून आता तुम्हाला कर्ज मिळणारच नाही. आहे की नाही कमाल! पैसे सरकारला वेळेवर न भरणे हा गुन्हा असू शकतो पण सरकारकडून पैसे वेळेवर न घेणे हा देखील अपराध! त्यावेळी जनता पक्षाचे सरकार होते. आणि अर्थखात्याच्या राज्यमंत्री होत्या श्रीमती शांता नाईक. प्रथमच मंत्रीपद मिळालेल्या. त्यांच्या जनसंर्पकाची वजबाबदारी माझ्याकडे असल्याने माझा सतत संपर्क असे. एके दिवशी दुपारी त्यांना भेटलो आणि आमच्या सोसायटीचे कर्जप्रकरण त्यांच्या कानावर घातले. बाई साहेबांनी ताबडतोब अर्थ खातांतील संबंधित अधिकाऱ्याला बोलावून घेतले आणि आमच्या केसविषयी विचारले.

“मॅडम, बघून काय ते सांगतो" त्या अधिकाऱ्याचे उत्तर.

सरकारी खात्यांतील ही एक ठराविक कार्यपद्धती आहे. अधिकारी सांगतात की बघून सांगतो आणि मंत्री म्हणतात की, सांगून बघतो (खालच्या अधिकाऱ्याना) पण श्रीमती शांता नाईक त्यापैकी

नव्हता. त्या म्हणाल्या "हे पहा ! मला तुमचं बघणं नकोय, आजच्या आज त्यांच्या कर्जाचे दोन्ही हप्ते मंजूर झाल्याची ऑर्डर काढा आणि मगच घरी जा." त्या दिवशी ऑफिसची वेळ संपल्यानंतर संध्याकाळी सात वाजता ती ऑर्डर माझ्या हातात आली.

पैशाचा प्रश्न सुटल्यामुळे पुढचे सर्व काम सोपे झाले आणि आमच्या स्वप्नातील वास्तू उभी राहिली.

*********************************

प्रकरण- २१

# शेतकऱ्यांचे मित्र

नगर जिल्ह्यातच एकदा शासकीय कामासाठी गेलो असताना योगा-योगाने श्री. कृष्णदास शहा नावाच्या माणसाची गाठ पडली. शिडशिडीत बांधा, तांबूस वर्ण आणि अंगात खादीची वस्त्रे. ती वस्त्रसुद्‌धा अगदी साधी. धोतर, अंगावर अर्ध्या बाहीचा सदरा आणि डोक्यावर गांधी टोपी. खांद्यावर खादीचीच शबनम पिशवी. साठीच्या जवळपास वय. पण चालणं इतकं तडफदार की ते सतत घाईत असावेत असं कुणालाही वाटावं. पण इतक्या लगबगीने जात असतानाही समोर ओळखीचा माणूस भेटला तर थांबून दिल-खुलास हास्यासह त्याच्याशी बोलून विचारपूस करून मगच पुढे सरकणार आणि तेही त्यांच्या नेहमीच्या वेगाने. कांही माणसेच अशी असतात को, त्यांच्या नुसत्या भेटीने आपलं मन प्रसन्न व्हावं. आपलं दुःख आपल्या चिंता, आपली मरगळ, सगळं एका क्षणांत वितळून जावं. कृष्णदासजी अशा प्रसन्न मूर्ती पैकी एक. त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी कृष्णदासजींना ग्राम विकास खात्यांत ऑनररी सलूलागार म्हणून नेमले होते. वसंतराव हाडाचे शेतकरी होते. खेड्यांच्या, शेतकऱ्यांच्या प्रश्नांची त्यांना पूर्ण जाण होती. शेतांमधली अतिक्रमणे हटवून, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम कृष्णदासजींवर सोपवले होते. दरमहा २५० रूपये मानधन आणि रेल्वेचा प्रथम वर्गाच्या प्रवासाची सवलत शासनातर्फे त्यांना देण्यांत आली होती. कृष्णदासजी मात्र नेहमी दुसऱ्या वर्गाने प्रवास करायचे. जाताना पिठाचं पोतडं बरोबर घेऊन जायचे. महिन्यांतून २५-२६ दिवस ते दौऱ्यावरच असायचे. खेड्यापाड्यांतून पायी भटकायचे. शेतां-शेतांतून फिरायचे मुक्कामावर आले की चूल पेटवून भाकऱ्या भाजायचे. गावांतून दूध विकत घ्यायचे, दूध-भाकरी हेच त्यांचे जेवण. शिवाय वनौषधींचे त्यांना बऱ्यापैकी ज्ञान होते. कांही औषधे जवळ असायचीच. ती गरजूंना फुकट द्यायचे. त्यांची सल्लागार पदावरची नेमणूक म्हणजे कांही कायमची सरकारी नोकरी नव्हे. नियमानुसार ठराविक मुदतीसाठी त्यांची नेमणूक झाली होती. मुदतीअंति, त्यांना मुदतवाढ द्यायची की नाही हे शासनाने ठरवायचे असते. त्यांची ठराविक मुदत संपली आणि ग्रामविकास खात्यातर्फे त्यांच्या नेमणुकीबाबतची फाईल अवर सचिव, उपसचिव, सचिव अशा चाकोरींतून मुख्यमंत्र्याकडे गेली. शासकीय खर्चात बचत करण्याकरिता श्री. कृष्णदास शहा यांना यापुढे मुदतवाढ देऊ नये असे त्या फाईलीत लिहिले होते; .मुख्यमंत्र्यांच्या अंतिम सहीसाठी फाईल मुख्यमंत्र्याकडे पाठविण्यांत आली होती. श्री. वसंतराव नाईकांनी फाईल वाचली मात्र अन् त्यांचं डोकं भडकलं. 'फाईलीशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना त्यांनी बोलावून घेतलं. मुंबईत सचिवालयांत बसून शेतकऱ्यांच्या समस्या तुम्हाला समजणार नाहीत. कधीतरी कृष्णदासजी बरोबर खेड्यांत जाऊन पहा मग तुम्हाला त्यांच्या कामाचे मोल समजेल असा दम मुख्यमंत्र्यांनी दिला आणि त्यांना मुदतवाढ देऊन मानधन दरमहा २५० रूपयांवरून ५०० रूपयेपर्यंत वाढवून दिले.

ग्रामीण विकासाच्या क्षेत्रांत चांगले कार्य करणाऱ्यांचा सन्मानसमारंभ राजभवनावर आयोजित करण्यांत आला होता. राज्यपाल, मुख्यमंत्री, प्रमुख अतिथी अशी मंडळी व्यासपीठावर बसली होती.

पुढच्या रांगेत अन्य प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार आदी मंडळी होती. राजभवनांत खास उभारण्यांत आलेला मंडप महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या पाहुण्यांनी भरून गेला होता.

कृष्णदासजी प्रेक्षकांमध्ये मागच्या रांगेत माझ्या शेजारी बसले होते. सन्मानपत्र वगैरे घेण्यास त्यांनी सरकारला नकार कळविला होता. मुख्यमंत्री वसंतराव नाईक, राज्यपाल व्यासपीठावर आले. समारंभ सुरू होणार तेवढ्यांत नाईकांचे लक्ष कृष्णदासजींकडे गेले व त्यांनी त्यांना आग्रहाने व्यासपीठावर बोलावले. कृष्णदासजींचाही सत्कार करण्यात आला.

**'भक्ती संगम'**

सचिवालयांत आणखी एक सज्जन माणसाशी मैत्री जमली आणि ही मैत्री पन्नास वर्षांपेक्षा अधिक काळ टिकून आहे. ते म्हणजे सुधाकर सामंत. सामंतांचे शिक्षण फक्त मॅट्रीकपर्यंतचे. पण वाचनाचा, लिखाणाचा छंद. विशेषतः संत वाडमयाबद्दल विशेष आस्था. त्यांच्यामुळेच पंढरपूरचे आणि कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे मला प्रथम दर्शन घडले. सामंतांमुळे गाडगेबाबा आणि त्यांचे शिष्य गुणवंतराव चऱ्हाटे यांच्या संपर्कात आलो. गाडगेबाबांचे कार्य खूप जवळून बघू शकलो. दादर येथील गाडगे महाराज धर्मशाळा बांधण्यांत सामंतांचा सिंहाचा वाटा आहे. शिवाय कसलाही गाजावाजा न करता ते स्वत: दरवर्षी गाडगे महाराजांच्या आश्रमांतील वसतिगृहांतील महिलांना आणि मुलांना साड्या आणि कपडे मोफत वाटतात.

सामंत आणि बाबांचे शिष्य गुणवंतराव यांच्याबरोबर मी एकदा नाशिकला त्यांचे वसतिगृह पहायला गेलो. तिथेच आम्ही जेवण घेतले. जेवण आटोपून आम्ही हात धुवायला म्हणून उठलो. पण गुणवंतराव मागे फिरले. आम्ही जेवायला बसलो होतो तिथे गेले आणि माझ्या ताटांत पडलेली भाताची दोन-चार शिते खाऊन हंसत हंसत परत आले. अनन अजिबात वाया घालवायचे नाही हा धडा एक शब्द न बोलता त्यांनी शिकवला.

सामंतांना कित्येक वर्षापासून दम्याचा त्रास आहे. छातींत पेसमेकर बसवलाय. पण त्यांचे कार्य अविरत चालू आहे. ‘भक्ती संगम' मासिक गेली ३०-३५ वर्षे नियमित प्रसिद्ध करीत आहेत.

**कपोझीटर ते जनरल मॅनेजर**

‘लोकराज्य' या. सरकारी नियतकालिकेच्या छपाईचें काम सुरवातीच्या काळात जन्मभूमी प्रेसमध्ये होई. प्रुफे तपासणे, पाने लावणे वगैरेंसाठी त्या प्रेसमध्ये जावे लागे. हा प्रेस खूपच मोठा व प्रसिद्ध आहे. त्या प्रेसचे जनरल मॅनेजर होते श्री. तावडे. सदा हसतमुख. आमच्या कामांत जातीने लक्ष घालायचे. कागद, पेन, टेबल-खुर्च्या एवढंच नाही, खाण्यापिण्याचीही व्यवस्था करायचे. त्यांनी

प्रेसमध्ये पाऊल टाकले की शिपाई 'कारकून वगैरेंची सलामी स्विकारीत यायचे. ‘तावडे साहेब, तुम्ही ह्या क्षेत्रात कसे आलांत ? मी एकदा सहज विचारले'. त्यांचे उत्तर ऐकून त्यांच्या बद्दलचा आदर अनेक पटींनी वाढला. याच जन्मभूमि प्रेसमध्ये तावडे साधे कंपोझीटर म्हणून महिना पाच रूपये पगारावर नोकरीला लागले आणि स्व-कर्तबगारीवर या सर्वोच्चपदी पोहोचले.

********************************

# साईभक्त मुकेश

नगरमध्ये आजपर्यंत कोणत्याही प्रसिद्ध पार्श्वगायकाच्या गाण्याचा कार्यक्रम झाला नव्हता. म्हणून एखाद्या नामवंत गायकाचा कार्यक्रम नगरमध्यें आयोजित करावा असा विचार माझे मित्र बाबू चंगेडे आणि हिंमत शाह यांच्या मनांत आला आणि त्यासाठी ते मुंबईत आले. मी त्यावेळी चित्रा दैनिकांत कामाला होतो. ते दोघे मला येऊन भेटले. लता मंगेशकर, महमद रफी आदि गायकांना त्यांना भेटायचे होते. पण कसं भेटणार? मी मुंबईत रहात असलो तरी अशा मोठ्या गायकांची ओळख सोडा, पत्ताही मला माहीत नव्हता. आमच्या मित्राना या कामात मी एकटाच मदत करू शकेन अशी त्यांची अपेक्षा होती. आमच्या चित्रांत सिनेमा विषयक सदर आठवढठ्यांतून एकदा लिहिणारा नरीमन नावाचा एक पत्रकार होता. तो आपले लिखाण गुजराती भाषेंत द्यायचा. आमच्या चिमणलाल शेटचं प्रजातंत्र हे गुजराती दैनिक प्रसिद्ध होत असे. नरीमनचे लिखाण प्रजातंत्रासाठी आणि त्या लिखाणाचा मी मराठीत केलेला अनुवाद चित्रासाठी अशी आमची व्यवस्था होती. नरीमन फक्त शनिवारी यायचा. आमच्या मित्रांना थांबण्याशिवाय गत्यंतर नव्हते. कारण त्या काळांत म्हणजे १९५४-५५ मध्ये मोबाईल तर नव्हतेच पण टेलिफोन देखील खूप कमी लोकांकडे असायचे.

नरीमनकडून लता मंगेशकर, महमद रफी, आशा भोसले यांचे पत्ते मिळाले. मला रात्रपाळी असल्यामुळे दिवसभर मोकळाच होतो. माझ्या त्या दोन मित्रांसोबत आमची गायक-शोध मोहिम सुरू झाली. लतादीदींची भेटच मिळू शकत नव्हती. महमद रफी साहेबांच्या सहकार्याने विचारलं कीं, अहमदनगर प्लेन जाता है क्या ? मी म्हटलं प्लेन राहू दे, दौंड-मनमाड पॅसेंजर शिवाय कोणतीही गाडी सुद्धा नगरला जात नाही. अर्थातच रफीसाहेबांच नावही आमच्या यादींतून वगंळलं गेलं. दुसऱ्या दिवशी आशाताई भोसलेंच्या घरी गेलो. आशाताईंच्या घरी आम्हाला खरचं सुखद अनुभव आला. त्यांनी प्रेमाने घरांत बसायला सांगितलं. चहा दिला आणि आमच्या येण्याचं कारण विचारलं. आम्ही आमचा हेतू सांगितला. आशाताई म्हणाल्या की, मी नक्की आले असते पण दोन महिने मी खूप बिझी आहे. दोन महिन्यांतर चौकशी करा. त्यावेळी परिस्थितीनुसार विचार करू. आशाताईंचे आभार मानून पण निराश होऊनच आम्ही परतलो. आता काय करायचं ? पुनः नरीमनला भेटलो. तो म्हणाला की मुकेशजींना भेटा. त्याच्याकडे सध्या काम नाहीये. लगेच त्याच्याकडून पत्ता घेऊन मुकेशना भेटलो. नगर कुठं आहे, कसं जायचं अशी चौकशी केल्यावर त्याने विचारलं की, शिर्डी नगरपासून किती दूर आहे. आम्ही लगचे सांगितलं की, सर शिर्डी तो खूब नजदिक है. साईभक्त मुकेश खूष झाले. म्हणले, मी आणि माझे दोन वादक आमच्या गाडीतूनच येऊ. कार्यक्रम आटोपू. साईबाबांच्या दर्शनाला जाऊ आणि तिथून नाशिकमार्गे मुंबईला परत येऊ. प्रश्न उरला मानधनाचा. साईबाबांच्या भेटीची तळमळ लागलेले मुकेश सहाशे होय. फक्त सहाशे रूपयांच्या मानधनाने नगरला यायला तयार झाले. अँडव्हान्स एक रूपयाही न घेता. माझं नशीब थोर कीं, मला मुकेश बरोबर त्याच्याच गाडींतून मुंबई ते नगर

आणि परत नगर ते मुंबई त्यांच्याशी गप्पा मारीत प्रवास करता आला. शिवाय साईबाबांचे दर्शनही झाले.

नगरहून परत फिरताना नाशिकला चहापानासाठी थांबलो असता मी व त्यांचे दोन सहकारी सर्वांसाठी मुकेशभाईंनी अर्धा-अर्धा किलो मिठाई व चिवडा घेतला. साईबाबांचे दर्शन झाले म्हणून ते अत्यंत खूश होते.

या घटनेनंतर दोन-तीन वर्षांनी पुन्हा मुकेशजीची भेट झाली. महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी मुंबईत संगीत महोत्सव आयोजित करण्यांत येई. रंगभवन येथील कार्यक्रमांत बिसमिला खाँ, गुलामअली खाँ, ओमकारनाथ ठाकूर अशा दिग्गज कलावंताचे कार्यक्रम होत असत. शेवटचा दिवस फिल्मी कलावंतांचा, स्टेजचे संचालन शासकीय कर्मचारीच करीत असत त्यामुळे.मी आणि ऑफिसांतील माझे रसिक मित्र सुमंत धुम्मा या महोत्सवाला जाऊन पुढच्या रांगेत बसायचो.

शेवटच्या दिवशी रोजच्यापेक्षा गर्दी जास्त, कारण सिनेकलावंतांचा कार्यक्रम होता. या कलावंतांमध्ये मुकेशही होते. कार्यक्रम संपल्यानंतर मी धुम्मासह मुकेशना भेटालया गेलो. ते आपल्याला ओळख दाखवतील का अशी शंका असणे स्वाभाविक होते. कारण गेल्या वर्ष-दीड वर्षात मुकेश तुफान लोकप्रिय झाले होते. राजकपुरचे पिक्चर व त्यातील गाणी खूप
गाजली होती. मुकेश कुणाशी तरी बोंलत उभे होते. मी हळूच त्यांच्या पाठीवर थाप मारली.
मुकेशनी मागे वळून पाहिले अन् मला कडकडून मिठीच मारली!

अरे जेठालालभाई, कहां हो तुम ? आपको बहुत याद करता हूँ. आपकी वजहसे शिर्डी साईबाबा के दर्शन हुओ और तबसे मेरी तकदीर ही बदल गई.

*********************************

प्रकरण - २३

# आठवणींचे टॉनिक

नोकरीत असतांना काळाचौकी येथील अभ्युदय नगरांत जवळ जवळ पंचवीस वर्षे राहिलो व त्यानंतर आम्ही सरकारी नोकरांनीच बनविलेल्या सहकारी सोसायटींत वांद्रे रेक्लमेशन येथे राहतोय. मराठी भाषिकांची वस्ती अधिक, वातावरणही महाराष्ट्रीय संस्कृतीचे. इतर भाषेबरोबर मराठी पुस्तकांचे वाचन, चांगले मराठी सिनेमा, नाटकं पहाणे, त्यावर चर्चा करणे असे निवृत्ती काळातील उपक्रम चालू आहेत. त्यांत मधुकर भानुशाली सारख्या रसिक मित्राची साथ फार मोलाची आहे. आठवड्यांतून किमान एकदा भेटून आम्ही आमची मैफल रंगवतो. त्यांत क्रिकेट, साहित्य, ज्योतिषशास्त्रासह अनेक विषय असतात त्यातून पुढचे आठ-पंधरा दिवसांचे टॉनिक आम्हाला मिळते. आमची मैत्री जवळ जवळ ५० वर्षांची.

हा भानुशाली देखील एक विलक्षण रसायन आहे. सच्चा मातृभक्त. वडिल त्याच्या बालपणीच वारले. आईने लोकांच्या घरची कामे करून चार मुली, एका मुलाला वाढवले. भानुशालीनेही आईचे क्रण फेडले. म्युनिसिपालटीतील नोकरी सांभाळून, शिकवण्या, सिनेमा थिएटरांत बुकिंग क्लार्क अशा नोकऱया केल्या. ढोर मेहनत केली. कारकुनापासून ऑफिसर पर्यंत बढती मिळवली.

भांडुपमधील दहा बाय दहाच्या खोलीतून आईला परळमध्ये झकास फ्लॅटमध्ये आणले. आणि ही सगळी प्रगति बघून आईच्या डोळ्यांत पाहिलेले आनंदाश्रू हीच त्यांच्यादृष्टीने
आयुष्यांतील श्रेष्ठ कमाई.

मामा तोरडमल, काका निंबाळकर (योगाचार्य सदाशिव निंबाळकर) हायकोर्ट जज्ज दुधाट, डॉ. उदास हे मुंबईत स्थायिक झालेले मित्र तसेच पुण्यात स्थायिक झालेले सुरेश डवरे, हिंमत शाह, रमेश शाह, बाबू चंगेडे वगैरे नेगरकर मित्र यांच्याशी सतत संपर्क असतो. त्यांच्याशी फोनवर किंवा प्रत्यक्ष भेटून गप्पा मारण्याचा आमचा आवडता कार्यक्रम आहे. आणि अशावेळी नगरमधील घडामोडी, गावांत झालेले बद्दल या सर्व बाबींवर अत्यंत आपुलकीने चौकशी होते. कापड बाजाराच्या कोपऱ्यावर पानाचे लहानसे दुकान असलेला मनोहर उर्फ मन्या पानवाला वारला ही बातमी देखील आम्हाला सुन्न व खिन्न करून टाकते.

आमंच्यापैकी कुणी नगरला जाऊन आलं कीं लगेच त्याचा फोन येणार. नगरचे हाल हवाल कळवणार. खरं तर आता आमच्या वयाच्या जुन्या मित्रांची आणि ओळखीच्या माणसांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्यामुळे नगरला गेल्यानंतरही भेटीगांठी खूपच कमी होत चालल्या आहेत. पण म्हणून नगरला जाण्याचा मोह काही कमी होत नाही. आपण राहता होतो त्या घराच्या

भिंती, ती गल्ली, तेच ते रस्ते, सोसायटी हायस्कूलचे ते मैदान, मैदानाच्या बाजूलाच आजही उभे असलेले वृक्ष या निर्जिव वास्तूही आपल्याशी जणू बोलतात असा माझा अनुभव आहे.

लोक सुट्टींत काश्मिरला किंवा सिमला कुलू मनालीला जातात. कुणी माथेरान महाबळेश्वरला जाऊन ताजेतवाने होऊन येतात. मी मात्र नगरला जाऊन येतो आणि बॅटरी रिचोर्ज होते.

********************************

# अहमदनगरचा इतिहास

१५ व्या शतकाच्या शेवटी इ.स. १४८६ मध्ये तत्कालीन बहामनी राज्याचे पाच तुकडे झाले. त्यामधून फुटून निघालेल्या मलिक अहमदशहा बहिरी या निजामशहाने मे, इ.स. १४९० मध्ये सीना नदीकाठी पूर्वीच्या भिंगार शहराजवळ नवीन शहर बसवण्यास सुरूवात केली. याच्या नावावरूनच या शहराला अहमदनगर असे नाव पडले. १४९४ मध्ये शहर रचना पूर्ण होऊन अहमदनगर निजामशहाची राजधानी बनले. या शहराची तुलना त्या काळी कैरो, बगदाद या समृद्ध शहरांशी केली जात असे. अहमदशहा, रुहाणशहा, सुलताना चांदाबीबी यांची कारकोर्द असणारी निजामशाही येथे १६३६ पर्यंत टिकली. मोगल बादशहा शहाजहानने इ.स. १६३६ मध्ये अहमदनगर काबीज केले. इ.स. १७५९ साली पेशव्यांनी अहमदनगरवर ताबा मिळवला तर १८१७ मध्ये ब्रिटिशांनी अहमदनगर घेतले. शहरात अहमदनगरचा किल्ला, रेणुकामाता मंदिर (केडगांव) व चांदबीबी महल अशी अनेक ऐतिहासिक स्थळे आहेत. या शहराला नगर या नावाने सुद्धा ओळखतात.

मराठ्यांच्या कर्तृत्वाच्या उदयकाली विठोजी भोसले, मालोजी भोसले, लखुजी जाधवराव निंबाळकर, पवार, बाजी कदमराव हे निजामशाहीचा चौथा सुलतान मुर्तझा निजामशाह आणि पुढे मलिक अंबर ह्याच्या पदरी सेवेत होते. देवळाली प्रवरा येथील सरदार बाजी कदमराव ह्यांना साल्हेर आणि मुल्हेर हे किल्ले, किल्यावर फितवा करून मिळू दिल्याबद्दल साक्रो आणि रूई ही नावे इ.स. १५८० साली इनाम मिळाली होती. पुढे विजापुरकारांशी लढताना बाजी कदमांचा बंकापुर (कर्नाटक) येथे मृत्यु झाला. आजही त्यांचे वंशज हे देवळाली प्रवरा येथे आहेत. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांच्या सेवेत हे घराणे आले. खंडेराव कदम आणि तिसरे बाजी हे शिवाजी महराजांचे अत्यंत विश्वासू सरदार होते. ह्यांच्याकडे राजगड किल्ल्याची तटसरनौती होती. छत्रपती शिवाजी मंहाराजांनी दक्षिण दिग्विजय मोहिमेत तामिळनाडू येथील वली गंडापुराम जिंकला त्या सुमारास अहमदनगरच्या भुईकोट किल्ल्याची किल्लेदारी कदमांकडे होती. छत्रपती राजाराम महाराजांच्या जिंजीमोहिमेतही कदमांनी स्वराज्यासाठी आपले पूर्ण योगदान अर्पण केले.
पानिपतच्या लढाईत ह्या घरातील सात पुरूष कामी आले. आजही कदमांकडे पारंपरिक आणि दुर्मिळ अशी जुनी शस्त्रे जपलेली आहेत. त्यांत धोप तलवारी, कट्यारी, ढाली, बिचवे, हस्तिदंती गुप्त्या, भाले, शिवकालीन शिवराया आणि इतर ऐतिहासिक साधने आहेत.

अहमदनगरजिल्ह्यातील देवळाली प्रवराहे नगरजिल्ह्यातीलपहिली नगरपालिका असलेले शहर आहे. देवळाली प्रवरा नगरपालिकेस भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील ह्यांच्या हस्ते 'राष्ट्रीय पूजल पुरस्कार' मिळालेला आहे. हा पुरस्कार तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग वे तत्कालीन कृषिमंत्री शरद पवार ह्यांच्या उपस्थितीत नगराध्यक्ष श्री. मुरलीधर कदम ह्यांनी स्वीकारला. महत्त्वाचे म्हणजे देशातील फक्त ह्या एकाच नगरपालिकेला हा सन्मान मिळालेला आहे.

*************************************

# पर्यटन स्थळे

- सारे जहाँ से अच्छा - पेन्सिल चित्र - अहमदनगरचे प्रसिद्ध चित्रकार श्री प्रमोद कांबळे ह का सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये भारतातील नामवंत ५०० महान व्यक्तींचीचित्रे ६५ फुट x १७ फुट अशा एका मोठ्या भिंतीवर काढली आहेत. केवळ पेन्सिलीच्यासहाय्याने इ.स. १९९७ साली काही महिन्यांमध्ये त्यांनी हे जगातील सर्वात मोठे पेन्सिलचित्र पूर्ण केले.
- शनी शिंगणापूर - येथे शनीचे सुप्रसिद्ध मंदिर आहे. येथे कुठल्याही घरला आणि बँकांना सुद्धा कुलपे नाहीत. शनदेव चोरांपासून गावाचे रक्षण करतो अशी स्थानिक लोकांची भावना आहे.
- शिर्डी हे ठिकाण साईबाबा मंदिरासाठी प्रसिद्ध आहे.
- सिद्धटेक - येथील सिद्धिविनायक मंदिर हे अष्टविनायक मंदिरांपैकी एक आहे. विशाल गणपती मंदिर - हे नगरचे ग्रामदैवत म्हणून प्रसिद्ध असलेले मंदिर अहमदनगरच्या माळीवाडा भागात आहे.
- रेणुकामाता मंदिर (केडगांव) - हे मंदिर केडगाव येथे आहे. ते अहमदनगर रेल्वे स्थानकापासून साधारणपणे ३ किलोमीटरवर आणि अहमदनगर बसस्थानकापासून सुमारे ५ किलोमीटरवर आहे.
- भुईकोट किल्ला - इ.स. १९४२ मध्ये येथे जवाहरलाल नेहरू यांना इंग्रजांनी कैदेत ठेवले होते. तेथे त्यांनी “डिस्कव्हरी ऑफ इंडिया" हे पुस्तक लिहिले.
- हरिश्रंद्रगड - एक ऐतिहासिक किल्ला. हा नगरपासून अंदाजे १२५ किलोमीटर अंतरावर आहे. सुप्रसिद्ध कोकण कडा येथेच आहे.
- श्रीक्षेत्र '“भगवानगड" हे महाराष्ट्र राज्यातील बीड-अहमदनगर जिल्ह्यांतील सीमेवर असलेल्या, खरवंडी गावाच्या बाजूला डोंगरावर वसलेले निसर्गरम्य देवस्थान आहे. या ठिकाणी विठ्ठल आणि पांडवांचे पुरोहित असलेल्या धौम्य क्रषींचे मंदिर आहे. तसेच जनार्दनस्वामी, भगवानबाबा व भीमसिंह महाराज यांच्या समाध्या येथे आहेत. सर्व जातिधर्मातील लोकांमध्ये एकोपा राहावा म्हणून भक्तीचा गड श्रीक्षेत्र भगवानगड याची उभारणी झालेली आहे. महाराष्ट्र राज्यातील ऊसतोडणी मजुरांचे श्रद्धास्थान म्हणूनही भगवानगडाकडे पाहिले जाते. जुरांचे श्रद्धास्थान म्हणूनही
- महानुभाव आश्रम शिक्षण संस्था, वांबोरी या आश्रमाची स्थापना सन २००३ मध्ये झाली. सुमारे ४०० विद्धार्थी या संस्थेत महानुभाव तत्वज्ञान व साहित्य यांचे अध्ययन करतात. संस्कृत साहित्याचार्य क्रषिराज शास्त्री महानुभाव हे या आश्रमाचे संचालक आहेत.

*********************************



**IMPERIAL PUBLICATIONS**
G-117, Shagun Arcade, Gen A.K.Vaidya Marg,
Dindoshi, Malad East,mumbai,
Mumbai Suburban

9 789391 044060